अनेक लहान मोठ्या मुलींची लग्नं परशुरामाबरोबर विधीपुर्वक पुजाऱ्याकडून करण्यात येत होती. त्यात जशा जठा धरलेल्या मुली होत्या तशा चांगल्या मुलीचाही भरणा होता. त्या विधीला सर्वत्र मुली राजी दिसत नव्हत्या. काही वडिलधाऱ्या माणसांची त्यावर बळजबरी होत असावी. कारण विधीच्या वेळी त्या रडत होत्या. एकाचवेळी एवढ्या सगळ्या मुलींच्याबरोबर हा परशुराम देव कस लग्न करून घेत असेल ? एक मुर्ती जी हालत नाही, बोलत नाही अशा मुर्तीबरोबर हे लोक या मुलींची लग्न का लावतात ? सर्वांचा कल्याणकर्ता म्हणवणारा हा देव आम्ही मानलेला हा देव या निष्पाप मुलींच्या बरोबर खरोखरच लग्न करीत असावा का? यल्लमादेवीला आईसमान मानतात तर तिचा हा परशुराम मुलगा सर्वांना भावासारखा झाला मग भावाबरोबर बहिणीचं लग्न कस ? हे असंच होत राहणार आहे का ? अजूनही हा परशूराम किती मुलीशी लग्न करणार आहे ?·किती मुलीचं कल्याण होणार आहे ? आता माझ्या बहिणीचे भवितव्य कांय ?. तिचे अधू पाय बरे होणार आहेत काय ? या दगडी देवाबरोबर उभा जन्म काढणार आहे काय ? अशा अनेक विचारांनी मी त्यावेळी सुन्न झालो.'' ५

भटक्या-विमुक्तांची आत्मकथने म्हणजे त्या त्या जाती-जमातीचे सामाजिक दस्ताऐवज आहेत. ही आत्मकथने स्व जीवनाबरोबरच समाज जीवनाचे चित्रण करीत असल्यामुळे ती समूहमनाचा अविष्कार होतात. आपल्या जीवनाचा वेदनामय विस्तीर्ण पट समाजासमोर मांडून कटू जीवनाची संघर्षमय कहाणी अभिव्यक्त करतात. आत्मकथनात सामाजिक जीवनाबरोबर सांस्कृतिक जीवनाचेही दर्शन घडत असते. भटक्या-विमुक्त जाती-जमातीत रूढी, प्रथा, समजूती आचार-विचार, लोकभ्रम, श्रध्दा अंधश्रध्दा, सण उत्सव, व्रत-वैकल्य, धार्मिक विधी व देवदेवता यांना अधिक महत्व आहे. त्यांच्या जीवनाचा तो अभिन्न भाग होऊन बसल्याने त्याशिवाय ते जगूच शकत नाहीत. जीवनात येणारा कोप हा दैववादाचा असून त्याचे निवारण करण्यासाठी आयुष्यभर नवस, व्रत, वैकल्ये, व धार्मिक विधी करतात. त्यामुळेच ह्या समाजाची प्रगती होवू शकलेली नाही. हेच या शोधनिबंधातून फलश्रूत होते.

## संदर्भ सूची :-

१. गबाळ : दादासाहेब मोरे, श्रीविद्या प्रकाशन, पुणे दुसरी आवृत्ती १९९० पृ.क्र. २९
२. मरणकळा : जनाबाई गिऱ्हे, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर आवृत्ती १९९२
३. उपरा : लक्ष्मण माने, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई पाचवी आवृत्ती २००० पृ.क्र. ३०
४. उचल्या : लक्ष्मण गायकवाड, श्रीविद्या प्रकाशन, पुणे पाचवी आवृत्ती २००० पृ.क्र. ३
५. बेरड : भीमराव गस्ती, राजहंस प्रकाशन, पुणे चौथी आवृत्ती २००२ पृ.क्र.९५

6
2018

Issue : XIV, Vol. X
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.80
ISSN 2231-6671
Aug. 2017 To Jan. 2018

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | R. C. Dutt Thoughton Famines: Nature, Causes, Effects & Policy<br>**Dr. Ankush L. More** | 1 |
| 2 | Women and Space: A Study of Africa as Depicted by African Women Writers<br>**Puja Sarmah** | 10 |
| 3 | पत्रकारिता : जिम्मेदारी एवं चुनौतियाँ<br>डॉ. आलीया मेराज सय्यद | 15 |
| 4 | इसीस आणि भारताची राष्ट्रीय सुरक्षा<br>डॉ. सुभान तुळशीराम जाधव | 18 |
| 5 | दादाभाई नौरोजींचे आर्थिक विचार<br>डॉ. आर. डी. जाधव | 26 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही<br>डॉ. महेश प्रल्हादराव गोमासे | 31 |
| 7 | आदिवासी जमातीच्या लोकगीतातील स्त्रीचे सामाजिक व सांस्कृतिक दर्शन<br>डॉ. शिवानंद मच्छिंद्र गिरी | 36 |
| 8 | भ्रष्टाचार मुक्तिच्या दृष्टिकोनातून संत तुकारामाच्या अभंगाची उपयुक्तता<br>रामचंद्र ना. पस्तापुरे | 43 |
| 9 | 'यज्ञकुंड' मधील सामाजिक जाणीव<br>डॉ. उन्मेश शेकडे | 46 |
| 10 | ई-प्रशासनाच्या साहाय्याने सार्वजनिक तक्रारीचे निवारण<br>डॉ. के.जी. राठोड | 50 |
| 11 | जम्मू-काश्मीर : एक विवादित प्रश्न<br>डॉ. के.जी. कुंभारकर | 55 |



PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

7

# आदिवासी जमातीच्या लोकगीतातील स्त्रीचे सामाजिक व सांस्कृतिक दर्शन

डॉ. शिवानंद मच्छिंद्र गिरी
मराठी विभाग,
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर, जि. लातूर

## Research Paper - Marathi

भारतात विविध जातीचे, धर्माचे, वंशाचे व वर्णाचे लोक राहतात. नैसर्गिक पर्यावरणाचे संतुलन जपत दुर्गम असलेल्या डोंगर, दऱ्यात, कडा-कपाऱ्यात व नदीनाल्यात राहून आपली परंपरागत आदिम संस्कृती जपत फळा-फुलांचा व झाडपाल्यांचा आस्वाद घेत जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे जीवन वेगळे आहे. आदिवासी समाज हा इतर समाजापेक्षा भषा, संस्कृती, जीवन जगण्याची पद्धती, रुढी, प्रथा, परंपरा व आवडी-निवडी यानुसार जसा वेगळा ठरतो तसाच तो त्यांच्यातील देवदेवता, सण-उत्व, गीत व नृत्य कलाप्रकारनेही अधिक वेगळा जाणवतो. आदिवासी समाज मूलतः कष्टाळू, धाडसी व दनकट असल्याने तो सतत कामात मग्न असतो. आदिवासी समाजाची आर्थिक परिस्थिती बिकट असली तरी तो उपाशी राहून प्रामाणिकपणाने जीवन जगणारा आहे. हा समाज पोटाच्या भूकेसाठी आपले इमान न विकता व कोणापुढेही न झुकता भीक मागत नाही. हा समाज आज्ञानाच्या व दारिद्र्याच्या खोल गर्तेत बुडालेला असल्याने अंधश्रद्धा व जादूटोणावर यांची अधिक श्रध्दा असते. त्यासाठी ते नवस-सायास, सणाकर, विधी, वैकल्ये, उत्सव, जत्रा व लग्न याप्रसंगी पैसा खर्च करून दारिद्रयात आणखीनच भर घालतात. शिक्षणाचा अभाव असणाऱ्या समाजात नैतिक मूलयांची जोपासना, संयमीपणा व चारित्र्यसंपन्नता अधिक प्रमाणात दिसून येत असल्यामुळे या समाजाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती स्वच्छ व निर्भेळ आहे हे स्पष्ट होताना दिसून येतो.

आदिवासीमध्ये अनेक जमातींचा समावेश असलेला पाहावयास मिळतात. या जमाती वेगवेगळ्या प्रदेशात राहात असलेल्या दिसून येतात. ज्या प्रदेशात या जमाती राहतात तेथील भौगोलिक परिस्थितीचा परिणाम त्यांच्यावर होतो. क्ष्यानुसार त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक

208

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

Issue - XIV, Vol. X
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.80
ISSN 2231-6671
Aug. 2017 To Jan. 2018


संदर्भात वैविध्यपूर्णता दिसून येते. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीचे भौगोलिक दृष्टिकोनातून तीन विभाग पाडलेले आहेत. त्यातील पहिला विभाग म्हणजे सह्याद्री विभाग होयं. या विभागात ठाणे, पुणे, नगर, नाशिक व कुलाबा या जिल्ह्यांचा समावेश होतो यात प्रामुख्याने महादेव कोळी, ठाकूर, कातकरी, वारली व कोकण या आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. आदिवासी जमातीच्या दुसरा विभाग म्हणजे सातपुडा विभाग होय. या विभागात धुळे, नंदूरबार व जळगाव या जिल्ह्यांचा समावेश होतो. यात भील्ल, गावीत, दुबळा व धनका या जमाती प्रामुख्याने राहतात तर तिसरा विभाग म्हणजे गोंडवन विभाग होय. या विभागात विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, अमरावती व नांदेड या जिल्ह्यांचा समावेश होतो. या विभागात गोंड, माडिआ, परधान, कोरकू व कोलाम या आदिवासींच्या जमाती पाहावयास मिळतात.

महाराष्ट्रात आदिवासी जमातीची संख्या जवळजवळ सत्तेचाळीस वास्तव्यास असलेल्या दिसून येतात. या सर्वच आदिवासी जमातीची भाषा, सामाजिक जीवन, सांस्कृतिक जीवन व धार्मिक जीवन यामध्ये भिन्नता आढळते. या आदिवासी जमातीमध्ये प्रचलित असणारे मौखिक धन कडा-कपाऱ्यामध्ये विखुरलेले आहे त्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. आदिवासी लोकसाहित्याचा विचार केला तर त्यामध्ये वेगवेगळे प्रकार दिसून येतात. लोकसाहित्याच्या या प्रकारांपैकी आदिवासी लोकगीतांचे दालन समृध्द व संपन्न आहे. या लोकगीतात पारंपरिकता व मौखिकता जसी दिसून येते. तसेच त्यात आदिवासी जमातीतील स्त्रियांच्या भावबंधासह तिचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचेही दर्शन घडते. याचाच शोध या शोधनिबंधाद्वारे घ्यावयाचा आहे. महाराष्ट्रात सत्तेचाळीस आदिवासी जमाती राहतात या सर्वच जमातींचया लोकगीतातून घडणारे स्त्री दर्शन सांगणे विस्तार भयास्त टाळले असून काही प्रातिनिधिक आदिवासी जमातींच्या लोकगीतातून घडणाऱ्या स्त्री जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे.

'भील्ल' ही आदिवासी जमात महाराष्ट्रामध्ये सातपुडा विभागात पाहावयास मिळते. 'भील्ल' या शब्दाची उत्पत्ती पाहताना विल्सन यांच्या म्हणण्यानुसार 'बिली' या तमिळ शब्दापासून झालेली आहे. 'बिली' या तमिळ शब्दाचा अर्थ धनुष्य असा आहे.'भील्ल'या जमातींचा व्यवसाय शिकार करणे, शेती करणे व शेतीवर रोजंदारीने काम करणे हा आहे. या जमातीतील लोक अत्यंत दारिद्रयात जीवन जगतात कारण त्यांच्यात निरक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याने त्यांना स्वतःची फारशी प्रगती साधता आलेली नाही. या जमातीतील पुरुषांना दारूचे व्यसन जडलेले असल्यामुळे शिवाय दारू त्यांना विकत घेण्याचा प्रश्न निर्माण होत नाही कारण मोहाच्या फुलापासून ते स्वतःच दारू तयार करतात व त्यांचा आस्वाद घेतात. या जमातीतील लोकांची घरे पाहिल्यावर आपणास त्यांच्यात आठरा-विश्वे दारिद्रयाची कल्पना आल्याशिवाय राहात नाही. या जमातीतील स्त्री-पुरुष वेगवेगळे सण, उत्सव व विधीच्या वेळी सामूहिकपणे नाचगाणे करतात. या जमातीतील स्त्री परिवर्तनशील

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

असल्यामुळे ती आपल्या पतीला शहरातील स्त्रीप्रमाणे गोल साडी बाजारातून घेऊन येण्याची अपेक्षा व्यक्त करते. तिच्या मनातील ही इच्छा आपल्या लोकगीतातून आविष्कृत करते.

"सांगवा मरडी रडी आनाम मात गोल साडी
न आनं रं गोल साडी
तूं करतू येर उडी
तू कारसी येर उडी तू टाकरू टिंगर मोडी
तू टाकरू टिंगर मोडी
तू म दिस जीव सोडी"

वरील गीतामध्ये पारंपरिक पोशाखापेक्षा शहरातील राहणाऱ्या स्त्रीप्रमाणे आपणासही गोल साडी मिळावी अशी इच्छा ती पतीकडे व्यक्त करते. या जमातीतील स्त्री ही इच्छा आकांक्षाने जीवंन जगणारी असली तरी तिच्या ह्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. त्यामुळे तिला छंदीफुंदी जीवन जगता येत नाही. कारण तिला आपल्या कुटुंबातील पुरूषांच्या आदरभावाने राहावे लागते. आपल्या घरातील दैन्य व दारिद्रयाची जाणीव ती लोकगीतातून सहजपणे व्यक्त करते.

"काय करू बहिन मन्या करमले व
नाही मले धांदूक नेसायले व
तीन दगडरेना मांडा चुन्हा
लुगडा मिचुक हुगडा कुल्हा
चालनू व माय म मोळीले
काय करू बहिन मन्या करमले व"

वरी गीतामध्ये आदिवासी भिल्ल स्त्री आपल्या दारिद्रयाची कर्म कहाणी आपल्या मानलेल्या बहिणीला सांगते. लाज झाकण्यापुरतेही वस्त्र नेसायला नाही. अशा अवस्थेत ती लाकडाची मोळी बाजारात विकल्याशिवाय तिचा उदरनिर्वाह भागविणे तिला शक्य नाही. आदिवासी भिल्ल स्त्रियांना आपले दररोजचे जीवन असेल त्या परिस्थितीशी समायोजन साधून जगावे लागते. या स्त्रियांचे दुःख जवळून पाहिल्यास कोणाचेही अंतःकरण पिळवटून निघाल्याशिवाय राहात नाही.

आदिवासी भिल्ल जमातीची पोटजमात म्हणून पावरा जमातीकडे पहिले जाते या जमातीचे लोक सातपुडा पर्वत रांगामध्ये वास्तव्यास असलेले दिसून येतात. शेतजमिनीच्या छोट्यास्या तुकड्यावर या समाजाचा उदनिर्वाह भागात नसल्यामुळे हे जंगलातील वेगवेगळ्या वस्तू गोळा करणे, शिकार करणे, रोजगार करणे इत्यादी कामेही करतात. पावरा समाजातील लोक कष्टाळू, काटक, देवभोळे व अंधश्रध्दाळू आहेत. त्यांच्यात दारूचे व्यसन अधिक असल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर होत त्यांच्या कुटुंबव्यवस्थेवरही होतो. त्यामुळे त्यांच्यात दारिद्रयाचे प्रमाण

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

भयानक आहे. यामुळेच त्यांचे जीवन उद्ध्वस्त होते. या जमातीतील स्त्री निसर्गाच्या कुशीमध्ये राहणारी आहे. निसर्ग हेच तिचे आश्रय स्थान आहे. तिचे दैनंदिन जीवन खूपच कष्टप्रद आहे. ती घरामध्ये राबराब राबते व पतीला शेतीच्या कामातही मदत करते. त्यामुळे ती अधिक काटक बनलेली दिसते. तिला आपल्या संस्कृतीचा गर्व आहे. 'पावरा' जमातीतीला स्त्री अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये जीवन जगत असली तरी भीक मागण्याची तिची वृत्ती नसून ती स्वाभिमानी, कष्टाळू व प्रामाणिक आहे. परंतु तिला पुरूषाकडून मिळणारी वागणूक, पतीची व्यसनधिनता व दारिद्रय यामुळे ती दुःखी झालेली दिसत. पावरा जमातीतील स्त्रियांच्या जीवनात पर्वताएवढे दुःख असले तरी मोहरीएवढ्या सुखासाठी ती वेगवेगळ्या सण-उत्सवाच्या निमित्ताने होणारे नाचगाणे हे त्यांच्या जीवनातील आनंदाचा अमूल्य असा ठेवा आहे. यातूनच जीवनातील त्या आपल्या मनातील भाव-भावनांचे इच्छा-अपेक्षांचे व दुःख-दैन्याचे दर्शन घडवितात. या जमातीतील स्त्रिया वेगवेगळ्या प्रसंगी गाणी म्हणत असल्या तरी विवाहप्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या गीतांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. पावरा जमातीमध्ये मुलाकडून मुलीच्या वडिलांना हुंडा दिला जातो. त्यामुळे हुंडा घेणारा मुलीचा वडील पैशाचा बळीपडून मुलीच्या भावी आयुष्याकडे दुर्लक्ष करताना दिसतो. नववधू मुलीला याचे खूप दुःख होते तरीही ती मर्यादेचे उल्लंघन करत नाही. ती आपल्या वडिलांच्या मनाविरोध वागत नाही. शेवटी तिच्याकडे केविलवाणी रडण्याशिवाय काहीच राहात नाही. या संदर्भातील तिची भावना गीतातून व्यक्त होते.

"दादा रा पैदा खाने हे हाजो लाग्यो
बेना रडे किरवाली
आईवा तहवी पैहा खाने हाजो लाग्यो
बेना रडे किरवाली
होरू पिन हाजो लाग्यो
बेना रडे किरवाली"

'पावरा' जमातीच्या लोकगीतातून भेटणारी स्त्री आपल्या आयुष्यात आलेल्या दुःखाचा दंडोरा कुठेच व्यक्त न करता ती आपल्या नशिबाला दोष देत निमुटपणाने दुःख सहन करत जीवन जगते. हेच ती आपल्या जीवनाची सार्थकता मानत आयुष्याची वजाबाकी करते.

महाराष्ट्रात 'महादेव कोळी' ह्या जमातीचे लोक सह्याद्रीच्या परिसरामध्ये वास्तव्यास आहेत. या जमातीला पुढारलेली आदिवासी जमात म्हणूनही ओळखले जाते. 'महादेव कोळी' ही जमात शेती, मजूरी व पशुपालनाच्या व्यवसाय करतात. ह्या जमातीतील लोक महादेवाचे पूजक असल्यामुळे त्यांचे नाव 'महादेव कोळी' असे पडलेले आहे. या जमातीत होळी, दिवाळी, पोळा, पाडवा, अक्षय, तृतीया, नागपंचमी व दसरा हे सण मोठ्या उत्साहाणे साजरा करतात. 'महादेव कोळी' या

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

जमातीतील स्त्रिया पुरूषांच्या खांद्याला खांद्या लावून कष्टमयतेचे काम करताना दिसून येतात. या जमातीतील स्त्रिया सण, उत्सवात व विवाहप्रसंगी गाणी गातात त्यातून आपल्या भावना व्यक्त करतात. लग्न झाल्यानंतर सासरी गेलेली मुलगी आपल्याला जन्म देणाऱ्या आईची आठवण तिला सारखी होते. आईविना क्षणभरही न राहणारी मुलगी सासरी गेल्यानंतर आईच्या ममत्वेपासून पोरकी झालेली आहे. त्यामुळे तिला आईविना राहणे शक्य नसते. तेव्हा ती आई विषयीची भावना गीतातून व्यक्त करते.

"आई तुजविना मजला करमत नाही काय करावे सांगना गं
आठवण येत घडो घडो गं मन हे रडेते मनामधी
माया तोडवत नाही गंग छाया सोडवत नाही गं
आई तुजवीन मजला करमत नाही
तुझ्यापोटी मी जन्म घेतला नाव तरी मी कमवीन गं
तुझी ती आठवण तुझे ते शब्द कायम मनी मी रूजवील गं
आई तुजवीन मजला करमत नाही."

या गीतातून महादेव कोळी जमातीतील मुलीच्या आईविषयीचे प्रेम, जिव्हाळा व आदर व्यक्त तर होतोच, परंतु आईने दिलेली शिकवण व संस्कार ती कायम स्वरूपी स्वतःवर रूजविताना दिसते. त्यामुळे ती माहेरचे नाव कमवून दाखविणे अशा स्वरूपाचा भावही या गीतातून व्यक्त होताना दिसून येतो.

महाराष्ट्रातील ठाकर ही महत्त्वाची आदिवासी जमात आहे. या जमातीचे लोक शेतीचा व्यवसाय करतात. या जमातीत गोडे ठाकर व कडवे ठाकर असे दोन प्रकार दिसून येतात. यातील गोडे ठाकर स्वतःला ज्येष्ठ समजतात. ठाकर जमातीतील स्त्रिया सण, उत्सव, विधी व श्रमाची कामे करताना गाणी म्हणतात. त्यातून त्यांच्या जीवनाची ओळख होते. या जमातीमध्ये वधूवरांना हळद लावताना गाणी म्हटली जातात.

"हाये तू कोण्या-ठायी ओ ठायी
मी तं हाये वंदऱ्याच्या घाटाला
आंधी हाळद लागती देवाला वो
मंग लागती नवऱ्याबाईला वो..."

या जमातीतील स्त्रियांवर धार्मिकवृत्तीचा पगडा अधिक प्रमाणात दिसून येतो. त्यामुळेच वधू-वरांना हाळद लावत असताना आपल्या गीतामध्ये हाळद लावण्याचा पहिला मान देवाला देतात. यावरून या समाजातील स्त्री श्रध्दाळू स्वरूपाची आहे. आदिवासी जमातीतील इतर स्त्रियांप्रमाणेच ह्या जमातीतील स्त्रीही आपली स्वतंत्र संस्कृती जपणारी आहे.

कातकरी ही आदिवासी जमात कात तयार करण्याचा व्यवसाय करते. ही जमात आज मधगोळा करणे व विकणे, शेतमजूर, विटभट्टीवर, रस्ता दुरूस्ती व ऊसतोडणीचे कामे करतात. या जमातीतील स्त्री ही श्रध्दाळू असल्यामुळे ती सण, उत्सव साजरी करणारी आहे. तसेच ती नवस बोलून आपल्यावरील संकटाचे निवारण करणारी आहे. शंकरा संबंधीची भक्ती ती आपल्या गीतातून व्यक्त करताना दिसून येते.

"यादी गणाला गण गण गाईला रे
सोन्याची मला भूळ पडे
शंकर झोपडीत बसूनी वाजवितो बासरी
बारवंती गेली धुना-धुवाया यमुना नदीवर
तिला आठवण पडेल, शंकराची पींडीची..."

'गोंड' ही गोंडवना या विभागातील आदिवासी जमात असून यात एकूण अठ्ठावीस पोटजमाती दिसून येतात. गोंड या जमातीत सणोत्सवांना महत्वाचे स्थान आहे. या सणोत्सवाच्या वेळी म्हणावयाची गाणी या जमातीत आजही मौखिक परंपरेने मोठ्या प्रमाणात दिसून येतात. गोंड या जमातीमध्ये दंडार नृत्य प्रसिध्द आहे. या जमातीतील स्त्रियांना नृत्यांचे प्रसंग त्यांच्या वाळवंटी जीवनातील हिरवळ वाटते. म्हणूनच त्या अशा नृत्याविष्कारामध्ये सहभागी होतात.

"देना दिरेना देना देना
बकीट ना धुणे बकीट ने इरता गा मामा
नवरी ये दांता तावाना धाराका तावते इरता गा मामा
नवरी ये दांता घुमलात सडाफी गुमालेते इरता गा मामा."

'कोलाम' या आदिवासी जमातीतील स्त्रियाही विवाहप्रसंगी जे गीते म्हणतात त्या गीतामधून वधूपक्षाकडील स्त्रिया व वर पक्षाकडील स्त्रिया गीतातून एकमेकांवर टिका करतात.

"आम्मे पिला कांडकाद, आम्मे पिला कांडकाद
मोगरावू नेत पुव्वकिशा, पुव्व बराबर कांडकाद
इम्मे बाला कांडकान, इम्मे बाला कांडाकान
शिशुकनेत खुटेकिशा, खुटे बराबर कांडकान"

या गीतात वरावर टिका केलेली असून यात मुलीची प्रशंसा केलेली आहे. आमची मुलगी ही मोगऱ्याच्या फुलासारखी कोमल, नाजूक व सौंदर्यवान आहे. तिचे सौंदर्य मोहित करून टाकणारे आहे. तर तुमचा मुलगा खैराच्या झाडाच्या खुंटासारखा ताठ, दृष्ट व खंटयाळ दिसतो. या विवाहासाठी आलेल्या स्त्रिया वधूची बाजू घेतात. आदिवासी कोलाम जमातीतील स्त्रिया विवाह प्रसंगी दैनंदिन दुःख विसरून आनंदाने गीत गात नृत्य करताना दिसतात.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

निष्कर्ष :

१. आदिवासी समाज मूलतः कष्टाळू, श्रध्दाळू, धाडसी व दणकट असल्याने तो सतत कामात मग्न असतो.

२. आदिवासी जमातीत शिक्षणाचा अभाव असला तरी नैतिक मूल्यांची जोपासना करत सहनशीलता व चारित्र्यसंपन्न अधिकतेनें दिसते.

३. आदिवासी जमाती ज्या भौगोलिक प्रदेशात राहातात त्या प्रदेशांचा परिणाम त्यांच्या जीवन पद्धतीवर झालेला आहे.

४. आदिवासी जमातीतील लोकगीतातून स्त्रियांच्या भाव-भावनांचे दर्शन घडते.

५. आदिवासी जमातीतील लोकगीतातून स्त्रियांचे दुःख, दैन्य, दारिद्रये व तिची मानसिकता प्रकर्षाने प्रकट होते.

६. आदिवासी जमातीतील लोकगीतातून स्त्रियांचा स्वभाव, कष्टाळूवृत्ती, धार्मिकवृत्ती, तिचे सण, उत्सव, विधी, तिचे विचार व जीवनांकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

७. आदिवासी जमातीतील स्त्री नृत्यगीत हे आपले विसाव्याचे व आनंदाचे स्थान समजते.

## संदर्भ सूची :-

१. डॉ. विनायक तुमराम : आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर
२. डॉ. सुदाम जाधव : आदिवासी लोकसाहित्य, सुलबा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती
३. डॉ. सुदाम जाधव : सातपुड्यातील आदिवासी, सुलबा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती
४. डॉ. शौनक कुलकर्णी : महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती
५. मा. रा. लामखडे : आदिवासी ठाकर आणि त्यांचे लोकगीते, पद्मगंध प्रकाशन, पुणे
६. डॉ. सौ. शैलेजा देवगांवकर : महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य, श्री साईनाथ प्रकाशन,
७. आदिवासी जमातीतील स्त्रियांच्या प्रत्यक्ष मुलाखतीतूनं संकलित केलेली लोकगीते.

ISSN 2231-6671

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

(UGC Approved Peer Reviewed Research Journal)

Year - VIII, Issue - XV, Vol.- III
Impact Factor 3.92 (GRIFI)
Feb. 2018 To July 2018

EDITOR IN CHIEF

DR. BALAJI KAMBLE

Bhai Kishanrao Deshmukh Sen... Chakur 413513

Principal
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

Issue : XV, Vol. III
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.92
ISSN 2231- 6671
Feb. 2018 To July 2018

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Sue Bridehead : Hardy's Exploration of the New Woman's<br>**Avinash S. Shete** | 1 |
| 2 | Random Fixed Point Theorem for Contractive Mappings<br>**P. V. Kulkarni** | 11 |
| 3 | Everywhere Continuous Function is also Non - Derivable Function<br>**S. B. Biradar** | 20 |
| 4 | Effect of Dimethoate on the Biochemical Composition In The Gill of Freshwater Fish, *Rasbora Daniconius*<br>**M. V. Lokhande** | 27 |
| 5 | भूमंडलीकरण के संदर्भ में अनुवाद का महत्व<br>**डॉ. रविन्द्र बनसोडे** | 36 |
| 6 | उद्योग संशोधन प्रक्रियेतील तथ्य संकलन : अडथळे आणि उपाय<br>**मिलन नरहर वालावलकर** | 40 |
| 7 | आंबेडकरी विचारातून निर्मित मराठी दलित कविता<br>**डॉ. वैशाली गायकवाड** | 46 |
| 8 | महाराष्ट्रातील पंचायत राज व अनुसूचीत जमातीचा सहभाग<br>**नागोराव एस. आसोले** | 49 |



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

8

# महाराष्ट्रातील पंचायत राज व अनुसूचीत जमातीचा सहभाग

नागोराव एस. आसोले
राज्यशास्त्र विभाग,
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर, जि. लातूर (महाराष्ट्र) भारत

## Research Paper - Political Science

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्य पूर्वी व्दिभाषिक मुंबई राज्यामध्ये होते. या व्दिभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. भाषावार प्रांतरचनेनुसार मराठी भाषा बोलणाऱ्यांचा महाराष्ट्र प्रांत निर्माण करण्यात आला. मा. यशवंतराव चव्हाण संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्य मंत्री झाले. त्यांच्या मंत्रीमंडळात मा. वसंतराव नाईक हे महसूल मंत्री होते. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीचा अभ्यास करण्यासाठी मा. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरिय समितीच्ची स्थापना करण्यात आली. व्दिभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण होते. त्याच प्रकारे महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर सुध्दा महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांनीच होते. वसंतराव नाईक समितीला 'महाराष्ट्रातील लोकशाही विकेंद्रीकरण समिती' म्हणून ओळखले जाते. 'लोकशाही विकेंद्रीकरण समिती' २२ जून १९६० रोजी नियुक्त करण्यात आली. या समितीने आपला अहवाल १५ मार्च १९६१ रोजी महाराष्ट्र शासनाकडे सादर केला. या समितीने आपल्या अहवालात एकूण २२६ शिफारशी केल्या होत्या.

बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीचा विचार करुन राजस्थानने सर्वप्रथम पंचायतराजचा प्रयोग केला त्यालाच अनुसरुन महाराष्ट्रामध्येही पंचायतराज कशा प्रकारे आणता येईल. याचा अभ्यास करण्यासाठी म्हणून यशवंतराव चव्हाण सरकार मधील वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली होती.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

**वसंतराव नाईक समितीच्या शिफारशी :**

१) त्रिस्तरीय पध्दतीचा स्विकारः बलवंतराय मेहता समितीने सुचविलेली त्रिस्तरीय पंचायतराज यंत्रणा वसंतराव नाईक समितीने स्विकृत केली. जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, विकास गट पातळीवर (तालुका पातळीवर) पंचायत समिती व पायाभूत ग्राम स्तरावर ग्रामपंचायतीची स्थापना केली जावी

२) स्वायत्त कारभार : पंचायतराज संस्थाना स्वायत्तता द्यावी, अशी स्वायतता टिकून राहण्यासाठी लोकसभा व विधानसभाच्या सदस्यांना जिल्हा परिषदेवर प्रतिनिधत्व असू नये. त्याच प्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांचा जिल्हा परिषदेच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप नसावा. वसंतराव नाईक समितीनेही बलवंतराय मेहता समिती प्रमाणेच पंचायतराजचे तीन स्तर सुचविले तसेच या संस्थाना कायदयाचा आधार प्राप्त होण्यासाठी शासनाने कायदे करावे त्याचप्रमाणे पंचायतराजला आपले काम मुक्तपणे करता येण्यासाठी खासदार व आमदाराला पंचायतराज मध्ये सदस्यत्व असू नये असे सूचविले.

३) प्रत्यक्ष निवडणूक पध्दतः महाराष्ट्रातील जनतेचा पंचायतराज मधील प्रत्यक्ष सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीच्या निवडणूका प्रत्यक्ष मतदान पध्दतीने घेतल्या जाव्यात. २१ वर्षे पूर्ण असलेली आणि मतदार यादीत नाव असलेली व्यक्ती गुप्त मतदानाव्दारे सदस्य निवडतील.

४) स्थानिक नेतृत्वाला वाव : देशात राजस्थान, आंध्रप्रदेश या राज्यात संसद सदस्य तसेच आमदारांना जिल्हा परिषदांचे पदसिध्द सदस्यत्व दिले जाते. मात्र मा. वसंतराव नाईक समितीला ही बाब स्थानिक नेतृत्वाच्या विकासासाठी अडसर ठरेल असे वाटले. त्यामूळे त्यांनी आमदार, खासदारांना या संस्थांचे सदस्यत्व असू नये असे सूचविले. स्थानिक नेतृत्वाला वाव हेच या मागील सूत्र होते.

**जिल्हा परिषदेसंबंधी शिफारशी :**

१) जिल्हा परिषदेमधील सदस्यांची संख्या कमीत कमी ४० व जास्तीत जास्त ६० इतकी असावी.

२) जिल्हा परिषद सदस्यासाठीचा मतदार संघ (गट) सामान्यपणे २५,००० ते ३५,००० लोकसंख्येसाठी असावा.

३) अनुसूचित जाती जमाती आणि स्त्रीया यामधून एकही सदस्य निवडून न आल्यास प्रत्येक एक सदस्य स्विकृत करावा.

४) जिल्हा परिषद हा त्रिस्तरावरील सर्वोच्च व सशक्त (शक्तीशाली) घटक असेल.

५) जिल्हा परिषदेवर निवडून येणारा सभासद त्याच कार्यक्षेत्रातील रहिवाशी असला पाहिजे.

तसेच तो मतदार संघातून निवडून आलेला असावा.

६) जिल्हा परिषदेचा सर्वाच्या संमतीने निवडलेला एक अध्यक्ष असावा. त्याच्या सहकार्याला एक उपाध्यक्ष असावा.

७) जिल्हा परिषदेचा प्रशासकीय कारभार पाहण्यासाठी (आय.ए.एस.) भारतीय प्रशासकीय सेवेतील एक स्वतंत्र अधिकारी नियुक्त करण्यात यावा.

६) पंचायत समितीच्या संदर्भातील शिफारशी :

जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद आणि तालुका विकास गटासाठी एक पंचायत समिती असेल या पंचायत समितीमध्ये

१) जिल्हा परिषदेच्या मतदार संघाचा दोन भागात विभागणी करुन पंचायत समितीचे दोन सदस्य निवडून येतील.

२) पंचायत समितीत जिल्हा परिषदेचे स्विकृत सदस्य/विक्री संघाचे अध्यक्ष पदसिध्द सभासद आणि शेतकी सहकारी सोसायटीचे अध्यक्ष स्विकृत सदस्य असतील.

३) पंचायत समितीमध्ये वर्गीकृत जाती, जमाती व महिला इत्यादीचा एक प्रतिनिधी निवडून आला नसेल प्रत्येक प्रवर्गातून एका प्रतिनिधीची नियुक्ती करण्यात यावी.

४) पंचायत समितीचा एक अध्यक्ष व उपाध्यक्ष असावा.

५) प्रशासकीय अधिकारी म्हणून गटविकास अधिकारी असावा.

**७) ग्रामपंचायतीच्या संदर्भातील शिफारशी :**

१) प्रत्येकी एक हजाराहून अधिक लोकसंख्या असलेल्या गावासाठी एक ग्रामपंचायत स्थापन करण्यात यावी. जिथे लोकसंख्या यापेक्षा कमी असेल तेथे शेजारील गावाला जोडून गट ग्रामपंचायत निर्माण करावी.

२) प्रत्येक ग्रामपंचायती साठी एका ग्रामसेवकाची नियुक्ती करावी. त्यावर ग्रामपंचायतीचे नियंत्रण असावे. तो ग्रामपंचायतीचा सचिव म्हणून कार्य करेल.

१) ग्रामपंचायतीला उत्पन्न मिळविण्यासाठी स्वतःची संसाधने निर्माण करावीत, स्वतंत्र निधीची तरतूद करावी. एकुण महसूलापैकी ३० टक्के निधी ग्रामपंचायतीला मिळावा.

२) प्राथमिक शिक्षणासंबंधीचे सर्व अधिकार ग्रामपंचायतीकडे असावेत.

३) ग्रामपंचायतीने न्यायदानाची भूमिका पार पाडावी.

४) अनुसूचित जाती व जमातीना व महिलांना प्रतिनिधीत्व दयावे.

५) ग्रामपंचायतीच्या प्रत्यक्षपणे निवडणुका घ्याव्यात. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायती संबंधी वसंतराव नाईक समितीने अनेक महत्वपूर्ण शिफारशी करुन आपला अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर केला.

Bhai Kishanrao Deshmukh ... Chakur 413...

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

**महाराष्ट्रातील पंचायतराजची वैशिष्टये :**

१) दोन कायद्यांतर्गत कार्यरत : महाराष्ट्र राज्यातील वर्तमानकालीन पंचायतराज पध्दती दोन कायद्यांतर्गत कार्यरत आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये राज्यातील ग्रामपंचायतीचा कारभार चालतो. तर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये राज्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आपले कार्य करतात.

२) आमदारांना प्रतिनिधीत्व नाही : महाराष्ट्रात लोकसभा सदस्य तसेच विधानसभा सदस्याला जिल्हा परिषद सदस्य म्हणून स्विकारले जात नाही. प्रत्येक सदस्याला प्रत्यक्षरित्या निवडणूक लढवून निवडून यावे लागते.

३) कामकाजासाठी विविध समित्या : महाराष्ट्र राज्यात जिल्हा परिषदांचे कामकाज विविध समित्यांना विभागून दिले आहे. प्रत्येक समिती आपल्या कक्षेत येणारे कार्य सार्वभौमपणे करते. प्रत्येक जिल्हा परिषदेत किमान दहा समित्या असतात.

४) उपमंत्र्याचा दर्जा : पंचायतराज संस्थामध्ये अधिक चांगल्या व्यक्तींना आकर्षित करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाला महाराष्ट्रात उपमंत्र्याचा दर्जा देण्यात आला आहे.

सुविधा : जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच पंचायत समित्यांच्या सभापती व उपसभापतीस आकर्षक सुविधा व मानधन दिले जाते. महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था दोन कायदयावर आधारित आहे.

५) त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था : महाराष्ट्रातील पंचायतराजची रचना तीन स्तरावर करण्यात आली आहे. बलवंतराय मेहता समितीने तसेच महाराष्ट्रातील वसंतराव नाईक समितीने त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेचाच पुरस्कार केला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने त्रिस्तरीय पंचायतराजचा स्वीकार केला आहे.

६) प्रत्यक्ष निवडणूकाः महाराष्ट्रातील जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या तिन्ही संस्थामध्ये सहभागी होणारे सदस्य लोकनिर्वाचीत असले पाहिजे. ते प्रत्यक्षरित्या लोकाकडून निवडून आलेले असावे.

७) राज्यशासनाचे नियंत्रणः पंचायतराज संस्थाच्या कार्यकारी सत्तेवर राज्यशासनाचे नियंत्रण आहे. जसे जिल्हा परिषदेचा कार्यकारी प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी (सी.ई.ओ.) म्हणून काम पाहतो. त्यांची नियुक्ती राज्य शासनाकडून केली जाते.

८) जिल्हा परिषदेचे मध्यवर्ती स्थानः महाराष्ट्रातील पंचायतराज्याचे एक महत्वाचे वैशिष्टये असे सांगता येईल की, येथील पंचायत राज्यव्यवस्थेत जिल्हा परिषदेला मध्यवर्ती स्वरुपाचे स्थान प्राप्त झाले आहे. जिल्हा पातळीवर स्थापन करण्यात आलेली जिल्हा परिषद ही या व्यवस्थेतील सर्वात महत्वाची संस्था आहे. यापूर्वी पाहिल्या प्रमाणे बलवंतराय मेहता समितीने

विकास गट पातळीवरील पंचायत समितीला मध्यवर्ती स्थान देण्याची आणि तिला पंचायतराज्याची कार्यकारी संस्था बनविण्याची शिफारस आपल्या अहवालात केली होती.

९) पंचायत समितीचे स्थान : महाराष्ट्र पंचायत राज्याच्या व्यवस्थेत जिल्हा परिषदेला मध्यवर्ती स्वरुपाचे स्थान प्राप्त असल्याने पंचायत समितीचे कामकाज जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली चालविले जावे अशी व्यवस्था करण्यात आली आहे. पंचायत समिती ही जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायती यांच्यातील दुवा म्हणूनही कार्य करते.

१०) ग्रामिण पुनर्रचनेचे साधन :पंचायतीराज हे ग्रामिण पुनर्रचनेचे आणि ग्रामीण समाजाच्या सर्वांगिण विकासाचे एक महत्वाचे साधन आहे. कारण ग्रामिण समाजामध्ये परिवतर्न घडवून आणण्याच्या कामात पंचायतीराज संस्थाचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. तसे शेती सुधारणा, शिक्षण प्रसार, सहकार, समाज कल्याण, ग्रामसुधारणा, पाणीपुरवठा इत्यादी मध्ये पंचायतीराज संस्थांनी महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. ते कोणीही नाकारु शकत नाही.

११) ग्रामीण विभागासाठी व्यवस्था : महाराष्ट्रातील पंचातराज व्यवस्थेचे आणखी एक वैशिष्टये असे की, तिची निर्मिती राज्यातील ग्रामीण विभागासाठी करण्यात आली आहे. पंचायतराज्यांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामीण जनतेच्या प्रतिनिधिक संस्था आहेत. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या तिनही संस्थाच्या सभासदांची निवड राज्याच्या ग्रामीण विभागात वास्तव्य करणाऱ्या जनतेकडून किंवा मतदाराकडून केली जाते. या संस्थांचे कार्यक्षेत्रही ग्रामीण समाजापूरतेच मर्यादीत ठेवण्यात आले आहे.

१२) निर्वाचीत सभासदांच्या हाती सत्ता : महाराष्ट्रातील पंचायत राज्यांतर्गतजिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिनही स्थानिक स्वराज्य संस्थांचे बहुतांशी सभासद हे लोकांनी निवडून दिलेले असतात. या संस्थाच्या सभासदाची निवड प्रौढ मताधिकाराच्या तत्वानुसार होत असते.

Bhai Kishanrao Deshmukh Chakur 413513
PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

**जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीतील एकूण सदस्यसंख्येच्या तुलनेत अनुसूचित जमातीच्या सदस्यसंख्येचे प्रमाण किंवा टक्केवारी:**

| अ. क्र. | जिल्हा | एकूण सदस्यसंख्या | अनुसूचित जमातीची सदस्यसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | जिल्हा परिषद - ६३<br>पंचायत समिती -१२६ | जिल्हा परिषद - ०७<br>पंचायत समिती - १२ | ११.११%<br>९.५% |
| २ | हिंगोली | जिल्हा परिषद - ५०<br>पंचायत समिती -१०० | जिल्हा परिषद - ०६<br>पंचायत समिती - १४ | १२.००%<br>१४.००% |
| ३ | जालना | जिल्हा परिषद - ५५<br>पंचायत समिती -११० | जिल्हा परिषद - ०१<br>पंचायत समिती - ०२ | १.८%<br>१.८% |
| ४ | लातूर | जिल्हा परिषद - ५८<br>पंचायत समिती -११६ | जिल्हा परिषद - ०१<br>पंचायत समिती - ०१ | १.७%<br>०.८% |
| ५ | औरंगाबाद | जिल्हा परिषद - ६०<br>पंचायत समिती -१२० | जिल्हा परिषद - ०३<br>पंचायत समिती - ०५ | ५.००%<br>४.१६% |
| ६ | परभणी | जिल्हा परिषद - ५२<br>पंचायत समिती -१०४ | जिल्हा परिषद - ०१<br>पंचायत समिती - ०१ | १.९२%<br>०.९६% |
| ७ | बीड | जिल्हा परिषद - ६०<br>पंचायत समिती -१२० | जिल्हा परिषद - ०१<br>पंचायत समिती - - | १.६६%<br>- |
| ८ | उस्मानाबाद | जिल्हा परिषद - ५४<br>पंचायत समिती -१०८ | जिल्हा परिषद - ०१<br>पंचायत समिती - ०१ | १.८५%<br>०.९२% |
| ९ | सातारा | जिल्हा परिषद – ६७<br>पंचायत समिती – १३४ | जिल्हा परिषद – ०१<br>पंचायत समिती – ०१ | १.४९%<br>०.७४% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | वर्धा | जिल्हा परिषद - ५१<br>पंचायत समिती -१०२ | जिल्हा परिषद - ०७<br>पंचायत समिती - १५ | १३.७२%<br>१४.७०% |
| ११ | यवतमाळ | जिल्हा परिषद - ६२<br>पंचायत समिती -१२४ | जिल्हा परिषद - १४<br>पंचायत समिती - २३ | २२.५८%<br>१८.५४% |
| १२ | बुलढाणा | जिल्हा परिषद - ५९<br>पंचायत समिती -११८ | जिल्हा परिषद - ०४<br>पंचायत समिती - ०८ | ६.७७%<br>६.७७% |
| १३ | अकोला | जिल्हा परिषद - ५२<br>पंचायत समिती -१०४ | जिल्हा परिषद - ०५<br>पंचायत समिती - ०८ | ९.६१%<br>७.६९% |
| १४ | सोलापूर | जिल्हा परिषद - ६८<br>पंचायत समिती -१३६ | जिल्हा परिषद - ०१<br>पंचायत समिती - ०१ | १.४७%<br>०.७३% |
| १५ | धुळे | जिल्हा परिषद - ५४<br>पंचायत समिती -१०८ | जिल्हा परिषद - १८<br>पंचायत समिती - ३७ | ३३.३३%<br>३४.२५% |
| १६ | नंदूरबार | जिल्हा परिषद - ५३<br>पंचायत समिती -१०६ | जिल्हा परिषद - ३८<br>पंचायत समिती - ७६ | ७१.६९%<br>७१.६९% |
| १७ | अमरावती | जिल्हा परिषद - ५९<br>पंचायत समिती -११८ | जिल्हा परिषद - ०८<br>पंचायत समिती - ०५ | १३.५५%<br>१२.७१% |
| १८ | गोंदिया | जिल्हा परिषद - ५२<br>पंचायत समिती -१०४ | जिल्हा परिषद - ०९<br>पंचायत समिती - १८ | १७.३०%<br>१७.३०% |
| १९ | चंद्रपूर | जिल्हा परिषद - ५८<br>पंचायत समिती -१३६ | जिल्हा परिषद - ११<br>पंचायत समिती - २३ | १८.९६%<br>१९.८२% |

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | गडचिरोली | जिल्हा परिषद - ५१<br>पंचायत समिती -१०२ | जिल्हा परिषद - २०<br>पंचायत समिती - ४० | ३९.२१%<br>३९.२१% |
| २१ | नाशिक | जिल्हा परिषद - ७३<br>पंचायत समिती -१४६ | जिल्हा परिषद - १९<br>पंचायत समिती - ३९ | २६.०२%<br>२६.७१% |
| २२ | रायगड | जिल्हा परिषद - ६१<br>पंचायत समिती -१२२ | जिल्हा परिषद - ०८<br>पंचायत समिती - १६ | १३.११%<br>१३.११% |
| २३ | सांगली | जिल्हा परिषद - ६१<br>पंचायत समिती -१२२ | जिल्हा परिषद - ०<br>पंचायत समिती - ० | -<br>- |
| २४ | सिंधुदुर्ग | जिल्हा परिषद - ५०<br>पंचायत समिती -१०० | जिल्हा परिषद - ०<br>पंचायत समिती - ० | -<br>- |
| २५ | रत्नागिरी | जिल्हा परिषद - ५७<br>पंचायत समिती -११४ | जिल्हा परिषद - ०<br>पंचायत समिती - ० | -<br>- |
| २६ | कोल्हापूर | जिल्हा परिषद - ६९<br>पंचायत समिती -१३८ | जिल्हा परिषद - ०<br>पंचायत समिती - ०१ | -<br>०.७२% |
| २७ | भंडारा | जिल्हा परिषद - ५२<br>पंचायत समिती -१०४ | जिल्हा परिषद - ०४<br>पंचायत समिती - ०६ | ७.६९%<br>५.७६% |
| २८ | वाशिम | जिल्हा परिषद - ५०<br>पंचायत समिती -१०० | जिल्हा परिषद - ०४<br>पंचायत समिती - ०७ | ०.८%<br>०.७% |
| २९ | अहमदनगर | जिल्हा परिषद - ७५<br>पंचायत समिती -१५० | जिल्हा परिषद - ०६<br>पंचायत समिती - १३ | ०.८%<br>८.६६% |
| ३० | पूणे | जिल्हा परिषद - ७५<br>पंचायत समिती -१५० | जिल्हा परिषद - ०५<br>पंचायत समिती - ०९ | ६.६६%<br>०.६% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ | नागपूर | जिल्हा परिषद - ५९<br>पंचायत समिती -११८ | जिल्हा परिषद - ०६<br>पंचायत समिती - १२ | १०.१६%<br>१०.१६% |
| ३२ | जळगाव | जिल्हा परिषद - ६८<br>पंचायत समिती -१३६ | जिल्हा परिषद - १२<br>पंचायत समिती - २३ | १७.६४%<br>१६.९१% |
| ३३ | ठाणे | जिल्हा परिषद - ५५<br>पंचायत समिती -११० | जिल्हा परिषद - ११<br>पंचायत समिती - २६ | २०.००%<br>२३.६३% |
| ३४ | पालघर | जिल्हा परिषद - ५२<br>पंचायत समिती -१०४ | जिल्हा परिषद - १९<br>पंचायत समिती - ३७ | ३६.५३%<br>३५.५७% |

१) Infoelections.com>Maharashtra>244-live....

२) www.maharashtraspider.com>Resources

आधार १: २०१२-२०१७ या कालखंडातील वरील सर्व जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीमधील सदस्यांच्या जातीनिहाय याद्या.

**ग्रामपंचायतीतील एकूण सरपंच संख्येच्या तुलनेतअनुसूचित जमातीच्या सरपंच संख्येचे प्रमाण किंवा टककेवारी**

| अ. क्र. | जिल्हा | एकूण सरपंचाची संख्या | अनुसूचित जमातीच्या सरपंचाची संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | १३०८ | १२२ | ९.३२% |
| २ | हिंगोली | ५६५ | ६० | १०.६१% |
| ३ | जालना | ७७६ | १५ | १.९३% |
| ४ | लातूर | ७८३ | २१ | २.६८% |
| ५ | औरंगाबाद | ८५६ | ४१ | ४.७८% |
| ६ | परभणी | ७०४ | १८ | २.५५% |

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | बीड | १०२० | १४ | १.३७% |
| ८ | उस्मानाबाद | ६२२ | १२ | १.९२% |
| ९ | सातारा | १५०० | ०५ | ०.३३% |
| १० | वर्धा | ५१३ | ७३ | १४.२३% |
| ११ | यवतमाळ | १२०२ | २५७ | २१.३८% |
| १२ | बुलढाणा | ८३८ | ४३ | ४.९५% |
| १३ | अकोला | ५४३ | ३० | ५.५२% |
| १४ | सोलापूर | १०३० | १३ | १.२६% |
| १५ | धुळे | ५५० | १७४ | ३१.६३% |
| १६ | नंदूरबार | ५०१ | २५५ | ५०.८९% |
| १७ | अमरावती | ८३९ | १५८ | १८.८३% |
| १८ | गोंदिया | ५४९ | १०६ | १९.३०% |
| १९ | चंद्रपूर | ८४६ | १४९ | १७.६१% |
| २० | गडचिरोली | ४६७ | १८१ | ३८.७५% |
| २१ | नाशिक | १३७५ | १५५ | ११.२७% |
| २२ | रायगड | ८२४ | ९५ | ११.५२% |
| २३ | सांगली | ७०४ | ०८ | ०१.१३% |
| २४ | सिंधुदुर्ग | ४३२ | ०१ | ०.२३% |
| २५ | रत्नागिरी | ८४४ | ०७ | ०.८२% |
| २६ | कोल्हापूर | १०२९ | ०८ | ०.७७% |
| २७ | भंडारा | ५३८ | ४२ | ०७.८०% |
| २८ | वाशिम | ४९३ | १९ | ०३.८५% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | वाशिम | ४९३ | १९ | ०३.८५% |
| २९ | अहमदनगर | १३१४ | १०९ | ०८.२९% |
| ३० | पूणे | १४०६ | १२८ | ०९.१०% |
| ३१ | नागपूर | ७६९ | ८७ | ११.३१% |
| ३२ | जळगाव | ११५१ | १५१ | १३.११% |
| ३३ | ठाणे | ४३३ | १७६ | ४०.६४% |
| ३४ | पालघर | ४७७ | १७८ | ३७.३१% |

1) Detail List of Sarpanch in GP's SBM.gov.in/sbm sarpanch detail.
2) SwachhBharat Mission (G) Mis sbm.gov.in/sbmreport/report/contact/sbm_sar.

## संदर्भ सूची :-

१) आवाळे मनोज पंचायतराज कार्य कायदा- योजना, अनुबंध प्रकाशन, पुणे. पहिली आवृत्ती: १ जुलै २००७ पृ.१७
२) शिरसाठ शाम (डॉ.), बैनाडे भगवानसिंगः भारतीय स्थानिक स्वशासन विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद. सुधारित दुसरी आवृत्ती-जून, २०१० पृ. ४१,४२,४३
३) आवाळे मनोजः उपरोक्त क्रमांक.१, पृ.१७,१८
४) पोले कांतराव प्रल्हादराव (डॉ.) - महाराष्ट्रातील पंचायतीराज आणि महिला आरक्षण - अरुणा प्रकाशन, लातूर- प्रथम आवृत्तीः जानेवारी २००९. पृ. ३८,३९
५) पाटील व्ही.बी.: महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- के.सागर पब्लिकेशन,पुणे, आवृत्ती २००५ पृ.९१
६) मोरे विठ्ठल (डॉ.), पवार कुसूम (डॉ), सोलापूरे राजशेखर, मोरे संग्राम (डॉ.) - महाराष्ट्र शासन आणि राजकारण- अरुणा प्रकाशन, लातूर. प्रथम आवृत्तीः २ ऑक्टोंबर २०१०, पृ.९४.
७) पोले कांतराव प्रल्हादराव (डॉ.) - महाराष्ट्रातील पंचायतीराज आणि महिला आरक्षण - उपरोक्त क्रमांक.४ पृ.३२,३३,३४

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

८) पाटील वा.भा.(डॉ.) पंचायतराज-प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव. प्रथम आवृत्ती २००९. पृ.१०२

९) पोले कांतराव प्रल्हादराव (डॉ.) - महाराष्ट्रातील पंचायतीराज आणि महिला आरक्षण - उपरोक्त क्रमांक.४ पृ.४१,४२,४३,४४

१०) वाबळे द.चं., स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिलांचे राजकीय योगदानः पुणे जिल्हा परिषदेत महिलांचा सामाजिक व राजकीय सहभाग पी.एच.डी. प्रबंध पूणे विद्यापीठ, पूणे, डिसेंबर २००२ पृ. ३१.

११) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग,२००१ पृ.१३

१२) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मुंबई २००२, दुसरी आवृत्ती, पृ.१६४

१३) मोरे विठ्ठल (डॉ.), पवार कुसूम (डॉ), सोलापूरे राजशेखर, मोरे संग्राम (डॉ.) - महाराष्ट्र शासन आणि राजकारण- उपरोक्त क्रं.६ पृ. ११५,११६

१४) शिरसाठ शाम (डॉ.), बैनाडे भगवानसिंगः भारतीय स्थानिक स्वशासन उपरोक्त क्र.२ पृ. १२४

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

10/2018

CURRENT GLOBAL REVIEWER

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

10

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

**Half Yearly** Nov. 2017-Apr. 2018 | **UGC Approved** | **ISSN : 2319 - 8648**
Issue X Vol II, Jan. 2018 | **Sr. No. 64310** | **Impact Factor : 2.143**


| | | | |
|---|---|---|---|
| 17 | ॲरिस्टॉटलच्या 'नैतिक सदगुण' संकल्पनेचा अन्वयार्थ | पंडगे संतोष रमेशराव | 74 |
| 18 | ग्रामीण साहित्य संकल्पना व स्वरूप | प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने | 77 |
| 19 | विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा विकासासाठी कार्यक्रमनिर्मितीचा अभ्यास | प्रा.मरेवाड पी.पी. | 81 |
| 20 | *स्त्री उत्थानातील डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या कार्य व चळवळीचे योगदान* | *डॉ.पी.जी. राठोड* | 86 |
| 21 | नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथालेखनातील स्त्रीजीवन | प्रा.डॉ.लक्ष्मण ना.वाघमारे | 90 |
| 22 | सूर का गीतकाव्य | स.प्रा.डॉ. राजेश प्रल्हादराव आरदवाड | 93 |
| 23 | मालती जोशी की कहानियों में स्त्री विमर्श | डॉ. लहाडे मुरलीधर अच्युतराव | 98 |
| 24 | औसा तालुक्यातील जलव्यवस्थापन : एक भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ.आर.एस. धनुश्वर | 102 |
| 25 | बौद्ध धर्म आणि स्त्री जिवन | प्रा.डॉ. बी.एस. लासुरे | 105 |


PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 Issue X Vol II, Jan. 2018 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143 |
|---|---|---|

# बौद्ध धर्म आणि स्त्री जिवन

**प्रा.डॉ. बी.एस. लासुरे**
इतिहास विभाग प्रमुख , भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर

-----------------(26)-----------------

**प्रस्तावना :-**

भारतीय समाजात पुर्व वेदकाळापर्यंत स्त्रियांना सामाजिक, धार्मिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात असलेले स्वातंत्र्य, अधिकार आणि हक्क उत्तर वेदकाळापासून स्त्रियांवर बंधने येत गेली आणि स्त्रियांचे स्वातंत्र्य हळूहळू हिराऊन घेण्यात येऊ लागले. समाजव्यवस्थेत पुरूषांचे वर्चस्व वाढत गेले आणि यामुळे स्त्रियांच्या जिवनात अनेक समस्या निर्माण होत गेल्या. तिच्या शोषणाला सुरूवात झाली. त्यामुळे ती गुलामगिरीच्या गर्तेत अडकली जाऊन तिची गळचेपी सुरू झाली.

इ.स.पू. ६ व्या शतकात गौतम बुद्धानी बौद्ध धर्माची स्थापना केली. बौद्ध धर्म उदयास येण्यासाठी जी कारणे कारणीभूत होती त्यात यज्ञ पद्धतीचे वाढते महत्त्व, ब्राह्मण वर्णाचे वाढत असलेले वर्चस्व, शुद्रांची दुरावस्था, वैदिक धर्मात आलेली कर्मकांड पद्धत, इत्यादी कारणांबरोबरच महत्त्वाचे कारण म्हणजे स्त्रियांची होत असलेली गळचेपी हे होते आणि म्हणून बुद्धाने आपल्या धर्मात समतेच्या तत्त्वाला महत्त्व दिले. स्त्रि-पुरूष समानता बुद्धांना मान्य होती. त्यांच्या या समतेच्या तत्त्वामुळे कांही प्रमाणात का होईना स्त्रियांना सामाजिक आणि धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त झालेले दिसते.

**उद्दिष्टे :**

- बौद्ध धर्मातील स्त्रियांच्या दर्जाचा अभ्यास करणे.
- प्राचीन काळातील स्त्री जिवनावर प्रकाश टाकणे.

बौद्ध धर्मात प्रवेश करण्याची अत्यंत सोपी आणि सरळ पद्धत गौतम बुद्धाने निर्माण केलेली होती. ज्यांना बौद्ध धर्माची दिक्षा घ्यावयाची आहे त्यांना आपले मुंडन करून पीतवस्त्रे अंगावर परिधान करून संघाच्या अध्यक्षासमोर उभे राहून बुद्ध धर्म आणि संघ यांच्याशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागत असे. या संघातील प्रचारक प्रारंभी आजन्म संन्यस्त वृत्तीने राहून धर्म प्रसार करीत असत. प्रत्येक भिक्षुणा कडक ब्रह्मचर्याचे पालन करावे लागत असे.

गौतम बुद्धाने आपल्या धर्म शिकवणुकीत समतेच्या तत्त्वाला महत्त्व दिले. स्त्री-पुरूष असा भेद त्यांना मान्य नव्हता. त्यांच्या धर्मात जातीभेदाला थारा नव्हता. सर्व माणसे समान आहेत. जन्माने कांही श्रेष्ठ आणि कनिष्ठ असत नाही. जात, पंथ, वर्ण, स्पृश्य, अस्पृश्य असा कसल्याच प्रकारचा भेद त्यांना मान्य नव्हता. वैदिक धर्मात सामाजिक विषमता निर्माण झालेली होती. ती विषमता दुर सारावयाची असल्यानेच त्यांनी या तत्वास मान्यता दिली. हीन कुळातील स्त्री व उच्च कुळातील स्त्री असा भेदही त्यांना मान्य नव्हता.

गौतम बुद्ध स्त्री विषयी विचार मांडताना म्हणतात, स्त्री ही सर्वोत्कृष्ट देणगी आहे. तिची उपयुक्तता अमोल आहे. स्त्रीयांपासूनच बोधिसत्त्व व चक्रवर्ती जन्म घेतात. मुलगी मुलापेक्षा प्रभावी ठरू शकते. ती विद्वान व सद्गुणी असते. ती अशा एखाद्या पुत्रास जन्म देते की तो कर्तृत्त्ववान होईल आणि एका विस्तीर्ण प्रदेशाचा सम्राटदेखील होईल. बालविवाहाची प्रथा गौतम बुद्धास मान्य नव्हती.



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

CURRENT GLOBAL REVIEWER

| Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| Issue X Vol II, Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143 |

स्त्रियांच्या आध्यात्मिक उन्नतीची माहिती देणारा पाली भाषेतील 'थेरीगाथा' ग्रंथ उपलब्ध आहे. यात थेरी (वृद्ध) संन्यासिनीचे चरित्रात्मक वर्णन आहे. या संन्यासिनीत महाप्रजापती, यशोधरा, खेमा, मुक्ता, सुमेधा, सुमंगला, सुंदरीनंद, कुंडलकेशा, विशाखा या प्रमुख स्त्रियांचा समावेश होतो.

गौतम बुद्धाने बौद्ध धर्माची स्थापना केल्यानंतर त्यांच्या आईच्या मनातही बौद्ध धर्म स्वीकारून त्या धर्माचा प्रसार करण्याचे विचार आले. प्रारंभी गौतम बुद्धाने आईला बौद्ध धर्मात घेण्यास विरोध दर्शविला. परंतु नंतर त्यांच्या आईने ५०० स्त्रियांच्या सोबत बौद्ध धर्म स्वीकारून कपीलवास्तू ते वैशाली असा प्रवास केला. हा प्रवास करण्यामागे त्यांचा उद्देश बौद्ध धर्मात स्त्रियांना सामाऊन घेणे हाच होता.

गौतम बुद्धाचे शिष्य आनंद यांच्या आग्रहाने स्त्रियांना बौद्ध धर्मात प्रवेश देणे मान्य केले. गौतमी हिच्या अध्यक्षतेखाली 'भिक्खुनी संघाची' स्थापना करण्यात आली. स्त्रियांनाही मोक्षप्राप्तीचा अधिकार देण्यात आला. अनेक स्त्रिया कौटुंबिक जाचास कंटाळून आणि सामाजिक समतेचा स्वीकार करून स्वतःस मोक्षप्राप्ती प्राप्त व्हावी. या उद्देशाने 'भिक्खुनी संघात' मोठ्या प्रमाणात सामील होऊ लागल्या. या सर्व बाबींमुळे बौद्ध धर्माचा प्रसार होण्यासही मोठी मदत झाली.

स्त्रियांना बौद्ध धर्म दिक्षा देताना अतिरिक्त आठ नियम लागू केले. यात भिक्षुणीने कोणत्याही परिस्थितीत भिक्षुला शिवी देऊ नये. भिक्षुणीने भीक्षुला उपदेश करू नये, भिक्षुणीने लहान-थोर सर्व भिक्षुंना नमस्कार करावा, ज्या गावात भिक्षुचे वास्तव्य आहे त्या गावात भिक्षुणी राहू नयेत. आपल्या चुका भिक्षु संघापुढे मान्य कराव्यात. भिक्षुणीने भिक्षुबद्दल अनुचित बोलू नये. इत्यादी सूचना बुद्धानी केलेल्या होत्या. त्यांनी निर्माण केलेले हे नियम स्त्रियांवर बंदने टाकणारी नसून संघात शिस्त निर्माण व्हावी. बौद्ध धर्म प्रसारास अडथळे निर्माण होऊ नयेत हाच त्यांचा एकमेव उद्देश होता.

गौतम बुद्धाने स्त्री-पुरूष यांना वेगवेगळी अन्तरिक आणि बाह्य शारीरिक स्वरूपातील भिन्नता असते हे मान्य केले. स्त्री-पुरूषांच्या मानसिक भिन्नताही त्यांनी मान्य केली होती. मात्र स्त्री-पुरूषातील उच्च आणि निच असा भेद केला नाही. त्यांनी दोघांनाही समतेच्या तत्वात बसवण्याचा प्रयत्न केला. बौद्ध धर्मप्रसारात स्त्रियांचाही सिंहाचा वाटा होता. देशात व परदेशात धर्म विस्तारित करण्यात त्यांना मोठे यश प्राप्त झाले. त्यांच्या नियमामुळे संघात त्यागी असे धर्मप्रसारकाच्या पिढ्या निर्माण झाल्या आणि हजारो भिक्षुणींनी जगाच्या कानाकोप-यात हिंडून बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार केला.

हिन्दु धर्मातील कर्मकांडाचा निषेध म्हणून बौद्ध धर्म अस्तित्वात आला असला तरी स्त्रियांवर होत असलेल्या अत्याचार त्यांचे जीवन जगण्याचे हिरावून घेतलेले स्वातंत्र्य, अधिकार व हक्क त्यांना परत मिळवून देण्याचा उचीत असा प्रयत्न गौतम बुद्धाच्या धर्म शिकवणुकीत दिसून येतो. त्यांनी जे मुलभूत सिद्धांत मांडले, त्यामुळे स्त्रियांच्या परिस्थितीत नक्कीच सुधारणा झाली. स्त्रियांना आत्मविकासाची संधी दिली हे सत्य होय.



PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur

CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol II, Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

**निष्कर्ष :**

इ.स.पू. सहाव्या शतकापर्यंत भारतीय स्त्रियांचे समाजव्यवस्थेनी हिरावून घेतलेले स्वातंत्र्य गौतम बुद्धानी मर्यादीत अर्थाने का होईना स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीस प्रारंभ केलेले दिसते. त्यांनी स्त्रियांना मोक्ष प्राप्तीचा मार्ग खुला केला. बुद्ध धर्मात स्त्रियांना धर्मप्रसाराचे कार्य करण्यास परवानगी दिल्यामुळे हजारो स्त्रिया बौद्ध धर्माकडे आपोआपच आकर्षीत झाल्या. राजकुळातील स्त्रियांनादेखील यामुळे भिक्षुणी बनुन धर्मप्रसाराचे कार्य करता आले. स्त्री-पुरूष समानता जोपासण्याचा प्रयत्न बौद्ध धर्माने केलेला दिसतो. स्त्रीमुक्तीचे गौतम बुद्ध हे पहिले उद्‌गारते म्हणून संबोधता येते.

**संदर्भसूची :**

१) डॉ. एस. एस. गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१७.
२) विकिपीडिया, बौद्ध धर्म
३) विकिपीडीया, बुद्ध का स्त्री विमर्श
४) प्रा. पी.जी. जोशी, भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००२.
५) डॉ. अनिल कठारे, भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१३.
६) विकिपीडिया, श्री. चतुरसेन शास्त्री, बौद्ध धर्म में स्त्रियोंका स्थान.
७) प्रा.सौ. माधवी कवी, १०१, श्रेष्ठ महिला, विद्याभारती प्रकाशन, लातूर.
८) प्रा.का.रा. रडे, प्राचीन भारत, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१४.



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

(8)
2016

ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# UNIVERSAL
## RESEARCH ANALYSIS

(UGC Approved & Peer Reviewed Research Journal)

Year - VIII, Issue - XV, Vol.- IX | Impact Factor 3.18 (GRIFI) | Sept. 2017 To Feb. 2018

URA

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

**EDITOR IN CHIEF**

**Dr. BALAJI KAMBLE**

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Challenges before Indian Agriculture Sector<br>**Dr. Aarti W. Khadatkar** | 1 |
| 2 | Issues of National Security in India<br>**Dr. Sachin S. Jaiswal** | 9 |
| 3 | वैश्वीकरण के दौर में हिंदी की स्थिति तथा भविष्य<br>**डॉ. गौतम भाईदास कुवर** | 13 |
| 4 | झूलनट में नारी-विमर्श<br>**डॉ. सविता व्ही. रूक्के** | 19 |
| 5 | भक्ति की भागीरथी संत मीराबाई<br>**डॉ. बालाजी श्रीपती भुरे** | 23 |
| 6 | टर्म इन्शुअरन्स - एक सुरक्षा कवच<br>**अमोल राऊत** | 30 |
| 7 | विशेष आर्थिक क्षेत्राचे परिणाम<br>**महादेव एस. मस्के** | 36 |
| 8 | राजर्षी शाहू यांचे अस्पृश्यासाठींचे कार्य<br>**शालीग्राम गोपाळराव शिंदे** | 41 |
| 9 | ७३ वी घटना दुरुस्ती व अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची तरतुद<br>**नागोराव एस. आसोले** | 46 |
| 10 | सामाजिक संशोधनामध्ये अहवाल लेखन कौशल्य : एक अभ्यास<br>**डॉ. बाळू भिंगोले** | 56 |



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

9

# ७३ वी घटना दुरुस्ती व अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची तरतुद

**नागोराव एस. आसोले**
राज्यशास्त्र विभाग,
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर, जि. लातूर (महाराष्ट्र) भारत

Research -Political Science

**राज्यघटनेची पार्श्वभूमी :**

इ.स.१९५१ पासून ते २०१६ पर्यंत भारताच्या राज्यघटनेमध्ये ........ वेळा घटनादुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. भारताची राज्यघटना एका विशिष्ठ कालावधीत तयार केलेली असल्यामूळे परिस्थितीनूसार घटनेमध्ये बदल करणे आवश्यक आहे. या संदर्भात वुड्रो विल्सन म्हणतात की, "कोणतेही संविधान निश्चित स्वरुपात जीवनाला प्रेरक असले पाहिजे". यावरुनच आपणास असे म्हणता येईल की मानवी जीवनामध्ये जसे परिवर्तन होईल जसा विकास होईल त्याप्रमाणेच राज्यघटनेचा विकास होणे आवश्यक आहे.

परंतु आतापर्यंतच्या सर्व घटनादुरुस्तीचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, या घटनादुरुस्ती राजकीय बदलासाठी, संसदीय अधिकारासाठी, जमीन सुधारणा कायद्यासाठी, निवडणुकीसाठी, आरक्षणासाठी घटनादुरुस्त्या झालेल्या आहेत, तर काही घटनादुरुस्त्या अनाआवश्यकपणे करण्यात आल्या आहेत. जसे एकाच उदेशासाठी एकाच कारणासाठी अनेकवेळा घटनादुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. उदा. अनुसूचित जाती व जमातीच्या आरक्षणाच्या संदर्भात ४५ वी, ७९वी आणि ८२ वी घटनादुरुस्ती करण्यात आलेली आहे. आतापर्यंतच्या झालेल्या घटना दुरुस्तीमधील सर्वात मोठी घटनादुरुस्ती म्हणजे ४२ वी घटनादुरुस्ती होय. या घटनादुरुस्तीमूळे राज्यघटनेतील जवळपास ४८ कलमामध्ये दुरुस्ती करण्यात आली. तसेच भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष या दोन नवीन शब्दांची भर घालण्यात आली. थोडक्यात

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

४२ वी घटनादुरुस्ती म्हणजे जणू काही एका नवीन राज्यघटनेचीच निर्मिती होती. तरीसुध्दा ग्रामीण विकास आणि ग्रामीण परिवर्तन हे घटनादुरुस्तीपासून दूर राहिलेले आहे. ग्रामीण विकासाकडे दुर्लक्ष करण्यात आले.

पंचायतराज संस्थाच्या निवडणूका अनियमितपणे होतात. कारण त्यांच्यावर राज्यांच्या कायद्याचे नियंत्रण आहे. घटनेमध्ये याबाबतीत आदेश दिलेले असतात. पंचायतराज संस्थाच्या निवडणूका घटणात्मक आदेशाद्वारे नियमितपणे, देखरेखेखाली व नियंत्रणात व्हाव्यात अशी गरज स्पष्ट करण्यात आली. पंचायत राज संस्थामध्ये महिलांना कमी प्रतिनिधीत्व मिळते वस्तूतः ग्रामीण भारतातील निम्म्याहून अधिक कामे महिलाच करत असल्याने ही फार खेदाची बाब आहे. या महिलांच्या हाती घराचे कल्याण व ग्रामीण अर्थव्यवस्था आहे.

केन्द्र व घटक राज्यामध्ये ज्याप्रमाणे सत्ता विभाजन आहे. अधिकारांच्या विभागणीनूसार तिन विषय सूची दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे घटक राज्यांनी आपले काही अधिकार विषय पंचायतराज संस्थाकडे हस्तांतरीत करावेत. परंतू त्यांना केवळ अधिकार देऊन भागणार नाही तर त्या अधिकाराचा वापर करण्यासाठी त्यांना निधी दिला पाहिजे. या निधीचा गैरवापर होऊ नये याची काळजी घेतली पाहिजे.

**आरक्षणाची संकल्पना :**

धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय समाजाची रचना चातुर्वर्ण्य जातीवर आधारित आहे व अस्पृश्यता जातिवादाचे अपत्य आहे ही बाब आता सर्वसामान्य झालेली आहे. वास्तविक पाहता जगातील सर्वच राष्ट्रात विषमता आहे पण ती आर्थिक स्वरुपाची आहे. भारतीय विषमता मात्र आर्थिक बरोबरच सामाजिक देखील आहे. जन्मावरुन जात व जातीवरुन व्यवसाय निश्चित होत असल्यामुळे व्यक्तीच्या व्यक्ती स्वातंत्र्यावर व व्यावसायिक गतिशीलतेवर मर्यादा येतात. त्यामुळे व्यक्तीकडे असणाऱ्या निर्णय व निर्माण क्षमतेचा तसेच नैसर्गिक गुणांचा योग्य वापर होऊ शकत नाही. वास्तविक पाहता प्रत्येक व्यक्ती जन्मतः स्वतंत्र्य असते व तिचे हित तिला कळत असते म्हणून ती सतत आपला विकास साधण्याचा प्रयत्न करते त्यातून त्यांचा विकास तर होतोच होतो पण राष्ट्रविकासही घडून येतो. पण जन्मतः मिळालेल्या स्वातंत्र्याचा संकोच झाल्यास मात्र व्यक्तीच्या पर्यायाने राष्ट्राच्या विकासात अडथळा निर्माण होतो.

**आरक्षणाचा अर्थ व दृष्टीकोन :**

आरक्षण हा शब्द आधुनिक काळात सर्वपरिचित झाला आहे कारण "आरक्षण" हे आमच्या आधुनिक जीवनाचा एक भाग बनले आहे. आपल्या सोयी व सुरक्षततेसाठी, उदिष्टपूर्तीसाठी आरक्षण आवश्यक बनले आहे. उदा. रेल्वेचे आरक्षण, बसचे, लॉजचे एवढेच नव्हे तर शहरी हॉटेल्समध्ये जेवणाच्या टेबलाचेही आरक्षण होऊ लागले आहे. याला कुणाचा आक्षेप नाही, विरोध नाही. पण

आक्षेप, विरोध, चर्चा होते ती समाज जीवनात मागासवर्गीयांच्या उत्थानासाठी ठेवलेल्या आरक्षणाची. आरक्षण शब्द 'समान वाटप' किंवा 'सर्वांना समान' हा चूकीचा अर्थ आज घेतला जाऊ लागला. म्हणून आज इतराप्रमाणे आपल्यालाही आरक्षण मिळावे अशी मागणी केली जाऊ लागली आहे. आरक्षणाचा अर्थ किंवा प्रमुख हेतू 'सर्वांना समान वाटप' असा नाही. समाजातील दुर्बल घटकांना आपले अधिकार उपभोगण्यासाठी निर्माण करुन दिलेली ही विशेष संधी म्हणजे आरक्षण होय. किंवा आपल्या इहलौकिक जिवनात काही जातीना विकासाची संधी मिळावी म्हणून देण्यात आलेली विशेष सवलत म्हणजे आरक्षण होय.

**महात्मा फुलेंचे आरक्षणविषयक विचार :**

पेशवाईच्या विषमतापूर्ण समाजव्यवस्थेच्या पाऊलखुणा अगदी ठळक असतानाच महात्मा फुलेंचा जन्म १८२७ मध्ये झाला. कनिष्ठ वर्गात जन्माला आल्यामुळे कनिष्ठ वर्गाची दुःख त्यांनी अनुभवलेली होती. महाराष्ट्रातील बहुजन वर्गाचा उध्दार हे त्यांचे जीवन अभियानच होते. बहुजनाच्या उन्नतीसाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. शैक्षणिक चळवळ चालविली अस्पृश्यता निवारणाचे कार्यक्रम चालविले व आर्थिक उन्नतीसाठी म्हणून आरक्षणाची मागणी केली. आपल्या समग्र विश्लेषनात त्यांनी समाजाची ब्राम्हण व ब्राम्हणेतर अशी विभागणी केली. शुद्रातिशूद्र वर्ग अक्षरशुन्य असल्यामूळे त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव आहे. विविध चालीरिती, रुढी परंपरेचे पालन करण्यात तो आर्थिकदृष्टया पूर्णतः जागवला जाऊन कर्जबाजारी बनत असे. पुढे कर्ज पध्दतीतूनही त्याचे शोषनच होत असे. तात्पर्य तो सामाजिक, आर्थिक व राजकीयदृष्टया पंगु झालेला होता. याचा फायदा शोषक भट ब्राम्हण वर्ग घेत होता.

**छत्रपती शाहू महाराज आणि आरक्षणविषयक धोरण :**

'जाणता राजा' म्हणून राजर्षी शाहू महाराज इतिहासाला परिचित आहेत. महात्मा फुलेंचे समाज उध्दाराचे कार्य अगदी जोमात असताना शाहू महाराजांची शैक्षणिक व मानसिक घडण होत होती. महात्मा फुलेंच्या अवघ्या चार वर्षानंतरच करवीर संस्थानाच्या सत्तेची सुत्रे छत्रपती शाहूनी आपल्या हाती घेतली याचा अर्थ महात्मा फुलेंच्या ध्येयवादाला शासकीय ठरावाचा आधार देण्यासाठीच जणू महाराजांचा जन्म झालेला होता असे वाटते व त्या पध्दतीने त्यांनी पुढे जन्मभर समाज उन्नतीचे कार्यही केले.

राज्यातील सामाजिक, आर्थिक व राजकीय सुधारणा करणे महाराजांचा ध्येयवाद होता. तत्कालीन मुंबई सरकारने छत्रपती शाहूंना ताकीद दिली की, संस्थानाच्या हद्दीबाहेर त्यांनी कसलीही चळवळ करु नये याला छत्रपतीनी सडेतोड उत्तर दिले. महाराष्ट्रातील अस्पृश्यासकट तमाम मागासलेल्या बहुजन समाजाचा उध्दार हे माझे पवित्र जीवन कार्य आहे.यावरुन त्यांच्या जीवनमानाची कल्पना येते. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्याभिषेक झाला.महाराजांनी प्रथमतः

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh Jr. College, Chakur

संस्थानाचे सामाजिक अवलोकन केले तेंव्हा त्यांना असे आढळले की, राज दरबाराच्या सेवेत असणाऱ्या सरकारी नोकरात ब्राम्हणांचा वाटा ८५ टक्के तर ब्राम्हणेतर वाटा केवळ १५ टक्के होता.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आरक्षण :**

दलितांचे 'मसिहा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म कनिष्ठ जातीत झाला होता म्हणून अस्पृश्य लोकांचे हाल व दुःख त्यांनी स्वतः अनुभवलेले होते. अस्पृश्य हिंदूची अवस्था गुलामापेक्षाही भयानक आहे त्याला या चक्रातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी आरक्षणाचा आग्रह धरला. हमखास उत्पन्न देणारे एकही आर्थिक साधन अस्पृश्यांच्या हाती नसल्यामूळे त्यांना केवळ स्पृश्य हिंदूच्या कृपेवरच उदरनिर्वाह करावा लागतो म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एका बाजूने अस्पृश्यता निवारणाबरोबरच अस्पृश्यांमध्येच स्वाभिमान जागविण्याचे कार्य केले तर दूसऱ्या बाजूने राखीव जागांसाठी ते सतत झगडत राहिले.१३अस्पृश्यतेचा नायनाट करणे, अस्पृश्यांना संघटीत करणे व राखीव जागासाठी सतत प्रयत्न करत राहणे हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा हेतु हौता.

अल्पसंख्याक अस्पृश्य जातीना घटनात्मक संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी तीन पातळयावरच्या आरक्षणाची मागणी केली. १) कायदेमंडळातील आरक्षण २) कार्यकारी मंडळातील प्रतिनिधीत्व ३) सरकारी नोकऱ्यामधील प्रतिनिधीत्व त्याही पुढे जाऊन बाबासाहेब म्हणतात, सरकारी नोकऱ्यात कोणत्याही एका समाजाला प्राधान्य मिळू नये किंवा सर्व जातीजमातीमध्ये त्या जागा ठरावीक प्रमाणात विभागल्या जाव्यात याचाच अर्थ आरक्षणात ही एकाच जातीचे वर्चस्व होऊ नये यासाठी दक्ष राहण्याचा सल्ला ते देतात. १४ डॉ. आंबेडकरांच्या मते कोणत्याही एका वर्गाचे वर्चस्व प्रस्थापित होवू नये तर सर्वच वर्गामध्ये जागाची विभागणी योग्य प्रमाणात झाली पाहिजे याचाच अर्थ आरक्षणाच्या माध्यमातूनही एकाच जातीचे प्राबल्य दिसू नये.

१९४७ साली त्यांनी घटना कशी असावी याचा एक मसुदा सरकारला सादर केला, तो अल्पसंख्यांक आणि राज्य या नावाने आज ओळखला जातो. यातही आरक्षणाची मागणी त्यांनी केलेली आहे. डॉ.बाबासाहेबांच्या आरक्षण विषयक धोरणाची असंख्य उदाहरणे देता येतील. आरक्षणातून व्यक्तिविकास व व्यक्तिविकासातून राष्ट्रविकास हे त्यांचे ब्रीद होते. पण केव्हाही, कोणत्याही प्रांतात बहुसंख्य जमातीतील लोकांना ४० टक्के पेक्षा अधिक जागा असू नयेत असेच त्यांचे मत होते.

'राखीव जागा' ही व्यवस्था काही या देशाला नवीन नाही. बरोबर शंभर वर्षापूर्वी याचा उगम झालेला आपल्याला दिसतो. राजर्षी शाहू महाराजानी या राखीव जागांची सुरवात आपल्या संस्थानात १९०२ साली केली. सरकारी पदनियुक्ती मधील ५० टक्के जागा राखून ठेवल्या आपल्या कोल्हापूर संस्थानातील बहुजन समाजातील कुणबी, माळी, तेली, वंजारी, धनगर आणि दलित, आदिवासी, भटके, विमुक्त या सर्वांसाठी या राखीव जागांची सोय करुन महाराजानी समतेची वाट भक्कम

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur
413513



केली.

**७३ व्या घटनादुरुस्तीतील आरक्षण :**

भारतीय राज्यघटनेच्या कलम २४३ (ड) नुसार पंचायतराज संस्थामधील आरक्षण खालीलप्रमाणे निश्चित केले आहे.

१) ७३ व्या घटनादुरूस्तीने तिन्ही स्तरावरील पंचायतीराज संस्थामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्याची तरतूद केली आहे.

२) नागरिकांच्या मागासवर्गातील लोकासाठी पंचायती संस्थामध्ये २७ टक्के राखीव जागा आरक्षीत केल्या आहेत.

३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षित असलेल्या जागापैकी एक-तृतीयांश जागा त्या-त्या प्रवर्गातील महिलासाठी राखीव असाव्यात अशी ही तरतुद या कायद्यात आहे.

४) राखीव ठेवलेल्या जागांच्या आरक्षणाचा लाभ त्या-त्या प्रवर्गाला मिळावा म्हणून आरखण आळीपाळीने सर्व जागांना लागू करण्यात आले आहे.

**७३ वी घटनादुरुस्ती :**

पंचायत राज व लोकशाही विकेन्द्रीकरणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण पर्वास प्रारंभ करणारी घटना म्हणजे भारतीय राज्य घटनेतील ७३ वी घटनादुरुस्ती विधेयक होय. डॉ.लक्ष्मीपाल सिंघवी समितीच्या शिफारशींना अनुसरुन राजीव गांधी सरकारने पंचायतराज घटना दुरुस्ती विधेयक तयार केले. मात्र तिसऱ्या प्रयत्नात या विधेयकाचे अधिनियमात रुपांतर झाले.

श्री.राजीव गांधीनी 'नया पंचायत राज' या घोषणेला वास्तवात आणण्यासाठी सिंघवी समितीच्या अहवालावरुन ६४ वे पंचायतराज घटना दुरुस्ती विधेयक तयार केले. १५ मे १९८९ ला ते संसदेत सादर करण्यात आले त्यानंतर १० ऑगस्ट १९८९ ला हे विधेयक लोकसभेत ३८३ विरुध्द शून्य मतांनी पारित झाले. मात्र राज्यसभेत ते केवळ तीन मतांनी फेटाळले गेले. त्यामुळे पंचायतराज घटनादुरुस्ती विधेयकाचा पहिला प्रयत्न अयशस्वी ठरला.

श्री.व्ही.पी.सिंघ व चंद्रशेखर या दोन्ही पंतप्रधानांच्या काळात या विधेयकावर संसदेत चर्चा होऊ शकली नाही, आणि सप्टेंबर १९९० ला लोकसभा भंग करण्यात आली. हा दुसरा प्रयत्न ही अयशस्वी झाला.

श्री.पी.व्ही.नरसिंहराव यांच्या काळात पंचायतराज घटनादुरुस्ती विधेयक २२ डिसेंबर १९९२ ला संसदेत सादर करण्यात आले. या विधेयकाला २२ डिसेंबर १९९२ ला लोकसभेने, तर २३ डिसेंबर १९९२ ला राज्यसभेने मान्यता दिली. त्यानंतर या विधेयकाला १७ घटकराज्यांच्या

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

विधीमंडळानी संमती दिली. २० एप्रिल १९९३ ला राष्ट्रपतीनी या विधेयकावर स्वाक्षरी केली, आणि पंचायतराज संस्थेला घटनात्मक दर्जा मिळाला. २४ एप्रिल १९९३ पासून ७३ वे घटनादुरुस्ती अधिनियम १९९२ ची अंमलबजावणी सुरु झाली.

महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा १९६१ मध्ये या अनुषंगाने १९९४ साली बदल केले. या घटनादुरूस्तीद्वारे सुचविण्यात आलेल्या काही शिफारशी १९९२ सालीच महाराष्ट्राने स्विकारल्या होत्या. जिल्हा नियोजन आणि विकासाचे अधिकार, महिलांसाठी ३० टक्के राखीव जागा, जिल्हा परिषद अध्यक्षाला राज्यमंत्र्याचा दर्जा या त्या शिफारशी होत्या.

**अनुसूचीत जमातीच्या आरक्षणाची घटनात्मक तरतुद :**

७३ व्या घटनादुरूस्तीने तिन्ही स्तरावरील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अनुसूचित जमातीच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्याची घटनात्मक तरतूदी केल्या आहेत. त्याचप्रकारे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेमधील एकूण जागांच्या एक तृतीयांश इतक्या जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याची व्यवस्था केली आहे.

**जिल्हा परिषद :-**

**जिल्हा परिषदेतील अनुसूचित जमातीचे आरक्षण :**

जिल्हा परिषेदेतील निवडणूकीव्दारे भरावयाच्या जागा पैकी कांही जागा विशिष्ट विभागासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या आरक्षित जागांची संख्या विहित रितीने निर्धारित करण्याचे अधिकार जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ कलम १२(२) अन्वये राज्य निवडणुक आयोगास आहेत.

१) कोणत्याही जिल्हा परिषदेमध्ये अनुसूचित जमातीच्या व्यक्तीसाठी राखून ठेवावयांच्या जागांचे त्या जिल्हा परिषेदेमधील प्रत्यक्ष निवडणूकीव्दारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे शक्य तेथवर त्या जिल्हा परिषद क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्राच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असावे.

२) अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखीव असलेल्या जागा जिल्हा परिषेदेतील वेगवेगळया निवडणूक विभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील.

३) परंतु संपूर्णतः अनुसूचित क्षेत्र समाविष्ट असलेल्या जिल्हा परिषदेमध्ये अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा त्या जिल्हा परिषदेमधील जागांच्या एकूण संख्येच्या एक व्दितीयांश पेक्षा कमी असणार नाही.

४) अनुसूचित जमातीसाठी जिल्हा परिषदेत जितक्या जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्या जागापैकी एक व्दितीयांश जागा अनुसूचित जमातीच्या महिलासाठी राखीव ठेवण्याची

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur
413513



घटनात्मक तरतूद करण्यात आली आहे. २४ जिल्हा परिषदेमधील आरक्षित जागा ठरविण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे.

**५) अध्यक्ष पदासाठी आरक्षण :**

अनुसूचित जमातीमधील व्यक्ती आणि स्त्रिया यांच्यासाठी जिल्हा परिषद अध्यक्षांची पदे राखीव ठेवण्याचीही तरतूद आहे. हे आरक्षण पूढील प्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

१) अनुसूचित जमाती यांच्यासाठी राज्यातील त्यांची लोकसंख्या विचारात घेवून त्या प्रमाणात जिल्हा परिषद अध्यक्षाची पदे राखीव ठेवली जातात. अशा राखीव पदापैकी एक व्दितीयांश पदे अनुसूचित जमातीच्या स्त्रियांसाठी राखीव ठेवली जातात.

२) परंतु अनुसूचित क्षेत्रामध्ये संपूर्णपणे समाविष्ट होत असलेल्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाचे पद केवळ अनुसूचित जमातीच्या व्यक्तीसाठीच राखीव असते.

३) जिल्हा परिषदामधील अध्यक्षाच्या पदांच्या एकूण संख्येच्या एक व्दितीयांश इतकी पदे स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, जमाती, नागरीकांच्या मागासवर्गाचा प्रर्वग यामधील स्त्रीयासाठी ठेवलेल्या राखीव पदांची संख्या धरुन) राखीव ठेवलेली असतात.

४) परंतु असेही की, जेथे अनुसूचित जमातीची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्यापेक्षा अधिक असेल अशा अनुसूचित क्षेत्रामधील जिल्हा परिषदेमध्ये अध्यक्षाचे पद हे केवळ अनुसूचित जमातीच्या व्यक्तीकरिता राखून ठेवण्यात रील प्रमाणे अध्यक्षाची राखीव ठेवलेली पदे राज्यातील वेगवेगळया जिल्हा परिषदांना आळीपाळीने नेमूण दिली जातात.

**६) पंचायत समितीः**

**पंचायत समितीमधील अनुसूचीत जमातीचे आरक्षण :**

जिल्हा परिषदेप्रमाणे पंचायत समितीत देखील निवडणूकीव्दारे भरावयाच्या जागा पैकी कांही जागा समाजातील निरनिराळया विभागासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. मुंबई जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ कलम ५८ (१ बी) (ए) अन्वये या आरक्षित जागांची संख्या विहित रितीने निर्धारित करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत. पंचायत समितीमधील राखीव जागांचा तपशील पुढील प्रमाणे सांगता येईल.

१) पंचायत समितीमध्ये अनुसूचित जमातीच्या व्यक्तीसाठी राखून ठेवावयांच्या जागांचे त्या पंचायत समितीमधील प्रत्यक्ष निवडणूकीव्दारे भरावयांच्या जागांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे, जास्तीत जास्त शक्य असेल तेथवर, त्या पंचायत समिती क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्राच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असावे. दुसऱ्या शब्दात, अनुसूचित जमाती यांना त्यांच्या त्या क्षेत्रातील लोकसंख्येच्या प्रमाणात पंचायत समितीवर प्रतिनिधीत्व देण्यात यावे अशी तरतूद अधिनियमात आहे.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

२) अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखीव असलेल्या जागा त्या पंचायत समितीमधील वेगवेगळया निर्वाचक गणांना आळीपाळीने नेमूण दिल्या जातात.

३) परंतु संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या पंचायत समितीमध्ये अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा त्या पंचायत समितीमधील एकूण जागांच्या एक व्दितीयांश पेक्षा कमी असणार नाहीत.

४) अनुसूचित जमाती करिता पंचायत समितीत जितक्या जागा राखीव ठेवण्यात आलेल्या असतात. त्या जागापैकी देखील एक व्दितीयांश जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या असतात.

५) पंचायत समितीत महिलासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागा पंचायत समितीच्या वेगवेगळया निर्वाचक गणांना आळीपाळीने नेमूण देण्यात येतात. २६पंचायत समितीमध्ये अनुसूचित जमातीला त्यांच्या लोकसंख्येनुसार जागा देण्यात येतात.

**सभापती पदासाठी आरक्षण :**

अनुसूचित जमातीमधील व्यक्ती आणि स्त्रिया यांच्यासाठी पंचायत समित्यांच्या सभापतीची पदे राखीव ठेवण्याची तरतूद अधिनियमात आहे. हे आरक्षण पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

१) अनुसूचित जमातीची राज्यातील लोकसंख्या विचारात घेवून त्या प्रमाणात त्यांच्यासाठी पंचायत समितीच्या सभापतीची पदे राखीव ठेवली जातात. अशा राखीव जागापैकी एक व्दितीयांश पदे अनुसूचित जमातीच्या स्त्रियांसाठी राखीव ठेवली जातात.

२) परंतु संपूर्णतः अनुसूचित क्षेत्र समाविष्ट असलेल्या पंचायत समितीच्या सभापतीचे पद केवळ अनुसूचित जमातीच्या व्यक्तीसाठीच राखीव असते.

३) पंचायत समित्यामधील सभापतीच्या पदाच्या एकूण संख्येच्या एक व्दितीयांश इतकी पदे स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यामधील स्त्रियांसाठी असलेल्या राखीव पदांची संख्या धरुन) राखीव ठेवलेली असतात.

४) परंतु असेही की जेथे अनुसूचित जमातीची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्यापेक्षा अधिक आहे. अशा अनुसूचित क्षेत्रामधील पंचायत समितीमध्ये सभापतीचे पद हे केवळ अनुसूचित जमातीच्या व्यक्तीकरिता राखीव ठेवण्यात येईल.

५) वरील प्रमाणे सभापतीची आरक्षित ठेवलेली पदे राज्यातील वेगवेगळया पंचायत समित्यांना आळीपाळीने नेमूण दिली जातात. या पदांचे आरक्षण राज्य शासना मार्फत ठरवून दिले जाते.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513



६) **ग्रामपंचायत :**

**ग्रामपंचायतीमधील अनुसूचित जमातीचे आरक्षण :**

ग्रामपंचायतीत निवडणूकीव्दारे भरावयाच्या जागा पैकी कांही जागा समाजातील निरनिराळया घटकासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या असतात. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम १० (२) (अ) अनुसार राखीव जागांची संख्या विहित रितीने निर्धारित करण्याचे अधिकार राज्यनिर्वाचन आयोगास आहेत. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार ग्राम पंचायतीमध्ये अनुसूचित जमातीसाठी कांही आरक्षणाच्या तरतुदी केल्या आहेत. सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रंमांक २४, कलम ४ च्या अनुसूचितील अनुक्रमांक ७४ अन्वये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ या ऐवजी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम हे संक्षिप्त नाव दाखल करण्यात आले.

ग्रामपंचायती मधील राखीव जागांचा तपशिल पुढील प्रमाणे सांगता येईल.

१) ग्राम पंचायतीमध्ये अनुसूचित जमातीच्या व्यक्तीसाठी राखून ठेवावयाच्या जागांचे त्या पंचायतीमधील प्रत्यक्ष निवडणूकीव्दारे भरावयाच्या जांगाच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे जास्तीत जास्त शक्य असेल तेथवर त्या पंचायत क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्राच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असावे.

२) अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागा त्या ग्रामपंचायतीमधील वेगवेगळया प्रभागांना आळीपाळीने नेमूण दिल्या जातात.

३) अनुसूचित जमातीसाठी वरील प्रमाणे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक व्दितीयांश जागा अनुसूचित जमातीच्या स्त्रियांसाठी राखून ठेवल्या जातात.

४) परंतु संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या ग्रामपंचायती मध्ये अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा त्या पंचायतीमधील एकूण जागांच्या निम्यापेक्षा कमी असत नाहीत.

५) ग्रामपंचायतीमधील प्रत्यक्ष निवडणूकीव्दारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या एक व्दितीयांश जागा (अनुसूचित जाती, जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यामधील स्त्रियासाठी राखून ठेवलेल्या जागासह) स्त्रियासाठी राखून ठेवलेल्या असतात. महिलासाठी अशा प्रकारे राखीव ठेवण्यात आलेल्या जागा ग्रामपंचायती मधील वेगवेगळया प्रभागांना आळीपाळीने नेमूण देण्यात येतात.

**सरपंच**

**सरपंच पदाचे आरक्षण :**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील तरतूदीनुसार अनुसूचित जमातीमधील व्यक्ती आणि

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

स्त्रिया यांच्यासाठी सरपंचाच्या पदामध्ये पुढील प्रमाणे राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.

१) अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या सरपंचाच्या पदांच्या संख्येचे, पंचायतीमधील अशा पदांच्या एकूण संख्येशी असणारे प्रमाण हे शक्य असेल तेथवर राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे राज्याच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असेल.

२) अशा राखीव जागा पैकी एक व्दितीयांश पदे अनुसूचित जमातीच्या स्त्रियासाठी राखीव ठेवली जातात.

३) परंतु अनूसूचित क्षेत्रामध्ये संपूर्णपणे समाविष्ट होत असलेल्या ग्राम पंचायतीच्या सरपंचाचे पद केवळ अनुसूचित जमातीच्या व्यक्तीसाठी राखीव असते.

४) ग्रामपंचायती मधील सरपंचाच्या पदांच्या एकूण संख्येच्या एक व्दितीयांश इतकी पदे स्त्रियासाठी (अनुसूचित जाती, जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यामधील स्त्रियासाठी असलेल्या राखीव पदांची संख्या धरुन) राखीव असतात.

५) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम कलम ४ अन्व्ये ग्राम पंचायतीच्या सरपंचासाठी राखून ठेवलेली पदे निहित रितीने वेगवेगळया ग्रामपंचायतीना आळीपाळीने नेमूण दिली जातात. या पदांचे आरक्षण राज्यशासनाकडून ठरवून दिले जाते.

## संदर्भ सूची :-

१) गोखले आर.एम., नागरिकशास्त्र आणि भारतीय राज्यपध्दती, पूणे, १९६३, पृ. १९६

२) घांगरेकर चि.ग., भारतीय राज्यघटना स्वरुप आणि राजकारण, नागपूर,१९६३, पृ. ६१,६२.

३) गोरे तुकाराम सयाजीराव, राज्यपाल आणि घटकराज्यांची स्वायतता, डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद,१९९४, पृ. २४, (एम.फिल.चा शोधप्रबंध)

४) भारताचे संविधान, महाराष्ट्र राज्याच्या व भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, मुंबई,१९९५, पृ. २३०.

५) शिवराज पाटील चाकूरकर, ४२ वी घटनादुरुस्ती एक विचार, लातूर,१९७७ पृ. २३

६) पाटील वा.भा (डॉ.), पंचायतराज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.प्रथमावृत्ती - २००९ पृ. ६१,६२.

७) पोले कां.प्र. (डॉ.) महाराष्ट्रातील पंचायती राज आणि महिला आरक्षण, अरुणा प्रकाशन, लातूर प्रथम आवृत्ती जानेवारी-२००९. पृ. ५४.

८) कांबळे नारायण, बलांडे व्यंकट, शिंदे संजय - आरक्षण सत्य व विपर्यास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती ऑगस्ट

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | महाभारत में वास्तु–शिल्प का अध्ययन | डॉ.मारोती पोमा चव्हाण | 56 |
| 15 | योग दर्शन में ईश्वर –स्वरूप एवं प्रत्यय | शंभू राम | 62 |
| 16 | 'कामायनी' महाकाव्य में सामाजिक चेतना | प्रा.डॉ. ज्ञानेश्वर गंगाधरराव गाडे | 66 |
| 17 | 'दशावतारचरितम्' के महाकाव्यत्व में आचार्य क्षेमेन्द्र का पाण्डित्य' | महेश दत्त शर्मा | 71 |
| 18 | महात्मा जोतिराव फूले और दलितोद्धार आन्दोलन | प्रा. डॉ.सौ.मंगला श्री. कठारे | 75 |
| 19 | समकालीन हिंदी कथा साहित्य में नारी विमर्श | प्रा. नयन भादुले -राजमाने | 77 |
| 20 | ओशोंनी धार्मिक शिक्षणाची केलेली चिकित्सा | प्रा. हाडुळे धनराज सुभाष | 80 |
| 21 | "महाराष्ट्र नव निर्माण सेनेची निर्मिती आणि राजकीय वाटचाल एक चिंतन" | प्रा. वाघुले दत्तात्र्य मारुती | 84 |
| 22 | मध्ययुगीन धर्मसंप्रदाय आणि नांदेड जिल्हयातील वीरशैव मठ संस्थेचे महत्त्व | *दामरे शैलजा शंकरराव* | 89 |
| 23 | राजपुत मुघल संबंध | देशमुख गंगाधर बालाजीराव | 93 |
| 24 | ब्रिटीश साम्राज्याविरूध्द लढा देणारी (पुकारणारी) भारतातील पहिली बंडखोर संस्थानिक - राणी चेन्नमा : | प्रा.चव्हाण देविदास गोविंदराव | 99 |
| 25 | मराठी बालकविता : स्वरूप आणि अंतरंग | प्रा.गजानन अनंता देवकर | 108 |
| 26 | पर्यावरणीय नीतिशास्त्राची आवश्यकता | शेख मुबीन फतरू | 112 |
| 27 | माहिती अधिकाराचा लोकप्रशासनावरील प्रभाव | डॉ. जयदेव उध्दवराव मोहिते | 115 |
| 28 | आसाराम लोमटे यांची शेतकरी जाणिवेची संघर्षशील कथा | प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत | 119 |
| 29 | जागतिकीकरणातील चंगळवादी संस्कृती | प्रा.डॉ.रामदिनेवार गोविंद शंकरराव | 124 |
| 30 | शेलमोहा ग्रामीण वस्तीच्या कृषीखालील क्षेत्राचे भुस्वामित्व : एक भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ.विश्वराज श्रीरामराव चिमणगुंडे | 128 |
| 31 | प्रादेशिक असमतोल : एक मुल्यमापन | प्रा. डॉ. रत्नाकर रामराव कांबळे | 134 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol V, April 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# "महाराष्ट्र नव निर्माण सेनेची निर्मिती आणि राजकीय वाटचाल एक चिंतन"

**प्रा. वाघुले दत्तात्र्य मारुती**

*भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर*

------ (21) ------------------------

**प्रास्ताविक :**

मनसेची निर्मिती कोणत्या अधारे झाली, किंवा कोणत्या पार्श्वभूमीतून झाली हे सांगणे फारसे अवघड नाही, कारण या पक्षाच्या निर्मितीला फार मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी नाही. एक पक्षातून असंतुष्ट होवून एक एखादी नेता त्या पक्षातून बाहेर पडतो. एक तर मी इतर पक्षात जातो किंवा स्वतंत्र पक्ष स्थापन करतो. याच परिस्थितीतून मनसेची निर्मिती झाली. कारण उध्दव ठाकरे जसे-जसे सक्रिय राजकारणात सहभागी होवू लागले तसे-तसे राज ठाकरेचे पक्षातील स्थान दुर्लक्षित होऊ लागले. बाळासाहेब नंतरचे नेतृत्त्व राज ठाकरेच असणार असे बहुतांश जनता व राजकीय विश्लेषकांनी मान्य केले होते. मात्र दुर्देवाने तसे झाले नाही, शेवटी बाळासाहेब पुत्र उध्दव ठाकरे यांनाच पक्षाचे वारस, नेतृत्त्व देण्यात आले. यामुळेच मनसेची निर्मिती झाली. आणि अगदी अल्प काळातच मनेसेने महाराष्ट्राच्या राजकारणात प्रचंड यश संपादन केले, आणि महाराष्ट्रातील एक प्रमुख प्रादेशिक राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळवली. हे या पक्षाच्या दृष्टिने महत्वपूर्ण कामगिरी मानली जाते. या संबंधीचे विश्लेषण किंवा चिंतन या लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे.

**मनसेच्या निर्मितीची पार्श्वभूमी :**

कोणतेही संघटना असो, अथवा राजकीय पक्ष असो त्याच्या उदयास किंवा निर्मितीस कांही पार्श्वभूमी तयार झ ालेली असते किंवा तशी कांही परिस्थिती निर्माण झालेली असते, त्यास मनसे अपवाद नाही. म्हणूनच या पक्षाच्या निर्मितीची पार्श्वभूमीचे चिंतन करणे आवश्यक ठरते.

राज ठाकरे शिवसेनेत असतांना विद्यार्थी सेनेची जबाबदारी 1988 पासून त्यांच्याकडे दिली होती. आणि येथूनच खऱ्या अर्थाने राज ठाकरेंच्या राजकीय वाटचालीची सुरूवात झाली होती. त्यांच्यात संगटन कौशल्य, बाळासाहेबासारखे वक्तृत्व, दूरदृष्टी असल्याने विद्यार्थी सेनेला आक्रमक रूप दिले. आणि त्यामुळे विद्यार्थी सेना व राज ठाकरे असे समिकरण झाले. राज ठाकरे अल्पावधितच तरूणाचे अकर्षण बनले. त्यामुळे त्यांना शिवसेनेतील दोन नंबचे नेते मानले जाऊ लागले. त्यांच्या नेतृत्त्वाला कार्यकर्त्यांची प्रचंड पसंती मिळाली. याच जोरावर त्यांनी पक्षात आपले स्वतःचे अस्तित्व निर्माण केले.

मनसेच्या निर्मितीची पार्श्वभूमी अभ्यासतांना कांही महत्त्वपूर्ण बाबींचा, घटनांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. कारण उध्दव ठाकरे राजकारण सक्रिय झाल्या नंतर कांही घटना घडत गेल्या की, त्या घटनेतूनच मनसेच्या निर्मितीचा प्रवास सुरू झाला, हे सत्य स्विकारावे लागते. तया घटनेचा तपशीले खालील प्रमाणे सादर करता येईल.

**1) उध्दव ठाकरेंचा राजकारणात प्रवेश :**

1993 पासून उध्दव ठाकरेंचा प्रवेश राजकारणात सुरू झाला. यावेळी ते बाळासाहेबां समवेत सभेत सक्रिय होवू लागले. मात्र प्रत्यक्ष शिवसेनेच्या संघटनेत प्रत्यक्ष सक्रिय नव्हते. मात्र जसे-जसे वेळ जाऊ लागला . तसे-तसे त्यांना राजकाणात आवड निर्माण होऊ लागली.

**2) 1995 ची सार्वत्रिक विधानसभेची निवडणूक :**

असे म्हटले जाते की, उध्दव ठाकरेंच्या प्रत्यक्ष राजकारणाची सुरूवात याच निवडणूकी पासून झाली. या निवडणूकी पासून ते प्रत्यक्ष संघटनेत सहभागी झाले. 1995 विधानसभेत शिवसेना -भाजप युतीचे सरकार पहिल्यांदा

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh Jr. College, Chakur

महाराष्ट्रात स्थापन झाले. यामुळे त्यांचा राजकारणातील कल निश्चित झाला. त्याच प्रमाणे याच दरमयान कांही अशा घटना घडल्या की, त्यामुळे उध्दव ठाकरेंना राजकारणास यावे लागले. 1995 मध्ये मिनाताई ठाकरेंचे निधन, 1996 ला बाळसाहेबांचे मोठे सुपूत्र, बिंदू ठाकरे यांचे अपघाती निधन, यामुळे उध्दव ठाकरे बाळासाहेबंच्या अगदी जवळ झाले. त्यांना सल्ला देण्यास सुरूवात केली. येथूनच त्यांचा राजकीय सहभागाला महत्त्व प्राप्त झाले.

**3) लता मंगेशरांचा संगित रजनी कार्यक्रम :**

1997 च्या नेतृत्वात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रचंड प्रमाणात खर्च करण्यात आला. या कार्यक्रमात प्रचंड प्रमाणात खर्च करण्यात आला. आणि या कारणावरून दोन्ही चुलत बंधुमध्ये शितयुध्दाला सुरूवात झाली. आणि येथून शिवसेनेत उध्दव ठाकरे सक्रिय झाले. यामुळे उध्दव ठाकरेचे महत्त्व वाढू लागले. यामुळे राज ठाकरेंच्या नेतृत्वा समोर आव्हान निर्माण झाले. यामुळे राज व उध्दव असे दोन गट निर्माण झाले. या दोन्ही गटातील दरी दिवसेंदिवस वाढू लागली. बाळासाहेबांचा वारसददार कोण या वरून दोन्ही भावात संघर्ष सुरू झाला. येथूनच भविष्यातील एका वेगळ्या मार्गाची चाव्हूल लागली.

**4) रमेश किनी हत्या प्रकरण :**

दरम्यानच्या कालखंडात शिवाजी पार्कवर रमेश किनी यांची हत्या झाली. या प्रकरणात राज ठाकरेंचे नाव गोवले गेले. यावेळचे विरोधी पक्षनेते छगन भुजबळ यांनी हे प्रकरण उचलून धरले. यामुळे राज ठाकरेवर प्रचंड प्रमाणात टिका होऊ लागली. या प्रकरणाचा फायदा घेवून पक्षांतर्गत त्यांचे स्थान कमी करण्याचा प्रयत्न सुरू झाला. परिणामतः उध्दवचे महत्त्व वाढून गेले. याचा परिणाम राज ठाकरेंच्या मनावर व्हायला सुरूवात झाली. यावेळी राज यांनी आपले मौन सोडले, ते बाळासाहेब व जवळच्या मित्रांना आपली खंत 1998 - 99 पासून व्यक्त करू लागले. त्याना पत्रातील महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेतून डावलले जाऊ लागले. यामुळे त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांचे बळ उभे केले या सर्व घटना सुप्त अवस्थेतील घुसमट असे वर्णन करता येईल यातूनच तीव्र असंतोष निर्माण होण्यास सुरूवात झाली.

**5) 2002 च्या महानगरपालिकेच्या निवडणूकीत नाराजी व्यक्त केली :**

राज ठाकरे यांनी प्रथमच या निवडणूकीदरम्यान जाहिररित्या आपली नाराजी व्यक्त केली. ते म्हणावे मुंबईतील उमेदवारांना तिकडे देताना व त्यांचा निर्णय घेतांना आपल्याला विचारले जात नाही. राजच्या उमेदवारांना तिकीटे दिली गेली नाहीत, प्रत्येक उमेदवार उध्दव यांच्या संतीचा होता या निवडणूकीत शिवसेनेला यश आल्याने उध्दवचे महत्त्व वाढले. यामुळे दोघातील संघर्षात वाढ झाली.

**6) सामनांतून राज ठाकरेवर टिका :**

नारायण राणेंनी उध्दवच्या नेतृत्वावर शंका निर्माण केली. परिणामतः नारायण व उध्दव यांच्यात संघर्ष वाढला. नारायण राणेंनी शिवसेनेत बंड केला. यावेळी राज व नारायण राणे यांचे संबंध चांगले होते. त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. कोकणचा अर्धवट दौरा सोडून मुंबईला आल्याने त्यांच्यावर टिका करण्यात आली. राजने ही या टिकेला जशास तसे उत्तर दिले. शिवसेनेत त्यांची फार मोठी कोंडी झाल्याने ते व्यथित झाले. आणि शेवटी त्यांनी ऐतिहासिक निर्णय घेतला. शिवसेना प्रमुखांना विठ्ठलाची उपमा देत आयत्या बिळावर नागोबा असे कोरडे ओढत शिवसेनेला अखरेचा जय महाराष्ट्र केला. आणि शेवटी अवघ्या तीन आठवड्यात कार्यकर्त्यांशी विचारविनियम करून 19 मार्च 2006 रोजी शिवाजी पार्कच्या प्रचंड सभेत जनतेला साक्ष ठेवून "महाराष्ट्र नव निर्माण सेना" या पक्षाची स्थापना केली. आणि महाराष्ट्रात एका नविन प्रादेशिक पक्षाचा उदय झाला.

अशा प्रकारे महाराष्ट्र नव निर्माण सेना या पक्षाची पार्श्वभूमी थोडक्यात स्पष्ट करता येते.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648

Issue X Vol V, April 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

**राजकीय वाटचाल :**

बाळासाहेब ठाकरे यांनी ज्या प्रमाणे राजकीय वाटचाल सुरू केली, त्या प्रमाणेच राज ठाकरे यांनी आपल्या पक्षाची राजकीय वाटचाल सुरू केली. राज ठाकरे यांच्यात बहुतांश बाळासाहेबांचे गुण आहेत. कारण लहानपणापासून बाळासाहेब सोबत राहिल्याने त्यांच्यावर बाळासाहेबांचाच प्रभाव आहे, त्यांनी शिवसेनेप्रमाणेच पक्षाचे संघटनात्मक रचना केली. अक्रमकता, धाडसी, ओघवते वक्तृत्व यामुळे त्यांच्या पक्षाला संपूर्ण महाराष्ट्रात ओळख मिळाली. त्यांच्या व्यक्तिमत्वामुळे अल्पावधितच मनसे संपूर्ण महाराष्ट्रभर पोंहोंचली, मनसेची राजकीय वाटचाल पूर्णपणे शिवसेने सारखी नसली तर पक्षांची ध्येय, धोरणे व हिंदुत्वाचा मुद्दा सोडले तर मराठी माणसाचे हित, मराठी भाषेची अस्मिता जपने व परप्रांतियाचा विरोध या मुद्यांच्या अधारे राजकीय वाटचाल सुरू झाली.

मनसेच्या ध्येय-धोरणावरून या पक्षाची राजकीय विचारधारा लक्षात येते. त्यामुळे पक्षाच्या ध्येय-धोरणाचा विचार करणे आवश्यक ठरते.

1) मराठी भाषा, महाराष्ट्रांचा सर्वांगिण विकास, मराठी संस्कृतिकचा विस्तार मनसेच्या तत्वाचा महत्त्वाचा गाभा आहे.
2) महाराष्ट्राच्या संस्कृतीला व मरठी भाषेला वैभव प्राप्त करून देणे.
3) ज्यामुळे मराठी आई-वडिलांच्या पोटी जन्माला आले आहे. ते तर मराठीच, पण त्याच बरोबर इतर भाषिक जे महाराष्ट्रात जन्मले आहेत, जे महाराष्ट्रावर प्रेम करतात जे मराठी भाषा बोलतात. त्यांना मनसे मराठी माणूस मानते.
4) महाराष्ट्राच्या व मराठी माणसाच्या विकासाला आड येणाऱ्या सर्व समस्यांचे निर्मुलन करणे.
5) महाराष्ट्राच्या राजकारणात समाजकारणातून परप्रांतियाचे वर्चस्व कमी करणे.

**5) परप्रांतातून येणाऱ्या लोकांचा विरोध :**

अशा ध्येय-धोरणातून मनसेची राजकीय वाटचालीस सुरूवात केली. राज ठाकरेंचे नेतृत्व अक्रमक व प्रभावी असल्याने महाराष्ट्रातील तरूण, महिला, यांच्या अकर्षित झाले. अगदी अल्प काळातच महाराष्ट्राच्या राजकारणात मनसेचा प्रभाव निर्माण झाला. राज ठाकरेंच्या करिशमाई नेतृत्वामुळे शिवसेनेला एक पर्याय निर्माण झाला. आणि महाराष्ट्राच्या राजकारणात मनसेला महत्त्व प्राप्त झाले.

मनसेची राजकीय वाटचाल पहात असताना स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य पातळीवरील निवडणूकीतील कामगिरीचा आढावा तसेच मनसेनें महाराष्ट्रातील प्रमुख मुद्याबाबत घेतलेली भूमिका व त्या भूमिकेला सामाजिक व राजकीय दृष्टिने काय परिणाम झाला, राज ठाकरेंनी घेतलेल्या भूमिका व त्या भूमिकेला मिळालेले समर्थन या घटनांच्या अधारे मनेसच्या राजकीय वाटचालीचा आढावा घेता येईल.

स्थापना झाल्यानंतर अगदी एका वर्षात 2007 विविध शहरात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या झालेल्या निवडणूकीत अल्पशा कालावधीतील यश महत्त्वाचे मानले जाते. मुंबई - 07, पुणे - 08, नाशिक - 12, ठाणे - 03, पिंपरी चिंचवड - 04, उल्हास नगर, अकोला, माळेगांव व चंद्रपूर या जिल्ह्यातही मनसेने खाते उघडले. या शिवाय इतर महानगरपालिकेत पक्षाचे 15 नगरसेवक निवडून आले. पुण्यात 113 उमेदवारांना एकूण 75 हजारपेक्षा अधिक मते मिळाली. अवघ्या एका वर्षाचा पक्षाचे ही कामगिरी सरस मानावी लागेल.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol V, April 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143


2009 च्या विधानसभा व लोकसभेत मनसेला प्रचंड यश मिळाली. या निवडणूकीत राज ठाकरे यांनी जबरदस्त प्रचार करून महाराष्ट्राच्या जनतेचा बराचसा विश्वास संपादन केला. मनसेच्या प्रभावी कामगिरीमुळे भाजपा व शिवसेनेचा सपाटून पराभव झाला. 2009 च्या लोकसभेच्या निवडणूकीत मनेसेने केवळ 12 मतदार संघात आपले उमेदवार उभे केले. पण मनसेला एकही जागा जिंकता आली नाही, मात्र उमेदवारांना 4% मतदान मिळाले. यामुळे शिवसेना व भाजप यांच्या 09 उमेदवाराचा पराभव झाला. राज ठाकरेचा सभेला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. मनसेवर शिवसेनेने प्रचंड टिका केली. पण याचा परिणाम मतदारावर झाला.

2009 च्या विधानसभेत मनसेची कामगिरी आश्चर्यजनक ठरली. विधानसभेत मनसेने 143 उमेदवार उभे केले. आणि जबरदस्त प्रचार केला. अनेक मुद्यासंबंधी ठाम व प्रभावी भूमिका मांडली अवघ्या दोनच वर्षात मनसेने अत्यंत दैदिप्यमान यश संपादन केले. पहिल्याच विधानसभेत अवघ्या दोन वर्षात तब्बल 13 उमेदवार विजयी झाले, पराभूत उमेदवारांनाही मतांची टक्केवारी 3% पेक्षा अधिक राहिली. महाराष्ट्राच्या सर्व विभागातून मनसेनी निवडणूक लढवली. 13 उमेदवारापैकी 12 आमदार हे मुंबई, ठाणे व नाशिक क्षेत्रात होते. नाशिक या क्षेत्रातही राज ठाकरेंचा प्रभाव जबरदस्त दिसून आला. मुंबई विभागात 6 उमेदवार विजयी झाले.

वरील कामगिरीवरून असे स्पष्ट होते की, मनसेची राजकीय वाटचाल अत्यंत यशस्वी व प्रभावी दिसून येते. अवघ्या तीन वर्षाच्या पक्ष महाराष्ट्रातील प्रमुख प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता मिळाली. यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाचे समिकरण बदलले. राज ठाकरेंनी मराठी अस्मिता व महाराष्ट्रातील तरूण मराठी तरूणांवर ठस्सा उमटवण्याचा अचूक प्रयत्न केला.

या यशामुळे या पक्षाचे राजकीय भवितव्य उज्ज्वल असल्याचे भाष्य अनेक राजकीय अभ्यासकांनी केली. राज ठाकरे यांची 'मी महाराष्ट्रांचा, महाराष्ट्र माझा' ही संकल्पना जनतेला भावली. भाजप-शिवसेनेकडे अनेक स्टार प्रचारक, दिग्गज नेते होते, तर मनसेकडे केवळ राज ठाकरे एकमेव वक्ते, नेतृत्त्व होते. त्यांनी स्वतःच्या बळावर पक्षाला प्रभावी यश मिळवून दिले.

2010 मध्ये झालेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत मनसेची 27 नगरसेवक निवडून आले. यामुळे शिवसेनेला कल्याण-डोंबिवलीत मोठा राजकीय धक्का बसला. तर नाशिक मध्ये मनसेचे 40 नगरसेवक निवडून आले. अशी ऐतिहासिक विजय ठरला. प्रथमच मनसेचा झेंडा नाशिक महापालिकेत फडकला, हा विजय मनसेच्या राजकीय वाटचालित 'मैलाचा दगड' मानला जातो. मनसेने केवळ शहरी प्रशासनातच यश मिळवले असे नव्हे तर ग्रामिण संस्थेतही यश मिळवलं. 2012 च्या मुंबई महापालिकेत हे समाधानकारक यश मिळाले.

2012 च्या नंतर मात्र मनसेला आपल्या यशात भर पाडता आली नाही. 2014 च्या लोकसभा व विधानसभेत मनसेला प्रचंड पराभव स्विकारावा लागला. राज ठाकरेंनी यावेळी आपल्या भूमिकेत वेळोवेळी बदल केला, तसेच ठोस मुद्दे घेवून मनसे या निवडणूकीत लढली नाही. 2014 च्या निवडणूकीत मनसेला पराभव स्विकारावा लागला. पक्षातील अनेक नेते पक्ष सोडून गेले. वर्तमान स्थिती मनसेसाठी कठीण आहे. मनसेच्या अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. की, काय अशी परिस्थिची निर्माण झाली आहे. तरी मनसेचा प्रभाव महाराष्ट्रात कायम आहे. राज ठाकरेंच्या भूमिकेचा प्रभाव महाराष्ट्रांच्या केवळ सरकारवरच पडत नसून संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकारणावर पडतो. 2019 च्या विधानसभा व लोकसभेत राज ठाकरेंनी सर्व विरोधी व समविचारी पक्षाने एकत्र येण्याचे आव्हान केले आहे. भाजपा विषयी विशेषतः नरेंद्र मोदीला राज ठाकरे कडाडून विरोध करत आहेत.

Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

**निष्कर्ष :**

मनसेच्या निर्मिती पासून ते आज पर्यंतच्या राजकीय वाटचालीचे चिंतन केल्यास असे दिसून येते की, मनसे हा पक्ष प्रादेशिक वादाचा पुरस्कार करणारा आहे. तसेच महाराष्ट्रात अमूलाग्र बदल करण्याचा उद्देश राज ठाकरेंचा आहे. मनसेला 2014 च्या नंतर जरी यश मिळाले नसले तरी, महाराष्ट्राच्या राजकारणात मनसेचा प्रभाव अटळ आहे. 2019 च्या विधानसभेत मनसे चांगली कामगिरी करेल असे कार्यकर्त्यांना वाटले. तसेच या चार वर्षात राज ठाकरेंनी महाराष्ट्राच्या व देशाच्या दृष्टिने अनेक मध्ये प्रभावीपणे मांडले आहे. त्यामुळे हा पक्ष 2019 च्या महाराष्ट्राच्या राजकारणात एक महत्त्वाच्या स्थितीवर असेल असे वाटते.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

1) वैभव पुरंदरे : बाळ ठाकरे आणि शिवसेनेचा उदय, मंजूळ पब्लिकेशन, 2013.
2) प्रकाश अकोलेकर : 'जय महाराष्ट्र, प्रभात प्रकाशन, 1998.
3) मनोज आवाळे : मराठी मनाचा राजा अदित्य प्रकाशन, 2011.
4) सुहास पळशीकर : महाराष्ट्रातील सप्ता संघर्ष आणि राजकीय पक्षाची वाटचाल, समकालिन प्रकाशन, पुणे 2007.
5) अनिल शिदोरे : ही राजभाषा असे, नवता बुक वर्ग, 2008.
6) दिपक पटवे : चला राजकारणात, राजेश प्रकाशन, 2013.
7) राज्य निवडणूक अहवाल.
8) दै. लोकसत्ता, 14 डिसेंबर 2016.
9) दै. सकाळ.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - III July - September - 2018

English Part - IV / Marathi Part - III

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

# CONTENTS OF MARATHI PART - III



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | १९४२ चे भारत छोडो आंदोलनात मुस्लिमांचा सहभाग<br>**डॉ. शेख हूसैन इमाम** | १-३ |
| २ | महाराष्ट्र राज्याची शेती विकासाकडे वाटचाल<br>**प्रा. डॉ. बी. एस. भालेराव** | ४-८ |
| ३ | सुरक्षा परिषद: लोकशाहीकरण आणि भारताची दावेदारी<br>**प्रा. एकनाथ ज्ञानदेव खरात** | ९-१४ |
| ४ | १८५७ चा दक्षिण महाराष्ट्र एक दृष्टिक्षेप<br>**प्रा. डॉ. वसंत श्रावण देसले** | १५-२१ |
| ५ | मराठे कालीन व्यापार व उद्योगधंदे<br>**प्रा. डॉ. मिलिंद दशरथराव तायडे** | २२-२४ |
| ६ | डी. एस. आर. अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास<br>**प्रा. डॉ. शेख रुकसाना अजीज**<br>**डॉ. क़ानिज फातेमा** | २५-२८ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रीय लेखनातील धर्मांतरविषयक विचार<br>**प्रा. महेंद्र यादवराव घनसावंत**<br>**प्रा. डॉ. प्रकाश वाघमारे** | २९-३२ |
| ८ | छत्रपती शिवाजी महाराज आणि परकीय सागरी सत्ता एक अवलोकन<br>**प्रा. डॉ. दत्ता पिलाप्पा हिंगमिरे** | ३३-३७ |
| ९ | बंधू माधव यांच्या कथेवर पडलेला आंबेडकरी विचारांचा प्रभाव<br>**प्रा. डॉ. बालाजी खराबे** | ३८-४३ |
| १० | सैनिकी शाळा व्यवस्थापनात येणाऱ्या समस्या व उपाय<br>**दत्तात्रय महादु पडघान** | ४४-४६ |
| ११ | सम्राट अशोकाचा बौध्द धर्म<br>**प्रा. डॉ. राजाराम सोनवणे** | ४७-४९ |
| १२ | भारतीय असंघटित क्षेत्रातील यंत्रमाग उद्योगाची वाढ आणि विकास<br>**डॉ. जाधव लीली दोधा** | ५०-५२ |
| १३ | वेळापूरच्या इतिहासाचे साक्षीदार<br>**श्री शिवाजी हरी चौगुले**<br>**डॉ. विश्वास शामराव कंधारे** | ५३-५८ |
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साप्ताहिक केसरी<br>**सुनिल अर्जुन इंगळे** | ५९-६१ |





PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | विंदा एक प्रयोगशील कवी<br>**प्रा. डॉ. सुनंदा चरडे दुबे** | ६२-६५ |
| १६ | अल्पसंख्यांक अभिव्यक्ती: भाषा आणि साहित्य<br>**प्रा. डॉ. संजय शिंदे** | ६६-६९ |
| १७ | सामाजिक दस्तावेज : दलित स्त्री आत्मकथने<br>**प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे** | ७०-७३ |
| १८ | ग्रामीण कादंबरीची भाषिक वैशिष्ट्ये<br>**डॉ. बाळासाहेब बाबुराव लिहिणार** | ७४-७७ |
| १९ | मराठी शैलीविचाराच्या मर्यादा: दलित साहित्याच्या संदर्भात<br>**नरेंद्र मून** | ७८-८३ |
| २० | महिला सबलीकरण व राजकीय सहभाग<br>**डॉ. विनायक के. खिल्लारे** | ८४-८८ |
| २१ | राजर्षी शाहु महाराजांचे व्यापार उद्योग विषयक धोरण<br>**प्रा. धनंजय महादेवराव चंदनशिवे** | ८९-९३ |
| २२ | श्रीक्षेत्र माहूर येथील स्त्रियांची नाव घेण्याची उखाणे : संकलन व चिकित्सा<br>**प्रा. डॉ. लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव** | ९४-९७ |
| २३ | ग्रामीण विकासावर माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा प्रभाव<br>**डॉ. प्रा. भाग्यश्री एल. धणे** | ९८-१०१ |
| २४ | आरक्षण धोरण : ब्रिटीशकालीन भारत<br>**डॉ. आर. व्ही. म्हस्के** | १०२-१०४ |
| २५ | भूकंप : एक नैसर्गिक आपत्ती<br>**प्रा. डॉ. जनार्धन केशवराव वाघमारे** | १०५-१०८ |
| २६ | सम्राट अशोकाच्या मानवतावादी विचाराचा व कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास<br>**प्रा. डॉ. लासुरे बी. एस.** | १०९-१११ |


PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# २६. सम्राट अशोकाच्या मानवतावादी विचाराचा व कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास

प्रा. डॉ. लासुरे बी. एस.
भाई किशनराव देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर.

## प्रस्तावना

लोककल्याणकारी राज्यात जो राजा आपल्या नागरिकाबद्दल व्यापक समाजसेवेचे द्वार तयार करतो त्यात शिक्षा, आरोग्य, रोजगार इत्यादी अनेक बाबींचा समावेश होतो. त्यातून मानवीय जिवनात आर्थिक विकास आणि सामाजिक उन्नती निर्माण होते. भारतात प्राचीन काळी असे पाऊल सम्राट अशोकाने उचललेले दिसते. अशोक विश्वप्रसिद्ध आणि शक्तीशाली भारतीय मौर्य वंशाचे एक महान सम्राट होते. प्रेम, सत्य आणि अहिंसेचे ते पूजारी होते. त्यांच्या जिवनातील कलींगचे युद्ध हे एकमेव पहिले व शेवटचे युद्ध ठरले.

कलींग युद्धात झालेला रक्तपात पाहून त्यांचे मतपरिवर्तन झाले. पून्हा युद्ध न करण्याची प्रतिज्ञा त्यांनी घेतली. यानंतर त्याने धर्म विजयाचे आणि मानवी कल्याणाचा एकमेव मंत्र जपला. बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी स्वतःचे सामर्थ्य, राजकोष आणि कार्यक्षम राज्ययंत्रणा सढळ हाताने पुरेपुर वापर केला. यामुळे बौद्ध धर्म केवळ राज्यधर्म न राहता तो राष्ट्रधर्म बनला. जनतेच्या कल्याणाची अनेक पाऊले त्यांनी उचललेली होती.

## उद्दिष्टे

- सम्राट अशोकाच्या मानवतावादी विचाराचा व कार्याचा अभ्यास करणे.
- सम्राट अशोकाच्या मानवतावादी विचाराचा व कार्याचा प्रसार करणे.

## मानवतावादी विचार

भारतीय संस्कृतीत भर टाकणारी आणि मानवतावादी दृष्टीकोनातून आपले विचार शिलालेखाद्वारे जनतेत रूजवण्याचा प्रयत्न केला. जनतेने माता पित्याच्या आज्ञेचे पालन करावे, दास, सेवकाशी प्रेमाने वागावे, पापापासून मुक्त असावे, प्राणिमात्रावर दया करावी, मोठ्याचा आदर करावा, श्रमण व ब्राह्मणास दानधर्म करावा, सत्य बोलावे, अहिंसेस महत्त्व द्यावे, दयाळूपणा, आचार आणि विचार शुद्ध असावेत, आपल्या धर्माबरोबरच दुस-या धर्माचा आदर करावा, इत्यादी नैतिकता निर्माण होणारे विचार मानवीय जिवनात रुजवण्याचा प्रयत्न केला. सम्राट अशोकांना अपेक्षीत असलेल्या धर्मात पुढील सिद्धांत दिसून येतात. संयम, भावदृष्टी, कृतज्ञता, दृढ भक्ती, दया, दान, स्वच्छता, सत्य, सेवा, श्रद्धा इत्यादी बाबींचा समावेश होतो.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

**अशोकाचे कल्याणकारी कार्य**

सम्राट अशोकावर भगवान बुद्धाच्या मानवतावादी शिक्षेचा प्रभाव पडला आणि ते बौद्ध धर्माचे अनुयायी झाले. लुंबीनी, श्रीलंका, थायलंड, चीन येथे अशोकाने स्तंभ उभे करून धर्मप्रसार केला. तसेच भारत, अफगाणिस्तान, पश्चिम आशिया, मिस्त्र आणि युनानमध्येही धर्मप्रसार केला.

सम्राट अशोकाच्या काळात अनेक विद्यापीठाच्या स्थापना करण्यात आल्या. यात नालंदा, तक्षशिला, विक्रमवंशीय, कंधार इत्यादी विद्यापीठाचा समावेश होतो. येथे अनेक परकीय देशातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असत.

अशोकाने नागरिकांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेऊन साम्राज्यात अनेक ठिकाणी दवाखान्याची स्थापना केली.

कृषी उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने शेतीस पाणी पुरवठा करणा-या अनेक योजना राबवल्या. याकरिता कालवे तयार केली. यात गुजरात येथील सुदर्शन तलाव ही एक योजना होती. शेती व शेतकरी याकडे त्यांनी लक्ष दिले.

प्रवाशांना त्यांचा प्रवास सोईस्कर व्हावा म्हणून अशोकाने आपल्या साम्राज्यात अनेक ठिकाणी धर्मशाळेच्या स्थापना केल्या. धर्माचे पालन व्हावे आणि मानवाची उन्नती साधावी याकरिता अनेक ठिकाणी धर्माज्ञा कोरण्याचा आदेश दिलेला होता. प्रजेने आपले आदेश वाचावेत आणि त्याप्रमाणे वागावेत अशी ईच्छा अशोकांची होती. अशा प्रकारे अलाहाबाद, जगन्नाथपुरी व प्रयाग येथे स्तंभलेख सापडतात. तर काठेवाडीतील गिरनार येथे तशा प्रकारचा शिलालेख आढळतो. सम्राट अशोकाचे विचार समजण्यासाठी या स्तंभलेख व शिलालेखाचा उपयोग होतो.

जनतेचा प्रवास सोईस्कर व्हावा याकरिता पक्क्या सडका, जागोजागी धर्मशाळा व प्रवाशांच्या पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणुन द्रर दोन कोसावर विहिरी बांधल्या तसेच मोठ्या प्रमाणात झाडे लावली.

साम्राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण कमी व्हावे, शांतता नांदावी आणि व्यक्तीच्या विचारधारेत आमुलाग्र बदल घडून यावा अशी इच्छा अशोकाची असल्यामुळे त्याने कठोर शिक्षा रद्द केल्या.

अशोक एक महान कल्याणकारी राजा होता. त्यांनी मानवीय दृष्टीकोनातून अनेक पाऊले उचलली. याबरोबरच त्यांनी पशुपक्ष्यांचाही. तेवढाच विचार केला आणि कार्यही केले. गिरनार येथील लेखानुसार सम्राट अशोकाने त्यांच्या साम्राज्यात पशुहत्येवर बंदी घातली आणि पशु-पक्षांसाठी चिकित्सालय निर्माण केले.

कोणत्याही प्राणीमात्रास त्रास होऊ नये म्हणून अशोकाने स्वतंत्र हुकूम काढलेला होता. या व्यतिरिक्त अशोकाने चित्रकला, कोरीव काम, शिल्पकला इत्यादी गोष्टींना मोठ्या प्रमाणात उत्तेजन दिलेले होते.

सम्राट अशोकाने धर्मप्रसारासाठी अनेक मार्गाचा अवलंब केला. बौद्ध धर्मास राजाश्रय दिला. आपल्या राजकीय व्यवस्थेत धर्मप्रसाराकरिता मंत्रिमंडळात एक स्वतंत्र धर्मखाते स्थापीत केलेले होते. स्वतःच्या कालावधीत बौद्ध धर्माची तिसरी बौद्ध परिषद भरवली. दान-धर्म करण्यावर भर दिला आणि लोककल्याणकारी कामे केली. देशात व परदेशात धर्मप्रसारक पाठवले. त्यात त्यांचा मुलगा महेन्द्र आणि मुलगी संघमित्रा यांचाही समावेश होता. अशा अनेक उपाययोजनेतून धर्मप्रसार करून त्यातून मानवतावादाची दिक्षा देण्याचा अशोकाने प्रयत्न केला. यातून त्यांना मोठे यशही प्राप्त झालेले दिसते.

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur

## सारांश

अशोकाचा धर्म संकुचित नव्हता. विशिष्ट धर्म आणि विशिष्ट संप्रदाय बाळगणारा त्यांचा धर्म नव्हता. सामाजिक न्याय साध्य व्हावी हे त्यामागचे विशाल उद्दिष्ट होते. शांततेचे धोरण, सत्याचा स्वीकार, अनाक्रमण आणि सांस्कृतिक विजय यासाठी सम्राट अशोक एक महनिय राजे ठरतात.

भारतीय इतिहासातील एक थोर धर्मोपदेशक राजा होता. हाती घेतलेले कार्य मोठ्या उत्साहाने पार पाडले. प्राचीन युगातील राजाचे आद्य कर्तव्य असलेले साम्राज्यविस्ताराचे पाऊल न उचलता जनतेचे कल्याण हे धोरण स्वीकारले. यामुळे साम्राज्यात शांतता निर्माण झाली. फक्त आणि फक्त मानवीय जीवनाचे कल्याण हा एकमेव मंत्र जपला.

## निष्कर्ष

- प्राचीन भारतातील एक महान कल्याणकारी सम्राट होय.
- कल्याणकारी धोरणामुळे सामाजिक, धार्मिक, आर्थीक आणि सांस्कृतिक जिवनात स्थिरता आणि प्रगती घडून आली.
- मानवाबरोबरच पशु-पक्षाची काळजी घेणारा सम्राट होता.
- प्राचीन काळातील अशोकाचे विचार आणि कार्य प्रेरणादायी ठरतात.
- तलवारीच्या जोरावर नव्हे तर मानवी कल्याणाने माणसाचे मने जिंकता येतात. हे त्यांनी दाखवून दिले.
- भारतीय स्वातंत्र्याकरिता म. गांधींनी सत्य आणि अहिंसा या मार्गाचा अवलंब केला. ही तत्वे प्राचीन काळी मानवी कल्याणासाठी सम्राट अशोकाने उपयोगात आणली.

## संदर्भसूची

१) प्रा. का. रा. रडे, प्राचीन भारत, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
२) सम्राट अशोक, विकीपीडीया https./hi.m.wikipedia.org.wiki
३) सौरभ चौबे, प्राचीन भारत, युनिवर्सल बुक, अलाहाबाद
४) राजीव बंन्सल, प्राचीन भारतीय इतिहास, एसबीपीडी पब्लिकेशन
५) रामशरण शर्मा, भारत का प्राचीन इतिहास, ओयुपी, भारत.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Jr.No.62759
Vidyawarta®
Jan. To March 2018
Issue-21, Vol-16
01

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

-आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To March 2018
Issue-21, Vol-16

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Sr College, Chakur.

14) Agrarian crisis an emerging challenge for the Indian agricultural society
**Priya Singh, Allahabad** || 72

15) The Behaviour of online Investors in Secondary Market A Study in Gorakh...
**Dr. Amar Nath Tiwari, Gorakhpur, Uttar Pradesh** || 78

16) IMPACT OF GOVERNMENT INITIATIVES ON CHILD LABOUR ISSUES: A STUDY IN INDIA
**Dr P. VijayaKumar & Dr S.VijaySekhar Raju, Anantapuramu** || 85

17) ७३ व्या घटना दुरूस्तीनंतर महाराष्ट्रातील ग्रामपंचायत व्यवस्था
**प्रा. बबन आमले, जि. औरंगाबाद** || 91

18) ज्ञानेश्वरांचे पसायदान - एक समीक्षण
डॉ.शशिकांत नवनाथ बांगर, संगमनेर || 94

19) शिक्षक प्रशिक्षण गुणवत्ता विकास संदर्भात चिकीत्संक अध्ययन
**डॉ. आशा म. धारस्कर—भावसार, अकोला** || 97

20) बेगम हजरत महल एक झुंजार क्रांतिकारक स्त्री
प्रा. डॉ. लासुरे बी. एस., ता. चाकूर, जि. लातूर || 100

21) संगीतातील दुर्लक्षित प्रयोगप्रधान संशोधन पद्धती
**प्रा.अनिल प्रल्हाद निंबाळकर, अकोला (महाराष्ट्र)** || 102

22) 'एका गर्भाशयाची गोष्ट' सामाजिक समस्येला थेट भिडणारी कादंबरी
**प्रा.पोटे गवराम नाना, जि.सातारा** || 106

23) कृष्णा अग्निहोत्री की कहानियों में नारी के विभिन्न रूप
**एस. विजया, वरंगल, तेलंगाणा** || 110

24) सूरसागर और जनवादी संस्कृति
**डॉ. हरिणी रानी आगर, बिलासपुर (छ.ग.)** || 113

25) 'हिंदी आत्मकथा में महिलाओं का योगदान'
**प्रा. डॉ. भानुदास आगेडकर, वाई** || 117

26) भवानीप्रसाद मिश्र के काव्य में प्रेमसंवेदना
**ड़ा. हरदीप कौर, होशियारपुर** || 122



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

20

# बेगम हजरत महल एक झुंजार क्रांतिकारक स्त्री

प्रा. डॉ. लासुरे बी. एस.
भाई किशनराव देशमुख वरिष्ठ महाविद्यालय चाकूर,
ता. चाकूर, जि. लातूर

**********

**प्रस्तावना :**

भारतीय इतिहासातील १८५७-चा उठाव एक अभुतपूर्व लढा समजला जातो. या लढ्यास वि. दा. सावरकरांनी पहिले स्वातंत्र्यसंग्राम म्हणून संबोधले. ईस्ट इंडिया कंपनीच्या रुपात आलेल्या ब्रिटिशांनी भारतातील वेगवेगळ्या प्रदेशावर-वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब करून वर्चस्व संपादन करण्याचा प्रयत्न सुरु केला. यात जास्तीत जास्त भर टाकली लॉर्ड डलहौसी याने देशातील अस्तित्वात असलेल्या संस्थानिकांवर ताबा मिळवण्यासाठी 'दत्तकपुत्र नामंजूर' हा कायदा अंमलात आणला आणि संस्थानिकात एकच खळबळ माजवली. डलहौसीच्या या पावलामुळे आणि इतर कांही कारणाने ब्रिटिशांच्या विरोधात संस्थानिकांनी लढा सुरु केला. हाच तो १८५७ चा भारतीय स्वातंत्र्याचा पहिला लढा ठरला.

१८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात पुरुषाबरोबरच अनेक स्त्रियांनी ब्रिटिशांशी लढा दिला. त्यात राणी लक्ष्मीबाई, बेगम झलकारीबाई, बेगम झीन्नत महल, मैना पेशवे, अजीजन बेगम इत्यादी स्त्रियांबरोबरच बेगम हजरत महल हिचाही या लढ्यात समावेश होता. अवधचे संस्थान हे अत्यंत सुपीक भुप्रदेशाचा एक भाग होता. यामुळे या प्रदेशावर ब्रिटिशांचा डोळा होता. १८५७ च्या लढ्यावेळी ब्रिटिशांनी हे संस्थान ताब्यांत घेऊन वाजीद अली यांना कोलकत्ता येथे कैदेत ठेवले. तेव्हा या संस्थानाची राजकीय सुत्रे बेगम हजरत महलने स्वतःकडे घेतली आणि ब्रिटिशांशी लढा चालू ठेवला. अवध संस्थान जिंकून घेण्यासाठी ब्रिटिशांनी अनेक मार्गांचा अवलंब केला. ब्रिटिशांनी तिला पेन्शनचे आमिष दाखवले, तिने ते मान्यही केले नाही ना ब्रिटिशांना ती शरण गेली.

**उद्दिष्टे :**

बेगम हजरत महलच्या कार्यावर प्रकाश टाकणे.

१८५७ च्या उठावातील बेगम हजरत महलच्या योगदानाचा अभ्यास करणे आणि प्रसार करणे.

**जिवन परिचय :**

भारतीय इतिहासातील वेगवेगळ्या क्षेत्रात होऊन गेलेल्या स्त्रियांमध्ये बेगम हजरत महल एक अग्रगण्य क्रांतिकारक स्त्री होऊन गेली. ब्रिटिशांच्या विरोधात १८५७ च्या उठावात राणी लक्ष्मीबाईने जो लढा दिला तो इतिहासातील एक नाविन्यपूर्ण समजला जातो. याच उठावात अग्रगण्य असलेल्या बेगम हजरत महल हिचा जन्म इ.स. १९२० मध्ये फैजाबाद येथे झाला. तारुण्याच्या वयात तिला आई-वडिलांनी शासकीय अधिका-यांना विकले. अवधचा नवाब वाजीद अली शाह याच्या जनानखान्यात तिचा प्रवेश झाला. वाजीदच्या जनानखान्यात जवळपास ३६० बायका होत्या. बेगम हजरत महलचे मुळ नाव मुहम्मदी खानुन असे होते. वाजीद अली शहाच्या जनानखान्यात आल्यानंतर तीला 'बेगम' हा कीताब दिला गेला. तिच्या पोटी बिरजीस कादर नावाचा मुलगा जन्मास आला. तेव्हा तिला 'बेगम हजरत महल' हा कीताब दिला गेला. ती पुढे चालून याच नावाने ओळखली जाऊ लागली.

वाजीद अली शहाची ती दुसरी पत्नी झाली. अत्यंत सुंदर, उत्तम प्रशासक, हुशार, मुत्सद्दी आणि एक क्रांतिकारक अशा अनेक गुणांचा संगम तिच्यात होता. हजरत महलने १८५७ च्या उठावात ब्रिटिश सत्तेस सळो की पळो करुन सोडले. यामुळे तिला शेवटी नेपाळमध्ये आश्रय घ्यावा लागला आणि तिथेच तिचा काठमांडू येथे इ.स. ७ एप्रिल १८७९ मध्ये वयाच्या ५९ व्या वर्षी मृत्यू झाला.

**अवधचे प्रशासन :**

वाजीद अली शहाला ब्रिटिशांनी नजरकैदेत ठेवल्यानंतर बेगम हजरत महलने राज्यकारभाराची सुत्रे स्वतःच्या हाती घेतली. आपले संस्थान ब्रिटिशांच्या ताब्यात जाऊ नये यासाठी वेगवेगळी पाऊले उचलण्यास सुरुवात केली. हिंदु-मुस्लिम असा भेद न करता आणि माणसाची पारख करुन दोन्ही धर्मीयांच्या माणसांना महत्त्वाच्या पदावर आरुढ केले. बंडखोर नेत्यांशी संधान सांधून ब्रिटिशांच्या विरोधात गुप्त कारवाया करण्यास सुरुवात केली. बेगम हजरत महलच्या गुप्त कारवायावर ब्रिटिश बारकाईने लक्ष ठेऊन होते. ब्रिटिशांशी लढा द्यावा लागणार हे हजरत महलने ओळखून सैन्य उभारणीस सुरुवात केली.

**ब्रिटिश विरोधी झुंज :**

बेगम हजरत महलने अयोध्येचा राज्यकारभार हाती घेतल्यानंतर सैन्याची उभारणी मोठ्या प्रमाणात केली. तिच्या सैन्यात



PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Sr. College, Chakur

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur

राणी लक्ष्मीबाई प्रमाणेच स्त्रियांचा आणि अत्यंत सामान्य माणसाची भरती तिने केली. तिने उचललेल्या पावलामुळे ब्रिटिश नाराज होऊन त्यांनी अवध संस्थानात अत्याचारास सुरुवात केली. बेगम हजरतने पहिल्यांदा ब्रिटिशांशी गनिमी कावा पद्धतीने लढा दिला. नंतर मात्र त्यांच्याशी रणमैदानावर लढा देण्याचे ठरवले.

३० मे १८५७ च्या कालावधीत तिने ब्रिटिशांशी कडवी झुंज दिली. परंतु दुर्दैव यात तिचा पराभव झाला. जुलै १८५७ आणि ऑगस्ट १८५७ या कालावधीतही तिने ब्रिटिश सैन्यावर हल्ले केले. यातही तिला पराभव पत्करावा लागला. परंतु या हल्ल्यात ब्रिटिश सैनिकांची मोठ्या प्रमाणात तिने कत्तल केली. पुढे नोव्हेंबर १८५७ च्या कालावधीत ब्रिटिशांसोबत तिची मोठी लढाई झाली. या युद्धात बेगम हजरत महलला क्रांतिकारक, शिख सैन्य आणि स्त्रि-पुरुषांची मोठी मदत मिळाली. यामुळे या लढाईत मात्र तिला विजय प्राप्त झाला.

मार्च १८५८ मध्ये बेगम हजरत महल व ब्रिटिश यांच्यात नऊ महिने युद्ध झाले. शेवटी या युद्धात तिचा पराभव झाला. ब्रिटिशांशी केलेल्या युद्धात तिचा जय-पराजय झाला असला तरी तिने मात्र ब्रिटिशांचे कंबरडे मोडले. हजारो ब्रिटिश सैनिकांची कत्तल केली. या सर्व बाबीमुळे तिच्या लढ्याच्या बातम्या ब्रिटनपर्यंत जाऊन पोहोचल्या.

**हजरत महलचा प्रति जाहिरनामा :**

बेगम हजरत महलने ब्रिटिशांशी कडवी झुंज दिली. शेवटी तिचा पराभव झाला. ब्रिटिश शासनाने तिला पेन्शन देऊ केले. परंतु तिने पेन्शन नाकारले. आपल्याशी विश्वासघात होऊ नये म्हणून ती हिमालय पर्वताकडे निघून गेली. तिथेही ती गप्प न राहता ब्रिटिश सत्तेचा विरोध चालूच ठेवला. शेवटी १८५७ च्या उठावात ब्रिटिशांचा विजय झाला. 'ईस्ट इंडिया कंपनी'चे राज्य संपले आणि प्रत्यक्षात ब्रिटिशांची सत्ता सुरु झाली. राणी व्हिक्टोरियाने "ब्रिटनची व भारताची जनता एकच आहे. भारतीयांनी ब्रिटिशंचा विरोध करू नये. ब्रिटिश सत्ता भारताचा शिक्षण, आरोग्य, दळणवळण, संरक्षण इत्यादी क्षेत्रात प्रगती करेल" असा जाहीरनामा प्रसिद्ध केला. हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर बेगम हजरतने एक प्रति जाहीरनामा अनेक भाषेत प्रसिद्ध केला. त्यात त्या लिहितात, "आतापर्यंत भारतावर 'ईस्ट इंडिया कंपनी'चे वर्चस्व आता प्रत्यक्षात ब्रीटीशांची सत्ता लागू, त्यांनी अनेक प्रदेश गिळंकृत केले. अनेक राज्येही बुडवले. ब्रिटिश कांही ती राज्य परत करणार नाहीत. लाहोरच्या राजाला इंग्लंडला तर पेशव्यांना विठूरला कैदेत टाकले. अनेकांना त्यांनी फासावर लटकवले. राणीचा जाहीरनामा भारताच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा आहे. म्हणून तीचा जाहीरनामा स्वीकारू नका. ब्रीटनच्या भुलथापांना बळी पडू नका" अशा कडक शब्दात राणीच्या जाहीरनाम्याचा विरोध केला आणि भारतीयांना सावध केले.

**सारांश :**

रणमैदानावर हरलेली बेगम हजरत महल ती शेवटपर्यंत मनाने मात्र हरली नाही. १८५७ च्या उठावातील एक धुर्त स्त्री म्हणून तिच्याकडे पाहता येते. ब्रिटिश सत्तेचे युद्धात कंबरडे मोडणारी एक वादळी व्यक्तीमत्त्वाची ती स्त्री. एक मुस्लिमधर्मीय स्त्री असूनही स्वतःच्या हातात राज्यकारभाराची सुत्रे घेतलेली आणि रणमैदानावर युद्धाचे नेतृत्त्व स्वतःकडे घेतलेली दिसते. ब्रिटिश सैनिकांची ती कर्दनकाळ ठरली. तिच्या कार्याची प्रेरणा त्या कालावधीतील संस्थानिकांना प्राप्त झाली. तिच्या शौर्याच्या कथा ब्रिटिश वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झालेल्या होत्या. यावरुनच तिच्या कार्याची कल्पना येते. आजही तिच्या शौर्याच्या कथा अयोध्या व आजुबाजूच्या परिसरात मांडल्या जातात.

अत्यंत मुत्सद्दी, राजकारणी असलेली आणि ब्रिटिशांशी झुंज दिलेल्या एका महान भारतीय स्त्रीचा मृत्यू नेपाळ येथे इ.स. १८७९ मध्ये झाला. ती भारतीय इतिहासात अजरामर आहे.

**निष्कर्ष :**

बेगम हजरत महल एक उत्तम प्रशासक होती.

१८५७ च्या उठावातील योगदान भारतीय इतिहासातील एक अविस्मरणीय योगदान ठरते.

बेगम हजरत महल एक मुत्सद्दी व महान सेनानी होती.

संदर्भसूची :

१) डॉ. अनिल कठारे, भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१३.

२) विकीपीडिया, बेगम हजरत महल.

३) शिवाजी सगर, कांचन सगर, थोर क्रांतिकारक महिला, अरुणा प्रकाशन, लातूर, २०१३

४) पद्मजा पाटील, शोभना जाधव, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००७.

५) राधा कुमार, स्त्री संघर्ष का इतिहास, वाणी प्रकाशन, नवी दिल्ली, २००२.

६) डॉ. एस. एस. गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रिया



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

14/2019

Bhai Kishanrao Deshmukh Senior College, Chakur 413513

RNI. MAHMUL02805/2010/33461

IMPACT FACTOR 6.20

ISSN 0976-0377

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

## REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue : XVII, Vol. VI**
**Year - 9 (Half Yearly)**
**(Jan. 2018 June 2018)**

**Editorial Office :**
'Gyandeep',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913,09637935252,
09503814000,07276301000

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com
drkamblebg@rediffmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication,
Latur, Dist. Latur.-415331
(M.S.) India

**Price: ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur, Dist. Latur (M.S.)
Mob. 09423346913, 9503814000

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Aloka Parasher Sen**
Professor, Dept. of History & Classics,
University of Alberta, Edmonton,
(CANADA).

**Dr. Laxman Satya**
Professor, Dept. of History,
Lokhevan University, Loheavan,
PENSULVIYA (USA)

**Dr. Huen Yen**
Dept. of Inter Cultural
International Relation
Central South University,
Changsha City, (CHAINA)

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur. (M.S.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi , Dist. Latur. (M.S.)

**Dr. G.V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

**Dr. S.D. Sindkhedkar**
Vice Principal
PSGVP's Mandals College,
Shahada, Dist. Nandurbar (M.S.)

**Veera Prasad**
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Johrabhai B. Patel,**
Dept. of Hindi,
S.P. Patel College,
Simaliya (Gujrat)

**CO-EDITORS**

**Sandipan K. Gaike**
Dept. of Sociology,
Vasant College,
Kej, Dist. Beed (M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani,Dist. Parbhani.(M.S.)

**Ambuja N. Malkhedkar**
Dept. of Hindi
Gulbarga, Dist. Gulbarga,
(Karnataka State)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
B.K. Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue:XVII,Vol. VI, Jan. 2018 To June 2018

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Universal Basic Income (UBI) : A Conversation With & Within the Mahatma | Dr. Ankush L. More | 1 |
| 2 | To Study Thin Rotating Solid Disk of Exponentially Varying Density in Terms of Elastic-Plastic Deformation | Premdas Manohar Rathod | 9 |
| 3 | Wave Equation - Exact Solutions of the Generalized Equal Width | Dr. Kamal Kumar Jain | 21 |
| 4 | Basic Principle of Laser and Its Biological Application | Dr. D. K. Kendre | 33 |
| 5 | दक्खिनी पर वा हिन्दी का प्रभाव | मोहन काळे | 37 |
| 6 | विमर्श : अवधारणा, स्वरुप और प्रयोजन | अरुण पाठक | 44 |
| 7 | सातवाहन कालीन धर्म आणि कलेचा अभ्यास | डॉ. बी. एस. लासूरे | 49 |



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur
413513

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XVII, Vol. VI, Jan.2018 To June 2018


# सातवाहन कालीन धर्म आणि कलेचा अभ्यास

डॉ. बी. एस. लासूरे
इतिहास विभाग प्रमुख,
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर, जि. लातूर

7 Research Paper - History

**प्रस्तवणा**

प्राचीन काळातील राजकीय सत्तांचा उदय आणि विकास यावर प्रकाश टाकता असे दिसुन येते की अनेक सत्तेचे मुख्य केंद्र उत्तर भारतात असल्याचे दिसते. उत्तरप्रदेश, दिल्ली, मध्यप्रदेश हीच सत्तेची केंद्रबिंदू बनलेली होती. अगदी रामयण, महाभारत यांचाही प्रभाव याच भुप्रदेशात असल्याचे दिसते. इ.स. पुर्व दुसज्या शतकापासून भारताच्या दक्षिण भुभागावर राजकीय हलचाली होण्यास सुरूवात झाली. आणि येथे ही प्रबळ अश्या सत्ता उदयास येत गेल्या. त्यातील एक उल्लेखनीय, वीकसीत आशि सत्ता म्हणजे सातवाहन घराणे होय. विदर्भ, मराठवाडा, नाशिक, जुन्नरचा पशिमेकडील भुप्रदेश सातवाहनांच्या साम्रज्यात येत होता. पुढे आध्रंप्रदशावरती सातवाहनांचे वर्चस्व निर्माण झाले. सातवाहनांची मराठवाड्यातील प्रतिष्ठान (पैठण) ही राजधानी होती.

सातवाहनाचे राज्य डॉ. डी. सी. सरकार यांच्या मते इ.स. पुर्व ३० मध्ये राज्य स्थापित झाले. आणि त्याचा अस्त इ.स.२५० मध्ये झाला. विष्णुपुरानातील लीखानावरून सातवाहन घराण्यानी ३०० वर्षे राज्य केले. तर ब्रम्हांड पुरानानुसार सातवाहनाचे राज्य ४६० वर्षे अस्तीत्वात होते. तत्कालीन साहित्य, नाशिक, भाजे, जुन्नर, येथील शिलालेख व असंख्य नाण्याया सहाय्याने सातवाहनांचा काळ हा इ. स. पु. २३० त इ. स. २३० हा ४६० वर्षाचा सांगता येता. या राजवंशात एकुण ३० सम्राट हाऊन गेले. सिमुखं याने या घराण्यी स्थापना केली. कृष्ण, सातकर्णी, वेदश्री, शक्तिश्री, सातकर्णी द्वितीय, पुलुमायी प्रथम, राजाहाल, गौतमीपुत्र सातकर्णी, वसिष्ठीपुत्र सातकर्णी, भाग्यश्री सातकर्णी

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513



इत्यादी शक्तीशाली राजे होऊन गेले.

**उदिष्ट-**

१) सातवाहन कालीन धार्मिक जिवनावर प्रकाश टाकणे.

२) सातवाहनांच्या कला आणि साहित्यातील योगदानाचा अभ्यास करने.

सातवाहन काळातील आर्थिक विकास प्रगतीपथावर होता. कृषी, व्यापार, व्यवसाय, यात उन्नती झालेली होती. देशात आणि परदेशात सातवाहनांचा व्यापार होत असत. दक्षिण भारतातील अनेक बाजापेठेतुन रोम, ग्रीक, आग्नेय आशियायी राष्ट्रे, श्रीलंका या देशांशि व्यापार होत असत. सुरपारक, कलीना, भृग्कच्छ या सारखी बंदरे मुख्य व्यापारी केंद्र बनलेली होती. राजकीय दृष्ट्या सातवाहनांचा कालखंड हा अत्यंत स्थिरतेचा होता. सातवाहन राजे वैदिक धर्मिय असले तरी बौध्द आणि जैन धर्मास साम्राज्यात मानाची जागा होती. सातवाहन राजाचे स्थापत्य कलेत आणि साहित्यातही भरीव योगदान असल्याचे दिसुन येते.

दक्षिण भारतातील समाज वैदिक धर्मावर आधारून होता. इ. स. पु. पहिल्या शतकापासून वैदिक धर्माचे पालन दक्षिणेकडे करण्यास सुरुवात झालेली दिसते. सातवाहन राजानी अश्वमेघ, राजस्व वाजपेय यज्ञ केलेले होते. राजकीय सत्तेत यज्ञाला महत्व आलेले दिसुन येते. यज्ञ करुन ब्राह्मणास दान धर्म करण्याची पद्धत होती. सातकर्णी प्रथम याने यज्ञ करून ब्राह्मणास गाय, हात्ती, संपत्ती, जमीन याचे दान केलेले होते. आर्यच्या वैदिक धर्माचा प्रभाव येथे प्रत्यक्षात असलेला दिसुन येत नाही. कांही प्रमाणात येथे बदल झालेले अढळून येतात. राजेचं फक्त यज्ञ पद्धतीला महत्व देत असुन ते स्वत: यज्ञ करित असत. परंतु येथील सर्व सामान्य जनतेनी यज्ञ पध्दतीस स्वीकारलेले नव्हते. महान विभुतीची ईश्वर म्हणून पुजन्याची पध्दत सुरु झाली. बौध्द आणि जैन धर्मातील बोधिसत्वो व तीर्थकरांची पुजा केली जात असत. निर्गुन, निराकार या ऐवजी सगुन अशा अवतारीत देवतांची पुजा रूढ होत गेली. मुर्ती पुजेचा उदय होत गेला. कृष्णाचा अवतार विष्णु म्हणुन पुजले जात असत. वैदिक धर्मातील रूद्र ही देवता दक्षिण भारतात शिव या नांवाने ओळखली जाऊ लागली आणि त्याही देवतेची पुजा करण्याची प्रथा रुढ झाली. देवदेवतांची मंदिरे उभी करून त्यात त्या देवतेंची मुर्ती स्थापित करून त्यांची पुजा, प्रार्थना, उपवास करण्यास सुरु झालेले होते. कृष्ण, शिव, विष्णु, वासुदेव, इंद्र, सुर्य, इत्यादी देवतांची मुर्तीपुजा सातवाहन काळात करण्यात येत असे. तसेच कांही नैसर्गिक आणि प्राणि देवताही पुजनीय होत्या.

सातवाहन राजे वैदिक धर्माचे पुरस्कर्ते असले तरि त्यांनी आपल्या साम्राज्यात सर्वधर्म समभावाचे तत्व जोपासलेले होते. सातवाहन काळात वैदिक धर्माबरोबरच बौध्द आणि जैन धर्मियांनाही महत्त्वाचे स्थान होते. बौध्द धर्मिय नागरिक भिखु, भिखुनी, व्यापारी, व्यावसायीक यांना मानसन्मान दिलेला होता. यांच्याच काळात अनेक लेण्याची उभारणी या अंतर्गत शिल्प, चित्रकला, तयार करण्यात

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513



आल्या. लेण्या ही व्यापारी स्थळे होती. सातवाहन काहातील बराचसा व्यापार बौध्द धर्मियांच्या हाती होता. म्हणुन जसा जसा व्यापर वाढत गेला. त्या प्रमाणे लेणीची संख्या ही वाढत गेली. सातवाहन कालीन व्यापारास आंतरराष्ट्रीय क्षेत्रात महत्व प्राप्त झाल्यामुळे येथे बौध्द धर्मियांची संख्या वाढत गेली. बौध्द धर्मियाकरिता सातवाहनानी लेणी (बौध्दधर्मिय), स्तुप, विहार, चैत्यगृहाची उभारणी केलेली दिसते. सातवाहन काळात भारतातील उत्तर आणि पश्चिम भागावर बौध्द धर्मियांचे महत्व होते. तेच महत्व दक्षिणेकडे सातवाहनानी अभादित ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसते. वैदिक धर्म, बौध्द धर्म यास साम्राज्यात ज्या प्रमाणे स्थान होते. तसेच जैन धर्मियांनाही असल्याचे दिसते. राजा सिमुक हा जैन धर्माचा अनुयायी होता. उडीसा येथील उदयगिरी आणि खण्डगिरी येथे प्राप्त झालेल्या मुर्ती यावरुन दक्षिणेकडेही जैनधर्म प्रचलीत झालेला होता हे स्पष्ट होते.

सातवाहनांचा सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत वैभवाचा काळ होता. वेरुळ, अजिंठा, कार्ले इत्यादी ठिकाणी असलेल्या लेणीची अप्रतिम कलानिर्मीतीत सातवाहनांचा मोठा वाटा होता. सातवाहनाच्या काळात खास करुन शिल्प कलेत विशेष प्रगति झाल्याचे दिसते. तत्कालीन स्तुप व मुर्तीवरून ही गोष्ट स्पष्ट होते. कलेची साक्ष देनारे अवशेष तेर, नागार्जुनकोंडा, अमरावती (आंध्र) या परिसरात आढळतात. सातवाहन कालीन तेर येथील स्तुप उत्खननातुन सामोर आला. या स्तुपाचें बांधकाम चक्राकार असुन ते वीटेनी बांधण्या आले आहे. या स्तुपाचां व्यास ९५ फुट असुन स्तुपाचा दर्शनी भाग शिल्पांकीत कलेला आहे. तसेच उत्खननात या स्तुपा पासुन दीड मैल अंतरावर चैत्यगृहाचे अवशेष सापडतात. चेत्य म्हणजे डोंगरात कोरलेले स्तुपयुक्त प्रार्थनास्थळ होय. चैत्य म्हणजे चेतना देणारे ठीकाण होय. येथे सापडलेले चैत्यगृह ते येथील मंदिरासारखी उभारल्याचे दिसते. या भोवताली प्रदक्षिणा घालण्यासाठी चौथरा निर्माण केलेला होता. अशा प्रकारची बौध्द धर्मीय चैत्यगृह भारतात अत्यंत मोजकी आहेत.

स्तुपांमध्ये अमरावती (आंध्र) येथील स्तुप अत्यंत अप्रतिम मानला जातो. स्तुपाचा घुमट २० फुट उंच आणि चारही बाजुस कठडे आहेत. हे जमीनीपासुन १४ फुट उंचीवर आहेत. स्तंभावर छोट्या छोट्या कलाकृती आढळुन येतात. भारतहुन किंवा वेरुळ प्रमाणे अमरावतीचा स्तुप ही एक शुध्द भारतीय कला होती. हा हस्तीदंतावर बारीक कलाकुसर करनारे कारागीर सातवाहन काळात प्रसिध्दीस पावलेले होते. वेगवेगळी नक्षीकाम केलेल्या बाहुल्या, स्त्रीमुर्ती मोठ्या प्रमाणात सापडतात. या मुर्ती समोर ठेवता तत्कालीन कलाकारांच्या कौशल्याची जाणीव आपनास होते. स्त्रीच्या वेगवेगळ्या भावना व्यक्त करणाज्या प्रतिमा मोठ्या प्रमाणात बनवण्यात येत होत्या. आणि त्यांची मागणीही बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात होती. हस्तीदंतावर व वेगवेग़ळ्या पशुच्य हाडावर नक्षीकाम करून त्यापासुन वेगवेगळ्या वस्तु बनवल्या जात असत.

अत्यंत कलात्मक व निक्षीकाम केलेली मातीची भांडी सातवहान काळात बनवली जात होती. तसेच मानवी प्रतिमा, देवदेवतांच्या मुर्ती, प्राण्याच्या प्रतिमा, वेगवेगळी पुतळे या वरुन तत्कालीन

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513



स्थापत्य कला, शिल्पकला, मुर्तीकला, चित्रकला इत्यादी बाबीत सातवाहनाच्या काळात प्रगति झालेली दिसुन येते. आर्थिक उन्नति बरोबरच हा काळ सांस्कृतिक प्रगतीचाही होता हे स्पष्ट होते.

**निष्कर्ष-**

- दक्षिण भारतातील एक शक्तीशाली साम्राज्य होते. हे स्पष्ट दिसुन येईल.
- सातवाहनांनी प्राचीन भारतीय राजकारणाचे केंद्र महाराष्ट्राच्या गोदाखोज्यात आनले.
- आर्थिक दृष्ट्या संपन्न असे साम्राज्य होते.
- वैदिक धर्माचे वर्चस्व असते तरी या कालखंडज्ञत बौध्द धर्मास मानाची जागा होती. त्यांचा प्रभाव वाढलेला दिसुन येतो.
- स्थापत्य कलेत महाराष्ट्राला एक आगळे स्थानं निर्माण करुन दीलेले होते.
- वेरुळ, अजिंठा, पीतळखोरे, नाशिक, नाणेघाट, कार्ले, भासे येथील लेणी समुहातील कला अविष्कार सातवाहनांच्या काळात झालेला होतो.
- तेर येथील स्तुप, चैत्यगृह तसेच अमरावती (आंध्र) येथील स्तुप स्थापत्य कलेचे अप्रतिम अविष्कार होय.
- शिल्पकला, मुर्तीकला, चित्रकला इत्यादी क्षेत्रात प्रगती झालेली होती.

## संदर्भ सूची :-

१) Hindilibraryindia.com, सातवाहन राजवंश, इतिहास, संस्कृति और प्रशासन, कला और वास्तुकला.
२) विकिपीडीया, सातवाहन.
३) नि.सी.दीक्षीत, भारताचा इतिहास (प्रारंभ ते १५२६), पींपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर, २०११.
४) विमला सेन, प्राचीन भारत का इतिहास, रितु पब्लिकेशन, जयपुर, २०१२
५) डॉ. अनिल सिंगारे, डॉ. ओमशिवा लिगाडे, दक्षिण भारताचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातूर, २०१३
६) सौरभ चौबे, प्राचीन भारत, युनिवर्सल बुक, अलाहाबाद.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

13/2018

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 4.35 ISSN 2229-6190

UGC Approved International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for Social Sciences

# SOCIAL GROWTH

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XV, Vol. IV
Year - VIII (Half Yearly)
(Nov. 2017 To April 2018)

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** - (02382) 241913
09423346913 / 09503814000
09637935252 / 07276301000

**Webside**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College, Latur, Dist. Latur (M.S.) India.

**EDITOR**

**Robert Huet**
Professor, Dept. Of History,
University of Lowa (USA).

**Dr. Laxman Satya**
Professor, Dept. of History
Lokhevan University, Lokheavan,
Pensulviya, (USA)

**Michael Strayss,**
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris. (France)

**Verena Blechinger Talcott**
Director, Dept. of History
& Cultural Studies,
University of Barlin.
Barlin. (Germany)

**EXECUTIVE EDITORS**

**B.R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Hyderabad. (A.P.)

**Dr. Nilam Sanghani**
Borgaon Manju,
Dist. Akola (M.S.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi, Dist.Latur. (M.S.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

**Dr.Santosh Kute**
Chairman, BOS,Economics,
SGB Amravati University,
Amravati, Dist. Amravati (M.S.)

**Dr. Karamsingh Rajput**
Head Dept. of Economics,
Lokmanya Tilak College,
Vani, Dist. Yavatmal (M.S.)

**CO-EDITORS**

**Prof. Veeraprasad**
Dept. of Political Science & P. A.,
S.K. University,
Anantpur (A.P.)

**Dr. Babasaheb Gore**
Principal,
Smt. Sushiladevi Deshmukh Mahila
College, Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. P.M. Shinde**
Head, Dept. of Sociology,
D.S.M. College,
Jintur, Dist. Parbhani. (M.S.)

**Dr. Baban D. Todkar**
Head, Dept. Defence Study
New Arts, Sci.& Comm. College
Ahmednagar, (M.S.)

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur
413513

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 4.35 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XV, Vol. IV, Nov. 2017 To April 2018

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Population Education And Higher Education<br>**Dr. Rajesh S. Chandanpat** | 1 |
| 2 | Government Policies for Agricultural Sector<br>**Dr. Rajendra R. Gawhale** | 6 |
| 3 | Effectiveness of Specific Training Programme for Athletes of 100 M Sprint Event<br>**Dr. Abhijit More** | 11 |
| 4 | Investigation of Before- Compitition State Anxiety of Baseball Players<br>**Dr. Anil S. Vaidya** | 16 |
| 5 | A Comparative Study of Anxiety Between Collegiate and District Level Athlete<br>**Dr. Kalyan Maldhure** | 20 |
| 6 | Consanguinity Between Indian Democratic System & Buddhist Monastic Order: A Berief Study<br>**Dr. V. R. Kodape** | 25 |
| 7 | अमरावती शहराच्या लिंग गुणोत्तराचे बदलते प्रारुप<br>**डॉ. दिनेशकुमार सिनकर** | 33 |
| 8 | मोगल कालीन स्त्रीयांची सामाजिक आणि राजकीय परिस्थिती<br>**डॉ. बी. एस. लासूरे** | 37 |
| 9 | भ्रष्टाचार पक्षांतर आणि भारतीय लोकशाही व्यवस्था<br>**विकास वैजिनाथ टाचले** | 41 |
| 10 | भारतीय संविधान संशोधन प्रक्रिया - एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. संतोष गुणवंतराव पाटील** | 45 |
| 11 | आर्थिक धोरण आणि काळा पैसा : समाजशास्त्रीय विश्लेषण<br>**डॉ. दिनकर उंबरकर** | 49 |



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Sr. College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur
413513

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 4.35 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XV, Vol. IV, Nov. 2017 To April 2018 

8

# मोगल कालीन स्त्रीयांची सामाजिक आणि राजकीय परिस्थिती

**डॉ. बी. एस. लासूरे**
इतिहास विभाग प्रमुख,
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर, जि. लातूर

*Research Paper - History*

प्रस्तावना :

भारतातील प्राचीन कालखंडात स्त्रियांचा सामाजिक व राजकीय दर्जा हा दुय्यम होता. तत्कालीन स्त्रियावर सामाजिक बंधने मोठ्या प्रमाणात टाकण्यात आली. राजकीय स्थान तर गौणच होते. एकीकडे स्त्रिला मातृदेवता म्हणुन पुजत असतानाच तीला चार भींतीच्या आत बंदीस्त केले गेले. पुरुषांच्या वासना दृष्टीलाही ती बळी पडत गेली. जैन आणि बौध्द धर्मांनी मात्र कांही प्रमाणात स्त्रीची उन्नती साध्य करण्याचा प्रयत्न केला. थोडेसे सामाजिक स्वातंत्र्य धर्म आश्रयाखाली राहुण प्राप्त झाले. मौर्य, गुप्तकाळापासुन स्त्रियांचे सामाजिक, धार्मिक स्वातंत्र्य पुर्णपने हिराऊन घेण्यात आले. यामुळे तीच्या जिवनात आनेक वाईट चालीरिती, रुढी, परंपरानी, प्रवेश केला आणि पुरूष प्रधान सामाजव्यवस्थेची ती गुलाम बनली.

सुलतानशाहीच्या काळातील स्त्रियांचा दर्जा दुय्यमच राहिला. मोगल काळातही हिच अवस्था स्त्रियांची राहिली. बालविवाह, सतीची पध्दत, पडदा पध्दत, बहुपत्नीत्वाची पध्दत, इत्यादी प्रभा दृढ होत गेल्या. मुस्लीम राजवटीत जनानखाने उदयास आले. त्यातील स्त्रिांयची अवस्था तर अत्यंत दैनिय आणि नींदनीय झाली. हिन्दुधर्मीय स्त्रियाप्रमाणेच मुस्लीम धार्मिय स्त्रीच्या जिवनात कांही वेगळेपन नव्हते. उलट हिंदुधर्मियां पेक्षा मुस्लीम धर्मिय स्त्रिच्यांचे वाईट जिवन होते. तीच्याकडे फक्त वासनेच्या दृष्टीने पहाण्याची पध्दती होती. तलाख पध्दत, बहुपत्नीत्वाची पध्दत, पडदा (बुरखा) पध्दत. बालविवाह, या मुस्लीम धर्मियात ताठर बनत गेल्या. कांही राजकीय क्षेत्रातील स्त्रिया

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College. Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513



वगळता मुगल काळातील मुस्लीम स्त्रियांची सर्व बाजुने कोंडी करण्यात आलेली दिसते. त्या अत्यंत वाईट पध्दतीचे यातनामय जिवन जगत होत्या.

उदिष्ट्य-

१) मोगल कालीन स्त्रिंयाच्या सामाजिक व राजकीय जिवनावर प्रकाश टाकणे.

२) मुस्लीम सत्तेत स्त्रियांच्या जिवनात झालेले बदल अभ्यासने.

मोगल कालखंडात ही संयुक्त कुटुंबपध्दत अस्तीत्वात होती. बहुसंख्याक सदस्य असलेल्या कुटुंबात ह्या सर्वांची सेवा करने हेच एकमेव कर्तव्य होते. जवळपास स्त्रियांचे चुल आणि मुल हेच कार्यक्षेत्र होते. कांही प्रमाणात शेती, कारागीरी या व्यवसायात मदत करित असत. एखादा महत्वाचा कौटुंबीक निर्णय धेण्याचे या सल्लामसलत करण्याचाही अधिकार स्त्रीला नव्हता. घरात वावरत असतानाही पडदा पध्दतीचा अवलंब करवा लागत असत. घरातील चार भींतीच्या आतही ती गुलामच होती. मुलीचा जन्म हा अशुभ मानन्यात येत होता.

हिंदु या मुस्लीम समाजात बालविवाहीची पध्दत अस्तीत्वात होती. ती राजे, सरदार, जहागिरदार यांच्यातही बालविवाह मान्यता होत्या. मुस्लीम धार्मियात तलाक पध्दत असल्यामुळे घटस्फोटांचे प्रमाण कमी प्रमाणात असल्याचे दिसुन येते. मुल गर्भअवस्थेत असतानाच त्याचा विवाह ठरवण्याची प्रथा कांही प्रमाणत सुरु झाली. राजे, सरदार, वतनदार, जहागिरदार, पाटील, पटवारी, कुलकर्णी अश्या श्रीमंत वर्गात बहुपत्नीत्वाची प्रथा प्रतिष्ठीत मानले जाई. सामान्य नागरिकात एकपत्नीत्वाची पध्दत होती. सम्राट अकबरांने बालविवाह आणि मुस्लीम वर्गात असलेली बहुपत्नीत्वाची पध्दत बंद व्हावी म्हणुन प्रयत्न केलेले दिसतात. भारतीय समाजात हुंडा ही जाचक पध्दत अस्तीत्वात होती. या पध्दतीमुळे समाजव्यवस्थेत अनेक समस्यांचा उदय झालेला होता.

बहुपत्नीत्वाची पध्दत असतानाही श्रीमंत वर्ग सुखवस्तु म्हणुन आपल्या पदरी कुणबीनी बाळगत असत. कुणबीनीची खरेदी विक्री करण्यात येत होती. बाळगलेल्या कुणबीनी कडुन शेतीकाम, घरकाम करून घेतले जात असत. त्यांचे मालक त्यांच्याशी शरिरीक संबंध ठेवत. स्त्रियांना मालमत्तेत कोणताही अधिकार नसे. सर्व मालमत्तेवर पुरुषांचा अधीकार असल्याचे दिसुन येते. मध्ययुगिन काळात सती जाण्याची कुप्रथा रुढ होती. विशेषतहा क्षेत्रिय कुळातील स्त्रिया सती जात होत्या. राजपुत घराण्यातील राण्या तसेच बंगालमधील कुलीन समजनाज्या ब्राह्मण कुटुंबात ही प्रथा रुढ होती. मराठे राज घराण्यातील थोरले माधवराव पेशवे यांची पत्नी रमाबाई, छ. शाहुची पत्नी सकवारबाई या सती गेलेल्या होत्या. एकंदरित सति ही प्रथा देशात सर्वत्र असल्याचे दिसुन येत नाही. सती जानारी स्त्री दोन्हीकडच्या कुटुंबाचा उध्दार करते अशी कल्पना होती. सम्राट अकबरानी ही प्रथा बंद व्हवी म्हणुन प्रयत्न केल्याचे दिसतात.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur
413513



मुस्लीमांच्या आक्रमणा बरोबर भारतात पडदा पध्दत रुढ होत गेली. उत्तर भारतात ही प्रथा १५ व्या शतकापासुन सर्वत्र चालु झाली. पडदा (बुरखा) पध्दतीला मुस्लीम राजघराण्यातुन सुरूवात झाली. ती हळू-हळू उत्तर भारत व भारतीय समाजात राजस्थानातील राजघराण्यात रुढ होत गेली. पडदा पध्दत हे गौरवाचे लक्षण मानले जाऊ लागले. स्त्रियांनी शिक्षण घेऊ नये हाच लोकसमज या काळात होता. परंतु मराठे कालीन घराण्यात स्त्रियांना परंपरागत पध्दतीचे शिक्षण देण्यात येत असत. राजघराण्यातील स्त्रियांच्या शिक्षणाची सोय राजमहालात करण्यात असे. मोगल दरबारातील मुमताज, नुरजहाँ, जहानआरा, रोषणआरा, झेबुनिस्सा या सुशिक्षीत होत्या. त्यांना राजकारनाचे आणि प्रशासनाचे धडे दीली जात. उच्चकुलीन स्त्रियांना नृत्य, गायण, काव्य, साहित्य, धर्मतत्वज्ञान, सौंदर्यशास्त्र इत्यादीचे शिक्षण देण्यात येत असत.

मोगल सम्राट, सरदार यांचे जनानखाने होते. त्या जनानखान्यास अंत:पुर म्हणत. शहाजहान आणि औरंगजेबाच्या जनानखान्यात अनेक जाती धर्माच्या दोन हजारापर्यंत स्त्रिया होत्या. त्या सम्राट, पत्नी, मुलगी यांची सेवा करित असत. 'असे होते मोगल' या ग्रंथात निकोलस मनुची या विषयी लिहीतो "या मुसलमानांना स्त्रियाबाबत फारच आसक्ती असे. स्त्रिया हिच त्यांची मुख्य करमणुक व जवळ-जवळ एकमेव सुख होय. स्त्रियांच्या बाबतीत मुसलमान हे कमालीचे संशयखोर असत. काहींचा तर आपल्या भावावरही विश्वास नव्हता".

समाजिक जिवनात बंदीस्त झालेल्या स्त्रियात कांही राजकीय स्त्रियांनी मोगल काळात आपला राजकीय व प्रशासकीय ठसा उमटवलेला दिसतो. मराठे काळातील राजमाता जिजाऊ, ताराबाई, अहिल्याबाई होळकर, पेशवे घराण्यातील आनंदीबाई, राधाबाई, गोपीकाबाई, उमाबाई दाभाडे इत्यादी स्त्रिया समाजकारण आणि राजकारनात सक्रीय होत्या. छत्रपति शिवाजी महाराजांने जे स्वतंत्र्य मराठा सत्तेचा पाया रचला त्या स्वराज्य स्थापनेत राजमाता जिजाऊने महत्वाची भुमिका वटवलेली होती. मराठ्यावर औरंगजेबाची अक्रमणे होत असताना स्वराज्य अभादीत ठेवण्याचे कार्य ताराबाईने केले होते. वतनदार आणि सरदार यांच्या स्त्रियांनी युध्द शौर्य दाखवलेले दिसते. सामान्य कुटुंबातील स्त्रियांचाही राजकीय आणि प्रशासनात सहभाग नव्हता. मुस्लीम स्त्रियांचाही राजकीय आणि प्रशासनात वाटा होता. त्यामध्ये बाबरची मुलगी गुलबदन बेगम, जहांगीरची पत्नी नुरजहॉं, शहाजानच्या मुली जहॉंआरा बेगम आणि रोशनआरा बेगम राज्यकाभारत लक्ष घालत असत. सर्वसामान्य मुस्लीम स्त्रियामात्र राजकारनापासुन कोसो दुर होत्या. मोगल काळातील राणि कर्णावती, राणि दुर्गावती, नुरजहाँ, मुमताज बेगम, यांनी इतिहास स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटवलेला होता. मोगल काळात स्त्रियांचे सामाजिक जीवनातील स्थान हे दुय्यमच होते. सर्वसामान्य हिन्दु-मुस्लीम या दोन्ही धर्मातील स्त्रियांना काबाड कष्ट करने, चुल आणि मुल सांभाळणे हेच जिवनाचे कर्तव्य बनले. धार्मिक या राजकीय जीवनापासुन त्या वंचीत होत्या. स्त्री ही भोगवीलासाचे साधन आहे हा

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Sr. College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur 413513



दृष्टीकोण समाजात अस्तीत्वात होता. या सर्व बाबीमुळे स्त्रि जीवन अंधकारमय बनलेले होते. कन्येचा जन्म अशुभ मानला जाऊ लागला. एकंदरीत मध्ययुगिन काळातील स्त्री शिक्षण, राजकारण, आणि सामाजिक जिवनात वंचीत राहिली. स्वातंत्र्य हा शब्द त्यांच्या जिवणप्रणालिस दीसुन येत नाही.

निष्कर्ष-

- मोगल कालीन स्त्रियांना सामाजिक या राजकीय स्वातंत्र्य अस्तीत्वात असल्याचे आढळून येते नाही.
- स्त्रियांचे जिवण जगण्याचे नैसर्गिक व सामाजिक अधिकार, हक्क काढुन घेण्यात आलेले होते.
- स्त्री ही भोगवादी साधन म्हणून पहाण्याचा सामाजिक दुष्टीकोण बनल्यामुळे ती शारिरीक व मानसिक अत्याचारास बळी पडली.
- सतीपध्दत, बालविवाह, सक्तीचे वैधव्य, बटीक बाळगणे, हुंडापध्दत, बहुपत्नीतत्वाची पध्दत या प्रथा मोगल काळातही प्रचलीत होत्या.
- सम्राट अकबराने स्त्री जीवणातील वाईट प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना त्यात यश प्राप्ती झालेली दिसत नाही.
- पडदा (बुरखा) पध्दत ही मुसलीम स्त्रियांची प्रथा भारतीय समाजात रुजलेली होती.
- राजकीय घराण्यातील स्त्रियांना सामाजिक व राजकीय स्वातंत्र्य असल्याचे दिसते.

## संदर्भ सूची :-

१) प्रतिभा रानडे, बुरख्याआडच्या स्त्रिया: काल आणि आज, पद्मगंधा प्रकाशन, पुणे-२००६.
२) गीता साने, भारतीय स्त्री जीवन, मौज प्रकाशन, मुंबई, १९९७
३) डॉ. एस.एस. गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.
४) नि. रा. देसाई, भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८७
५) डॉ. एस.एस. गाठाळ, मोगलकालीन भारताचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.
६) विकिपीडीया,स्त्रि शिक्षा
७) डॉ. राजनीश राय, लेख, मध्यकालमे नारियोंकी सामाजिक एवं राजनीतीक स्थिती, एक विश्लेषण, www. educationajournal.org
८) प्रा. पी. जी. जोशी, भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपुर, २००२

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur

12
2018

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

IMPACT FACTOR 5.80

ISSN 2231- 6671

*International Registered & Recognized*

*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

**UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL**

**Issue : XIV, Vol. - VI**

**Year - VII, (Half Yearly)**

**Aug. 2017 To Jan. 2018**

**Editorial Office :**

'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 - 241913**

09423346913 / 09503814000

07276305000/ 09637935252

**Website**

**www.irasg.com**

**E-mail :**

interlinkresearch@rediffmail.com

visiongroup1994@gmail.com

mbkamble2010@gmail.com

**Published by :**

JYOTICHANDRA PUBLICATION

Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (**Mob. 09423346913**)

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Sunanda Rodge**
Principal
Govt. B.Ed. College,
Nanded, Dist. Nanded (M.S)

**Scott. A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Bhujang R. Bobade**
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,

**Dr. Dileep S. Arjune**
Professor & Head, Dept. of Economics
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna(M.S.)

**Dr. U. Takataka Mine**
Tokiyo (Japan)

**Dr. Babasaheb M. Gore**
Dean- Faculty of Education & M.C.
Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

**Dr. Nilam Chhanghani**
Dept. of Economics,
KNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

**DEPUTY-EDITOR**

**Dr. G. V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Bharat S. Handibag**
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

**CO-EDITORS**

**Dr. R.N. Salve**
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

**Ghansham S. Baviskar**
Dept. of English,
RNC & NSC College,
Nasik, Dist. Nasik.(M.S.)

**Dr. Kailash Tombare**
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

**Dr. Kailash R. Nagulkar**
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
Barshi Takli, Dist. Akola.(M.S.)

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Sr. College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College * Chakur 413513

Issue : XIV, Vol. VI
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 5.80
ISSN 2231- 6671
Aug. 2017 To Jan. 2018

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | R. C. Dutt Thoughton Famines: Nature, Causes, Effects & Policy<br>**Dr. Kishan S. Babhulgaonkar** | 1 |
| 2 | New Trends in Management System in Libraries<br>**Dr. Manisha S. Sutar (Nawathe)** | 10 |
| 3 | Groundwater Precursor Studies of Seismic Activity in Nanded, Maharashtra, India<br>**P. R. Wesanekar** | 15 |
| 4 | इसीस आणि भारताची राष्ट्रीय सुरक्षा<br>**डॉ. सुभान तुळशीराम जाधव** | 28 |
| 5 | स्वामी दयानंद सरस्वती यांचे सामाजिक विचार आणि योगदान<br>**डॉ. बी. एस. लासुरे** | 36 |
| 6 | अमरावती शहरातील शैक्षणिक कार्य<br>**डॉ. दिनेशकुमार सिनकर** | 41 |
| 7 | २१ व्या शतकातील कवितेचे अंतरंग<br>**डॉ. शिवाजी जवळगेकर** | 51 |
| 8 | ई-प्रशासनाच्या साहाय्याने सार्वजनिक तक्रारीचे निवारण<br>**डॉ. के.जी. राठोड** | 56 |



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

65

# स्वामी दयानंद सरस्वती यांचे सामाजिक विचार आणि योगदान

डॉ. बी. एस. लासुरे
इतिहास विभाग,
भाई किशनराव देशमुख वरिष्ठ महाविद्यालय,
चाकूर, जि. लातूर

## Research Paper - History

**प्रस्तावना :**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी इ.स. १८७५ मध्ये 'आर्य समाजाची' स्थापना केली. स्थापनेमागील मुख्य उद्देश हा भारतातील प्राचीनतम वैदिक धर्माचे नव्याने शिकवण देणे हा असला तरी सामाजिक कार्यातून सामाजिक समता निर्माण करून समाजातील दोष दुर काढणे आणि समाजाचा विकास करणे हे उद्दिष्ट त्यांनी समोर ठेवली. संपूर्ण भारतात या उद्देशानेच अनेक गुरुकूल, विद्यालये, महाविद्यालये, आश्रम, अनाथालये, विधवाश्रम इत्यादी संस्था स्थापीत करून सामाजिक आणि शैक्षणिक कार्य मोठ्या प्रमाणात केल्याचे दिसून येते. पुनर्विवाह, प्रौढविवाह, आंतरजातीय विवाह याचा पुरस्कार करून सामाजिक परिवर्तन मोठ्या प्रमाणात घडवून आणले. मुर्तीपूजा, जातीभेद, स्पृश्य-अस्पृश्यता, रुढीप्रियता इत्यादी बाबींवर मोठ्या प्रमाणात जनजागृती केली. जाती, पंथ, भाषा याचा भेद न करता आर्य समाजात सर्वांना येण्याचे एक मुक्त द्वार त्यांनी निर्माण केले.

स्वामी दयानंद सरस्वती समाजप्रबोधन करण्याचा 'वेद' हा आधार आहे. असे मत व्यक्त करतात आणि त्याचा स्वीकार करत असल्याने ते इतर समाजसुधारकांपेक्षा वेगळे ठरले. समाजातील अनिष्ट चालीरिती, रुढी, परंपरा, सामाजिक व आर्थिक विषमता या प्रश्नांना विरोध करण्यासाठी त्यांनी वेदांचा अधार घेतला. भारतीयांचा प्राचीन काळातील गौरवशाली ज्ञान, विज्ञान आणि वारसा सांगून भारतीय समाजास जागृत केले. भारतात त्यांना नव्याने अर्थव्यवस्था, सामाजिक व्यवस्था, राजकीय व्यवस्था निर्माण करावयाची होती. धार्मिक कर्मकांडापासून समाज मुक्त असावा यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. सतीपरंपरा, बालविवाह, पडदापद्धत या बाबीचा त्यांनी कडाडून विरोध करून स्त्री वर्गात सुधारणा झाली पाहिजे. तीला सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक अधिकार

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Sr. College, Chakur.

प्राप्त झाले पाहिजेत. या दृष्टीने पावले टाकली. समाजातील प्रत्येक घटकास शिक्षण मिळाले पाहिजे असा आग्रह केला आणि त्या दृष्टीने प्रयत्नही केले.

**उद्दिष्ट :**

१) स्वामी दयानंद सरस्वती यांच्या सामाजिक विचारांचा आणि योगदानाचा शोध घेणे.

२) स्वामी दयानंद सरस्वतीच्या स्त्री-विषयक विचारावर आणि कार्यावर प्रकाश टाकणे.

स्वामी दयानंद सरस्वतीच्या काळातही भारतीय समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जा होता. त्या अनेक समस्येला सामो-या जात असलेल्या त्यांनी पाहिले. त्यांना समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले पाहिजे असा विचार समोर ठेऊन त्या दृष्टीने पावले उचलली. अनेक सामाजिक वाईट प्रथामुळे स्त्रियांना समाजात सन्मानाने जगता येत नव्हते. विधवांचे जिवन तर अत्यंत खडतर होते. त्यांना पुनर्विवाहाचा अधिकार शासनाने अमान्य केलेला होता. यामुळे स्वामी दयानंदांनी आर्य समाजात स्त्रियांच्या पुनर्विवाहास मान्यता दिली. यामुळे समाजात परिवर्तन होऊन अनेक आर्य समाजी व्यक्तींनी विधवेशी विवाह केलेले शेकडो उदाहरणे सापडतात. विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता देऊन स्त्रियांना समाजात मानाचे स्थान निर्माण करून दिले. आंतरजातीय विवाहासही आर्य समाजानी मान्यता दिलेली होती. भारतीय समाजातील जातीभेद नष्ट करणे आणि संपूर्ण समाज एक सुत्रात बांधणे हा मुख्य उद्देश समोर ठेवला. आर्य समाजी व्यक्तीने स्वत: आंतरजातीय विवाह करून यास प्रोत्साहन दिले. बालविवाहाची पद्धत स्वामी दयानंदांना मान्य नव्हती. त्यांच्या मते विवाहाचे वय मुलांचे २५ वर्षे तर मुलीचे वय १६ वर्षाचे असले पाहिजे. बालविवाहामुळे निर्माण होणा-या समस्या समोर ठेवून त्यांनी बालविवाह प्रथेस विरोध केलेला होता.

जिथे स्त्रियांची पुजा होते. त्या समाजात श्रेष्ठ पुरुषांचा जन्म होतो आणि ज्या समाजात स्त्रियांचा मान राखला जात नाही. त्या समाजातील कार्याला फलनिष्पत्ती नसते. या मनुच्या विचाराचा पुनरुच्चार दयानंदांनी केला होता. स्वामी दयानंद म्हणतात, युरोपीयन लोकांचा विकास बाह्य कारणांनी झाला असल्याचे दिसते, कारण त्यांच्यात बालविवाहाची प्रथा नाही. स्त्रियांना समाजात मानाचे स्थान आहे. स्वतःचा जिवनसाथी निवडण्याचा त्यांना पुर्ण अधिकार आहे. मुला-मुलींना योग्य शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. एक व्यक्ती दुस-या व्यक्तीच्या कार्यास मदत करीत असतो. ते इतराचे अनुकरण न करता स्वदेशनिर्मीत वस्तु तयार करण्यावर भर देतात. अशा पद्धतीची समाजव्यवस्था निर्माण झाली पाहिजे असे त्यांना वाटत असल्यामुळे तशी समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी आयुष्यभर केलेला होता.

मनुष्याची जात ही जन्मानुसार नव्हे तर कर्मानुसार ठरली पाहिजे असे मत त्यांचे होते. सुरुवातीच्या समाजसुधारकात दयानंदांना अग्रस्थान होते. अस्पृश्यांना सामाजिकता अर्पण करून देण्यासाठी त्यांनी जातीव्यवस्थेला विरोध केला. अस्पृश्यतेचे समर्थन करणे हे अमानवीय आहे.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh Jr College, Chakur.

ईश्वरासाठी सर्वांप्रती समानता दाखवली आहे. पण स्वतःच्या स्वार्थापोटी कांही वर्गाने कांही महत्त्वपुर्ण अधिकार जसे वेद वाचण्याचा अधिकार ब्राह्मणांनी आपल्याकडे राखून ठेवला. त्यांनी उच्च-निचता निर्माण होते. ईश्वरांनी सर्वांना समान संधी दिली आहे. ज्या व्यक्तींना ज्या क्षेत्रात आवड आहे तो ते क्षेत्र निवडू शकतो. शुद्र व्यक्तीही वेद पठण करू शकतो. ब्राह्मणही स्वच्छतेचे कामे करू शकतो. स्पृश्य-अस्पृश्य भेदभाव माणसाच्या व्यवसायावर न करता त्यांच्या वागणुकीनुसार करावा असे मत मांडून वर्णव्यवस्थेवर व जातीव्यवस्थेवर स्वामींनी टीका केली.

म. गांधी म्हणतात, "स्वामी दयानंद सरस्वतीने ज्या गोष्टींचा वारसा दिला आहे त्यात स्पृश्यतेविरूद्धची त्यांची घोषणा अधिक महत्त्वाची वाटते." वर्णाबाबतची दयानंदांची भुमिका सुद्धा लोकशाहीवादी असल्याचे दिसते. ते लोकशाही आदर्शवादाचे प्रणेते ठरतात.

स्वामी दयानंद सरस्वतींनी शिक्षणाला महत्त्व दिलेले होते. ते म्हणतात, जर समाजाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल तर समाजातल्या प्रत्येक घटकाला शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झाला पाहिजे. भारतीयांना साहित्य, कला, अर्थ, गणित या विषयाबरोबरच नितीमत्ता आणि मूल्य यांचे शिक्षण दिले पाहिजे. सर्व मुलांबरोबरच मुलींनाही शिक्षणाची सक्ती करून वयाच्या ५ व्या वर्षापासून त्यांच्या शिक्षणाला सुरुवात करावी. मुला-मुलींना कमीत कमी १६ व्या वर्षापर्यंत शिक्षणप्रक्रियेत ठेवले पाहिजे असे मत मांडतात. मुलांना चांगले शिक्षण देणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. लहान मुले अनुकरणप्रिय, संवेदनशिल व संस्कारक्षम असतात. त्यामुळे शिक्षकांच्या वागण्या-बोलण्याचाही त्यांच्यावर प्रभाव पडत असतो. त्यामुळे एक आदर्श शिक्षकच एक आदर्श व्यक्तीमत्त्व घडवू शकतो. सर्वच जातीधर्माच्या मुलांनी एकाच छताखाली एकत्र व एकसारखे शिक्षण घेतले पाहिजे. यामुळे समाजात एकता तर निर्माण होईलच पण त्याबरोबर सर्वांना समान शिक्षण मिळाल्याने समाजाच्या विकासाला गती येईल.

आर्य समाजाने चालविलेल्या शिक्षण संस्था, गुरुकुल, कॉलेज हीच खरी दयानंदांची शैक्षणिक स्मारके आहेत. स्त्रियांकरिता गुरुकुलांची स्थापना करून अनेकांना शिक्षणाचे द्वार त्यांनी खुले करून दिले. देशातच नव्हे तर परदेशातही गुरुकुलाच्या शाखा स्थापन केल्या. जवळपास गुरुकुलाच्या चार हजार शाखा देशात व परदेशात स्थापीत करण्यात आल्या होत्या. विधवा स्त्रियांकरिता आश्रमगृहे निर्माण करून व्यावसायिक शिक्षणाचे प्रशिक्षणही देण्यात येऊ लागले. आर्य समाजाने अनाथाकरिता देशात ठिक-ठिकाणी अनाथालयाची स्थापना केली. अनाथालयातील मुला-मुलींना प्रशिक्षण देऊन त्यांचा विवाह घडवून आणला.

स्वामी दयानंदाने स्वदेशीचा स्वीकार केला आणि परदेशी मालाचा वापर करू नये असे मत मांडून त्यांनी आपल्या दैनंदिन जिवनात आपल्याच देशात तयार झालेल्या वस्तुंचा वापर करावा असे मत मांडून स्वदेशी प्रचार कार्य त्यांनी स्वतःपासून सुरू केले. परदेशी मालावर बहिष्कार टाकावा

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

असे समाजास सांगून एक सामाजिक चळवळ त्यांनी उभी केली. यामुळे राष्ट्रवादाची जोपासना होण्यास मदत झाली.

आर्य समाजाने धर्मांतरित झालेल्या हिन्दु लोकांना परत आपल्या धर्माच्या प्रवाहात आणण्यासाठी शुद्धीकरण चळवळ सुरु केली. ईस्लामी आणि ब्रिटिशांच्या राजवटीत दीन-दलित, गरिब, बेकार, अनाथ अशा हजारो लोकांनी ईस्लाम आणि ख्रिश्चन धर्म स्वीकारलेला होता. कांही जण अत्याचाराला तर कांहींनी प्रलोभनाला बळी पडून धर्मांतर केलेले होते. त्यांना परत हिंदू धर्मात येण्याचा अधिकार नव्हता. तो अधिकार आर्य समाजाने प्राप्त करून देऊन शुद्धीकरण मोहिमेला सुरूवात केली. हजारो मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मिय झालेल्यांना परत हिन्दु धर्मात सामाऊन घेतले. आपली प्राचीन संस्कृती आणि आपला हिंदु धर्म याचे श्रेष्ठत्व यांची जाणीव नागरिकांना आर्य समाजाने करून दिली. भुकंप, पुर, दुष्काळ इत्यादी नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांना आर्थिक मदत करण्याचे कार्यही मोठ्या प्रमाणात आर्य समाजातर्फे करण्यात आले.

स्वामी दयानंदांनी व्यक्तीच्या नैतिक शुद्धी आणि समाजाच्या पुनर्निर्मितीवर भर दिला. भारतीयांच्या चरित्रातील दुर्बलता हेच भारताच्या विनाशास जबाबदार आहे असे मत ते मांडतात. उदासीनता, निष्क्रियता, आळस, भाग्यावर विश्वास या गोष्टी सोडून देऊन पराक्रम, उत्साह, जबाबदारीच्या भावनेने समाजाचे आचरण असावे. रविंद्रनाथ टागोर दयानंदाविषयी म्हणतात, स्वामी दयानंद सरस्वती आधुनिक भारताचे पथप्रदर्शक आहेत. देशाच्या पतनअवस्थेतील निरनिराळे पंथ आणि परंपरापासून मुक्त करून हिंदू ईश्वरभक्ती आणि मानवतेचे जिवन स्वीकारलेले होते. आधुनिक युगातील प्रगतिशील भावनेशी सामंजस्य निर्माण करून देशाच्या गौरवपूर्ण भुतकाळाशी कायम संबंध ठेऊन व्यक्तीच्या कार्य आणि विचाराच्या स्वातंत्र्यातील आध्यात्मिक साक्षात्कार करून देणारी वैदिक जागृती दयानंदांना अपेक्षित होती.

हिंदु धर्मातील अंधविश्वासाचे सत्यदर्शन त्यांनी घडवून दिले व हिंदू समाजातील दोषावर प्रहार केला. अस्पृश्यता, जातीप्रथा, बालविवाह, मुर्तीपूजा आदींविरूद्ध त्यांनी प्रखरपणे लढा दिला. तसेच भारतीय समाजात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

**निष्कर्ष :**

१) स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्त्री-पुरुष समतेचा स्वीकार केलेला होता.

२) स्वामी दयानंद सरस्वती आंतरजातीय विवाहाचे समर्थक होते.

३) गुरुकुलाची स्थापना करून स्त्री-पुरुषांच्या शिक्षणाचा प्रसार केला.

४) स्वामी दयानंद सरस्वती बालविवाह प्रथेचे विरोधक होते.

५) भारतातील जातीभेद त्यांना मान्य नव्हता. जातीभेद नष्ट करण्याच्या दृष्टीने आर्य समाजाने पाऊले उचलली.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh Sr. College, Chakur

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

६) स्वामी दयानंदाच्या विचारातून व कार्यातून राष्ट्रीय एकात्मता निर्माण झाली.
७) लोकशाही सिद्धांताला आणि व्यवहाराला शक्ती मिळवून दिली.
८) राष्ट्रीय हिताच्या कार्यातून आणि विचारातून राष्ट्रवादाचा उदय आणि विकासात भर पडलेली दिसते.

## संदर्भ सूची :-

१) विकिपिडिया, दयानंद सरस्वती.
२) प्रा. किसन चोपडे, भारतीय राजकीय विचार, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००२.
३) महर्षि दयानंद सरस्वती, सत्यार्थ प्रकाश, स्टार प्रेस, बनारस, १८७५.
४) https//jivani.org, स्वामी दयानंद सरस्वती जीवनी.
५) डॉ. अनिल कठारे, महाराष्ट्राचा समग्र इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, २०१७.
६) डॉ. सोमनाथ रोडे, मराठवाड्याचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९९.
७) डॉ. दा.धो. काचोळे, भारतीय सामाजिक विचारवंत, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९९.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

ISSN 2279-0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

VOLUME - VI ISSUE - II FEBRUARY - JULY - 2018

*Peer Reviewed Referred and UGC Listed Journal*

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

| -IMPACT FACTOR / INDEXING |
|---|
| 2017 -4.954 |
| www.sjifactor.com |

✦ EDITOR ✦

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

✦ PUBLISHED BY ✦

**Ajanta Prakashan**
**Aurangabad. (M.S.)**

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Sr. College, Chakur.

| Sr. No. | Author Name | Title | Page No. |
|---|---|---|---|
| | | **MARATHI - II** | |
| १ | **प्रा. डॉ. जनार्धन केशवराव वाघमारे** | संशोधन अहवालात येणाऱ्या समस्यांचा शोध | १-३ |
| २ | **प्रा. डॉ. लासुरे बी. एस.** | मौर्य कालीन कला आणि स्थापत्य कलेचा अभ्यास | ४-७ |


'जिनिअस' या सहामयि प्रसिध्द झालेली मते मुख्य संपादक, संपादक मंडळ व सल्लागार मंडळास मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आलेली लेखकाची मते ही त्याची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोध निबंधाची जबाबदारी स्वत: लेखकावर राहील.

हे नियत कालिक मालक, मुद्रक, प्रकाशक विनय शंकरराव हातोले यांनी अजिंठा कॉम्प्युटर ॲण्ड प्रिंटर्स, जयसिंगपूरा, विद्यापीठ गेट, औरंगाबाद येथे मुद्रित व प्रकाशित केले.

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh College, Chakur.
Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

२

# मौर्य कालीन कला आणि स्थापत्य कलेचा अभ्यास

**प्रा. डॉ. लासुरे बी. एस.**

भाई किशनराव देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

**प्रस्तावना**

प्राचीन भारतातील अनेक कला या स्थापत्य कला या जवळपास धार्मिक स्वरूपाच्या असलेल्या दिसतात. हिंदू, बौद्ध या जैन धर्माच्या अनेक कलांचा त्यात समावेश होतो. धर्म ही भारतीय कलाकारांचे मुख्य प्रेरणास्थान होते. भारतीय कलेचा खरा विकास मौर्यकाळात घडून आला. दक्षिण-भारतातही या कलेचा विकास याच काळात झालेला दिसतो. भारतीय कलेत मुख्यतः वास्तुकला, शिल्पकला आणि चित्रकला यांचा समावेश होतो. प्राचीन भारतीय कला आणि स्थापत्य कला अत्यंत उच्च प्रतिच्या असल्याचे असंख्य पुरावे सापडतात.

भारतीय कलाकृतीवर विशेष मौर्यकाळातील कलेवर इराणी आणि ग्रीक शिल्पकलेची छाप पडलेली दिसून येते. त्यांच्या कलेवर भारतीय कलानिर्मात्यांनी स्वतःच्या कलेचा प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला आणि यातूनच मौर्य काळात परकीय व भारतीय कलेचे संगम होऊन गांधार कलाशैली उदयास आली.

चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक इत्यादी मौर्य राजे कलेचे भोक्ते असल्यामुळे त्यांनी विविध कलेला प्रोत्साहन देऊन कलेच्या निर्मितीची उभारणी केलेली दिसते. मॅगोस्थिनी, फाहियान इत्यादी परकीय प्रवाशांनी मौर्य कलेचे कौतुक केलेले दिसते.

**उद्दिष्टे**

१) मौर्यकालीन कला व स्थापत्य कलेचा अभ्यास करणे.

२) प्राचीन भारतीय कलेच्या झालेल्या विकासावर प्रकाश टाकणे.

**राजप्रसाद (सभा-मंडप)**

पाटणा येथे उत्खननात सापडलेला एक विशाल राजप्रसाद सापडतो. या भवनची लांबी १४० फुट एवढी होती. तर रूंदी १२० फुट असलेली आढळते. या सभा भवनाचे छत लाकडाने बनवण्यात आले होते. पाटलीपुत्र येथील या राजप्रसादाचे सुबक नक्षीकाम आणि कोरीव काम याचे मॅगोस्थिनी आणि फाहियान याने वारेमाप कौतुक केलेले आहे. फाहियान लिहितो की, "जगातील कोण्याही मानवी हाताला इतकी उत्कृष्ट कलाकृती निर्माण करता यावयाची नाही." मौर्य राजवाड्यातील सभा-भवन जो एक हजार लाकडी स्तंभावर उभा होता. यावरून त्याची भव्यता, विस्तार आणि कलेचा उत्तम नमुना याची कल्पना येते.

मौर्यकालीन राजाने शहराच्या संरक्षणाची काळजी घेतलेली होती. संरक्षणासाठी पाटलीपुत्र शहराच्या चारी बाजूला लाकडी भींत तयार केलेली होती. मध्ये मध्ये बाण चालवण्यासाठी छिद्रे सोडण्यात आलेली दिसतात. लाकडी भिंतीला लागुन खंदक खोदलेली होती. ही खंदक ६० फूट खोल तर ६०० फूट रुंद अशी मोठी होती. शहराबाहेर जाण्यासाठी जवळपास ६०

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh College, Chakur

दरवाजे तयार करण्यात आलेले होते. तर अनेक ठिकाणी लाकडी या मातीची बुरूज तयार केलेले दिसतात. मौर्य राजांनी शहराच्या विकासासाठी आणि शांततेकरिता शहराची स्वतंत्र प्रशासन व्यवस्था राबवलेली होती. पाटलीपुत्र शहराभोवती लाकडी तटबंदी होती असे मॅगेस्थेनीच्या लिखाणात आढळून येते.

**मुर्ती कला**


भांडवलशाहीत अशी धारण होती की, लोकहित संवर्धनार्थ सरकारला विशेष प्रयत्न करण्याची गरज नाही. सर्व काही आपोआप साध्य होते.कारण प्रत्येकाला स्वहित कळते.त्यातूनच समाजहित साध्य होत असते. कारण समाजाहित म्हणजे व्यक्तिहितांची बेरीज.भांडवशाहीत अशा पध्दतीचा ॲडम स्मिथच्या विचारसरणीने बरीच शतके राज्यकारभार चालला. परिणामस्वरुप दिवसेंदिवस गरिबांची दु:खे,उत्पन्न व समाजातील विषमता तसेच मजुरांची पिळवुणक वाढू लागली.पुढे जगात दोन घटना घडल्या.पहिली १९१७ ची रशियन क्रांती तर दुसरी 1929 ची जागतिक महामंदी.त्याचा परिणाम म्हणजे लोकांचा भांडवशाहीवरील विश्वास उडाला व असा विचार त्या काळात रुढावला की पोलीस राज्य हे कल्याणकारी राज्यात परावर्तित व्हावे. पुढे दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक देशांनी कल्याणकारी राज्य या कल्पनेचा अंगीकारही केला.कारण स्वातंत्र्यानंतर अनेक देशांनी लोकशाही कारभार सुरु केला. त्यामुळे साहजिकच लोकांच्या सरकारकडून अपेक्षा वाढल्या.त्यासाठीच सरकारला प्रथम निर्हस्तक्षेप नितिची त्याग करणे भाग पडून कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारणे अगत्याचे झाले.

**भारत आणि कल्याणकारी राज्य**

निरक्षरता, मागासलेपणा,दारिद्रय तसेच रोगराई नष्ट करुन सर्वसामान्याचं राहणीमान उंचावणे हे कल्याणकारी राज्याचे कर्तव्य असते.याच उद्देशाने प्रेरित होऊन स्वातंत्र्यानंतर भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली.त्यासाठीच आपल्या राज्यघटनेत संपत्तीचे केंद्रीकरण टाळणे, जनतेचे महत्तम आर्थिक कल्याण करणे,सर्वांना उपजीविकेची साधने उपलब्ध करुन देणे

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

इ.आर्थिक धोरणांचा अंतर्भाव केला गेला. 1950 च्या भारतीय राज्यघटनेने जनतेला वचन दिले,की शासन जनहितार्थ अशी समाजव्यवस्था निर्माण करील की,ज्यामुळे समाजातील सर्व घटकांना सामाजिक,राजकीय व त्यासोबतच आर्थिक न्याय दिला जाईल. अर्थातच त्यासाठी काही वर्षाचा काळ लागणार.जादूच्या कांडीप्रमाणे हे सर्व एका दिवसात होणार नाही, हे देखील तेवढेच सत्य आहे. तरीही कल्याणकारी राज्याच्या निर्मितीनंतर आज जवळपास सहा दशकाहुन अधिकचा काळ उलटत आहे. नक्कीच एवढा प्रदिर्घ काळ लोककल्याणार्थ सरकारने आपली जबाबदारी किती व कशी उचलली, या आर्थिक समीक्षणासाठी योग्य आहे.

**भारताचे आर्थिक धोरण**

लोकशाहीप्रधान भारताच्या आर्थिक धोरणांवर कल्याणकारी राज्य संकल्पनेचा नक्कीच प्रभाव जाणवतो.कारण घटनेत दिलेल्या अभिवचनांप्रमाणे सर्वांचे सामाजिक व राजकीय हित महत्तम करण्याकडे सरकारचे लक्ष लागले आहे. त्यासाठी अनेक नवनवीन योजनांचा अंगीकार करुन तळागाळातील लोकांचा गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे अत्योंदय किंवा सर्वोदय साधण्याचा प्रयत्न सुरु आहे. अर्थव्यवस्थेत एकमेकांवर अवलंबून असलेल्या सर्व क्षेत्रांच्या विकासाची जबाबदारी सरकार उचलण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यासाठी अनेक धोरणे राबविली जात आहेत. नियोजनाची कास धरल्यानंतर 1951 पासून अर्थव्यवस्थेच्या विविध अंगाचा विकास साधण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्याची प्रचिती आपल्याला पुढील बाबीतून येऊ शकते. खेडयापाडयापर्यंत अधिकोषण सोयींचा विस्तार केला, व्याज दर कमी केलेत,त्यातून शेतकरी व ग्रामीण कारागिरांची सावकारांच्या पाशातून मुक्तता केली.गामीण विकासासाठी अनेक कार्यक्रम राबवून रोजगाराच्या नवनव्या संधी निर्माण केल्या.हरितक्रांतीसाठी शेतकऱ्यांना नवीन संकरित व स्वस्त बियाणे पुरविले.रासायनिक खतांवर अनुदान दिले. शेतीमालाला हमी किमंत,कमाल जमीन धारणा कायदा,कुळांना संरक्षण लघु व ग्रामोद्योगांचा विकास द तसेच वीज,रस्ते,रेल्वे,दळणवळणाची साधने या सारख्या आर्भिक संरचनांमध्ये वाढ,सामाजीक व आर्थीक न्यायाचा प्रयत्न,लसीकरणातून रोगमुक्ती,आरोग्य संवर्धन या सर्वांव्दारे देश समृध्द करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

श्रमिकांसाठी किमान मजुरी कायदा, कामाचे तास ठरविणे,बालमजुरी प्रथा बंद,दारिद्रय व निरक्षरता निर्मुलन;तसेच सामाजिक विम्याच्या सेवा पुरवून अल्प उत्पन्न गटाचे कल्याण साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यांच्यासाठी मोफत शिक्षण,बेघरांना घरे,भूमिहिनांना जमिनी, तसेच मोफत वैद्यकिय सोयी इत्यादींची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सोबतच पुरोगामी करपध्दती स्वीकारुन श्रीमंतावर जास्तीतजास्त करभार टाकुन,त्यातून येणारा पैसा गरिबांवर खर्च करुन देशातील आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न सुरु आहे. या सर्व कार्यक्रमांव्दारे जनतेच्या राहणीमानाचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न सुरु आहे. जो कल्याणकारी राज्याचा प्रमुख उद्देशच असतो.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

Issue : XVI, Vol . III
URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 4.22
ISSN 2229-4406
Mar. 2018 To Aug. 2018


Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

**आर्थीक धोरणाची समीक्षा**

सरकारच्या वरील सर्व योजना व उपक्रम लक्षात घेतल्यानंतर असे वाटणे स्वभाविक आहे,की जर या सर्वांची देशात कार्यक्षमपणे अंमलबजावणी झालेली असेल, तर नक्कीच साठ वर्षाच्या दीर्घ काळात जनकल्याण साध्य झालेले असेल. आर्थिक व सामाजिक विषमता कमी झाली असेल. किमंतस्थैर्य असेल.ग्राहकांना बाजारात सरकारने निर्धारित केलेल्या दरात वस्तू व सेवा उपलब्ध होत असतील.विक्रीस असलेल्या वस्तूंचा दर्जा शुध्द असेल.वजनात कोणी विक्रेता खोट करीत नसेल.अर्थव्यवस्थेत साठेबाजी व नफेखोरी नसेल.जनता त्यामुळे सरकारवर बेहद्द खुष असेल. परंतू दुर्दैवाने असे आशादायी चित्र भारतीय अर्थव्यवस्थेत अजूनही निर्माण झालेले नाही. जे होणे अगत्याचे होते.

अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना वरील सर्व चित्र बघितल्यानंतर असा प्रश्न पडणे स्वाभाविकच आहे, की कल्याणकारी राज्य निर्मितीचा ध्यास घेऊन 65 वर्षांचा काळ लोटला. शेकडो कोटींचा प्रत्येक योजनेत तुटीचा अर्थभरणा केला. त्यातून उद्‌भवणाऱ्या चलनवाढ व किमंतवाढीची झळ इतकी वर्ष येथील ग्राहक जनतेने सहन केली,तरीही कल्याणकारी राज्याचे आमचे उद्दिष्ट साध्य का होऊ शकले नाही?कुठे चुकते आहे? आणि समीक्षणानंतर उत्तर मिळते,की सर्व कार्यप्रणाली एकच खोट आहे, ती म्हणजे आमच्या देशात कायद्याचे राज्य नाही.कायद्याचा वचक नाही ग्राहकहितार्थ असलेले अनेक कायदे पुस्तकातच आहेत.नोकरयंत्रणेच्या ढिलाईमुळे ग्राहक कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. येथील नफेखोरांनी कायद्याचा निर्लज्जपणे अर्थ लावुन घेतला आहे की कायदे हे जणू मोडण्यासाठीच असतात. त्यामुळे ग्राहक कल्याण म्हणजेच लोककल्याण (कारण राष्ट्रपती ते कोतवाल शेतकरी ते शेतमजुर सर्वचजण ग्राहक असतात.) पूर्णत्वाने साध्य होऊ शकले नाही. ग्राहक जनतेची आपल्या देशात सर्रास लुट होत आहे. आपल्या दैनंदिन जीवनात येणारे अनुभवच त्यासाठी पुरावे म्हणून देता येतील. जसे-सरकारने निर्धारित केलेल्या दरात रॉकेल,गॅस मिळत नाही. रेशन दुकानात पुरेशा वस्तू मिळत नाहीत. सरकारी दवाखाण्यात गरीब रुग्णांकडून पैसे आकारले जातात. सरकारी कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय कामे होत नाहीत.रस्त्याची गुणवत्ता राखली जात नाही.कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे सरकारी यंत्रणेस लक्षात आणून दिल्यावरही संबंधितांवर कारवाई होत नाही. एक ना दोन,किती उदाहरणे द्यावीत?वीज,गॅस,बस,रेल्वे,वैद्यकीय क्षेत्र,शिक्षण क्षेत्र,सरकारी कार्यालये अत्र तत्र सर्वत्र अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार.सोबतच खाद्यवस्तूमध्ये भेसळ,वजनात खोट, अप्रस्तुत जाहिरातबाजी,अवाजवी किमंती आणि अधूनमधून वस्तूंची कृत्रिम टंचाई या सर्वांद्वारे ग्राहकांची अडवणूक,फसवणूक, नागवणूक आणि लुट.थोडक्यात आमची अर्थव्यवस्था कल्याणकारी होण्याऐवजी भरकटलेली अर्थव्यवस्था बनत चालली आहे. देशात क्रेता बाजाराऐवजी विक्रेता बाजार निर्माण झाला आहे.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

**उपाययोजना**

हे सर्व अनुभवल्यानंतर प्रत्येकाने स्वत:शीच प्रश्न करावा,की हे सर्व का घडत आहे?कोण आहे या अनिष्टास जबाबदार? एकटे राज्यकर्ते?नव्हे.राज्यकर्त्यांसोबतच आमची प्रशासकीय यंत्रणा आणि ग्राहक जनता सर्वच जबाबदार. राज्यकर्त्यांच्या संवेदना बोथट झालेल्या आहेत. प्रशासन गेंडयाची कातडी पांघरल्यासारखे मख्ख बनले आहे. तर ग्राहकांना संभ्रमावस्थेची कुंभकर्णी झोप लागलेली आहे. थोडक्यात कुणी सुस्तावलेत,कुणी मस्तावलेत,तर कोणी धास्तावलेत. म्हणून पुन्हा एकदा विचारमंथन घडून येण्याची गरज आहे की, जे अवांछनीय आपण अनुभवत आहोत ते आपण सर्व मिळुन बदलू शकत नाहीत काय?संभवनीय असल्यास त्या बदलाचा मार्ग कोणता? कोणत्या मार्गाने गेल्यास कल्याणकारी अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य होईल?

नक्कीच या भरकटलेल्या अर्थव्यवस्थेचे कल्याणकारी अर्थव्यवस्थेत रुपांतर होऊ शकते.त्यासाठी गरज आहे नव्या आर्थिक धोरणाची. आमची अर्थनीती ही कृषीवर आधारित,ग्राहकाभिमुख,कल्याणकारी,स्वदेशी अर्थववस्थेची असावी.उत्पादनात वाढ व्हावी,वितरणात समानता असावी आणि उपभोगावर संयम हे देखील आमच्या नियोजनाचे पुरक उद्दिष्ट असावे. तसेच जनतेकडे फक्त गरीब म्हणूनच लक्ष न देता सोबतच ग्राहक म्हणून लक्ष देण्याचीही तेवढीच गरज आहे.

उपरोक्त सांगीतलेल्या आर्थिक धोरणाव्दारे नक्कीच देशात विकेंद्रित स्वरुपाची अर्थव्यवस्था निर्माण होईल. त्यामुळे शेतीचा विकास साधेल.राष्ट्रातील गुंतवणूकदारांना प्रेरणा मिळेल. अर्थातच ही अर्थनीती राबवत असताना देशात कायद्याचे राज्य असावे,ही माफक अपेक्षा.त्यासाठी पुन्हा एकदा गांधीजींच्या स्वातंत्र्यापुर्वीच्या कायदेभंग आंदोलनासारखे 'सविनय कायदेपालन आंदोलन' ग्राहकांना हाती घ्यावे लागेल. त्यामुळे ग्राहकांची लुट थांबून स्वराज्याचे रुपांतर सुराज्यात,कल्याणकारी राज्यात होण्यास मदत होईल आणि त्याचसाठी गरज आहे,ती सुस्त ग्राहक वर्गात जागृती आणण्याची.

**ग्राहक प्रबोधन**

भारतीय अर्थव्यवस्था भरकटत चालली आहे. हया भरकटलेल्या अर्थव्यवस्थेला धक्का देण्यासाठी म्हणजेच कल्याणकारी अर्थव्यवस्थेच्या निर्मितीसाठी गरज आहे ती म्हणजे ग्राहक शिक्षणाची.सर्वत्र अन्याय व लुट सहन करत चाललेल्या बधिर व सोशिक ग्राहकास जागृत केले,तर लोककल्याण नक्कीच साधेल. हे सर्व परिवर्तन घडवून आणण्यासाठीच ग्राहक प्रबोधनाची गरज आहे. हे प्रबोधन पुढील दोन पध्दतींनी करता येईल.

**ग्राहक शिक्षण**

ग्राहक शिक्षणाव्दारे ग्राहकांना त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव करुन देता येईल. सोबतच नागरिकांना आर्थिक गुन्हेगारीविरुध्द सुसज्ज करता येईल.तसेच राष्ट्रहितविरोधी,कर

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh College, Chakur.

बुडविणरा,समाजविघातक व ग्राहक कायद्याचे उल्लंघन करणारा व्यापार हा अनुचित व्यापार होय,हे ग्राहकांना पटवून देता येईल. ग्राहक शिक्षणातच नैतिक शिक्षणाचा अंतर्भाव असावा.कारण आमच्या देशातील सर्व अराजकतेचे मूळ है नैतिक मूल्यांच्या ऱ्हासातच आहे. त्यासाठीच नैतिक शिक्षणाची गरज आहे. नैतिकतेची चाड असेलेली माणसे निर्माण केली आणि ती उठून उभी राहिली,तर सर्व प्रश्न आपोआप खालील बसतील हे नक्की.

**ग्राहक संरक्षण**

एका बाजूने ग्राहक जनतेला ग्राहक शिक्षणातून अनुचित व्यापाराविरुध्द लढण्यासाठी उद्युक्त केल्यानंतर दुसऱ्या बाजूने तेवढीच गरज आहे त्यांच्या लढयाला,त्यांच्या आवाजाला कायद्याचे पाठबळ असण्याची.ज्यामुळे त्यांचा लढा हा कायदेशीर व समाजमान्य ठरेल आणि अनुचित व्यापारास पायबंद बसेल.त्यासाठी गरज आहे वेगवेगळया ग्राहक कायद्यांची म्हणजेच ग्राहक सरंक्षणाची.त्याव्दारे नक्कीच अनुचित व्यापारास पायबंद घालता येईल व ग्राहक कल्याण साध्य होईल.यासाठी भारतात ग्राहकांना पुढील कायदेशीर बाबी उपलब्ध झालेल्या आहेत.

१) अन्नभेसळ प्रतिरोध कायदा.(१९५४)

२) वजनेमापे कायदा.

३) पॅकेज कमॉडिटी ॲक्ट (१९७७)

४) एम.आर.टी.पी.ॲक्ट व अनुचित व्यापारी व्यवहार कायदा सुधारित (१९८४-८६).

५) ग्राहक संरक्षण कायदा (१९८६).

६) ग्राहक मंच

७) ग्राहक संरक्षण कक्ष.

वरील सर्व कायद्यांची प्रभावीपणे अमंलबजावणी झाली तर,नक्कीच ग्राहक कल्याण किंवा ग्राहक संरक्षण प्रक्रियेस बळ मिळेल.

**समारोप**

प्राचीन काळाचा इहितास गतवैभवाची साक्ष देतो की,पूर्वी भारत एक सुजलाम सुफलाम देश होता. माझा देश एक सोनेकी चिडीया होता. आज मात्र तो गलितगात्र झालेला आहे. त्यास नक्कीच नवसंजीवनी प्राप्त करुन देता येईल. मात्र त्यासाठी ग्राहक जनता,प्रशासकीय अधिकारी आणि राज्यकर्ते साऱ्यांनीच कात टाकण्याची गरज आहे. हे सारे एकत्र आले तर नक्कीच २०२० पर्यंत भारत महासत्ता होईल हे नक्की.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

## संदर्भ सूची :-


१) ग्राहक कल्याण उच्चधिकार समिती,ग्राहक कल्याण नवनीत,महाराष्ट्र शासन मुंबई,मार्च १९९८.

२) शिंदे दिलीप,कायदाकोष,बाबा भांड,औरंगाबाद.

३) पाटील कायंदे,ग्राहक संरक्षण आणि व्यवसायिक नितिमुल्य,चैतन्य प्रकाशन नाशिक,१९९९.

४) कुलकर्णी महेश,वाणिज्य संघटन,निराली प्रकाशन,पुणे,२००७.

५) बागडे प्रमोद,ग्राहक कायद्यांचे निर्माते,सांगली,२०१०.

६) जोशी जयंत,विपणन,जाहिरात व विक्रय कला,पिंपळापुरे पब्लीशर्स, नागपुर,१९९८.

७) गर्गे स.मा.,भारतीय समाज विज्ञान कोष,खंड-२,पुणे १९८७.

८) पेंढारकर वि.द.,भारतीय व्यापारी व औद्योगिक कायदे,पिंपळापुरे,नागपूर,१९९८.

९) सोनवणे वी.आर.,ग्राहक कायदा आणि सक्षमीकरण,योजना,फेब्रु.२००९,अंक ७,माहिती व प्रसारण मंत्रालय,भारत सरकार.

१०) www.ncdrc.nic.in.

११) www.fcamin.nic.in.


PLEASE VISIT OUR WEBSITE
Www.irasg.com

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh College, Chakur.

22
2018

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur 413513

ISSN 2349-1027

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCHERS

(UGC Approved & Peer Reviewed Research Journal)

Year - VI, Issue - XI, Vol.- I

Impact Factor 5.47 (GRIFI)

Aug. 2018 To Jan. 2019

EDITOR IN CHIEF

**Dr. Nilam Chhangani**

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

Issue - XI, Vol.- I
IWR
IMPACT FACTOR 5.47
ISSN 2349-1027
Aug. 2018 To Jan. 2019

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Synthesis, Characterization and antimicrobial studies of Transition Metal Complexes of 4-(8-quinolinol-5yl-methylamino) Azobenzene **Rameshwar More, Gajanan Kadam** | 1 |
| 2 | A Study of Agricultural Finance in India **Dr. R. D. Jadhav** | 5 |
| 3 | Aravind Adiga's The White Tiger: The Greater Process of Self-examination **Avinash A. Mane** | |
| 4 | A Nuclear Random Integral Equation with Application to Stochastic Chemical Kinetics **Dr. S. S. Jampalwad** | 15 |
| 5 | Synchronou Luminescence Spectroscopy for Determination of Energy Bank Structure of Buccal mucosa Cancer **D. K. Kendre** | 35 |
| 6 | गांधीजी के सिध्दांत **डॉ. आलीया मेराज सय्यद** | 39 |
| 7 | बचत गटांच्या माध्यमातून दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सक्षमीकरण **डॉ. रमेश पी. साळी** | 45 |
| 8 | छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिक्षणविषयक धोरण **डॉ. भारत सिताराम लासूरे** | 53 |
| 9 | ग्रामीण साहित्य व ग्रामीण जीवन परस्पर संबंध - एक अभ्यास **डॉ. उन्मेष शेकडे** | 57 |
| 10 | जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण कवितेतील शिक्षणव्यवस्थेचे वर्तमान वास्तव **डॉ. अनिता काशिनाथ सोनवणे** | 63 |



PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur 413513



IMPACT FACTOR 5.47
ISSN 2349-1027
Indo Western Researchers (IWR)
Issue : XI, Vol. I
Aug. 2018 To Jan. 2019
www.irasg.com

**Research Paper** 7 **Economics**

# बचत गटांच्या माध्यमातून दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सक्षमीकरण

डॉ. रमेश पी. साळी
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर, जि. लातूर

**प्रस्तावना :**

देशाला राजकीय जोखाडातून बाहेर काढण्यासाठी आपल्याला अनेक वर्ष झुंजावे लागले. अनेकांनी या स्वातंत्र्य लढ्यात आपल्या प्राणाची आहूती दिली. राजकीय पारतंत्र्यातून मुक्तता झाल्यानंतरही आपल्याकडे सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी आज ही समस्यांचा सामना सुरु आहे. आपल्या देशातील अनेक समस्यांचे मुळ हे अज्ञान आणि दारिद्र्यात आहे. भारत हा विकसनशील देश असल्यामुळे साधन सामग्रीच्या कमतरतेमुळे, लोकसंख्या वाढीमुळे विषमतेचे पूर्णत: निर्मूलन आपण करु शकलो नाही. उलटपक्षी दारिद्र्याची तीव्र समस्या आपणासमोर उभी राहिली. अगदी अलीकडच्या दोन दशकात सुक्ष्मवित्तपुरवठा व बचत गटाच्या चळवळीस बळ देवून दारिद्र्य निर्मूलनासोबतच रोजगार निर्मिती व कुशल मनुष्यबळाचा विकास करण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्यामुळेच अलीकडील काळात ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत बचत गटांना अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. लघुवित्ताचा दारिद्र्य निर्मुलनाशी जेवढा निकटचा संबंध आहे तेवढाच महिला सक्षमीकरणाशी सुध्दा आहे. दारिद्र्य निर्मूलनार्थ विविध पंचवार्षीक योजनांमधून व शासकीय पातळीवरुन जो प्रयत्न झालेले आहेत त्याची आता महिला सक्षमीकरणाच्या उद्दिष्टाशी सांगड घालण्यात येत आहे. म्हणूनच ग्रामीण विकासात विशेषत: महिला सक्षमीकरणात बचत गटाचे काय योगदान आहे? याचा शोध घेण्याचा प्रयत्न या शोध निबंधात केलेला आहे? विशेष संदर्भात महिला बचत गटांचा अभ्यास करुन शासकीय व सामाजिक पातळीवरुन केल्या जाणाऱ्या तत्संबंधीत प्रयत्नांचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. बचतगट संकल्पनेचा व तत्संबंधीत चळवळीच्या वाटचालीचा अभ्यास करणे.
२. बचत गट चळवळीची बँकेशी असलेली संलग्नता अभ्यासणे.
३. दारिद्र्य रेषेखालील महिलांच्या सक्षमीकरणात बचत गटाचे योगदान अभ्यासणे.
४. दारिद्र्य निर्मूलन व महिला सक्षमीकरणासाठी उपाययोजनात्मक कृती कार्यक्रम सुचविणे.



PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

256

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur
413513



**ोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी मुख्यत्वे द्वितीयक ांच्या सहाय्याने तथ्यसंकलन करण्यात आलेले कांही अशी प्रासंगिक निरीक्षणे, चर्चात्मक क्रियांच्या नोंदी व अनौपचारिक मुलाखती यांच्या ध्यमातूनही तथ्यसंकलन करण्यात आलेले आहे. ोधनात्मक मांडणीसाठी विवरणात्मक व विश्लेषणात्मक ्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**नात्मक प्रश्न :**

बचत गटाच्या माध्यमातून दारिद्र्यनिर्मुलन, स्वावलंबन व महिला सक्षमीकरण होत आहे काय?

बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण करण्यासाठी काही उपाययोजना सुचविता येतील काय ?

**ल्पना, अर्थ, स्वरुप व बचत गटाची उद्दिष्टे :**

**सहायता बचत गट :**

ही संकल्पना सुक्ष्मवित्त पुरवठा या संकल्पनेतून ेली आहे. सुक्ष्मवित्त (मायक्रोफ फायनान्स) ही ल्पना बांगला देशातील ग्रामीण बँक प्रकल्पातून ला आलेली आहे. नोबेल पुरस्कार विजेते प्राध्यापक द युनुस यांच्या प्रयोगशिलतेतून १९७६ मध्ये ग्रामीण प्रयोग बांगला देशात आकाराला आला आणि न जवळपास १५ वर्षात ही संकल्पना विकास ास्त्रात प्रचलित झाली. या माध्यमातून वस्तुरुप ाऐवजी सामाजिक तारणाची संकल्पनाही व्यवहारात ली. जात्री की आर्थिक दृष्ट्या कमकुवत गटासाठी सिघ्द होत आहे. सामान्यतः तारणाची क्षमता ऋणकोला कर्ज पुरवठा करण्यास बँका पुढे नाहीत. हा प्रत्यय आलेल्या प्रा. युनुस यांनी उपाय न केलेल्या प्रयोगातून गटाला कर्ज व समूहाचे या दोन संकल्पना विकसित केल्या. त्यातून ता गटाची निर्मिती करण्यात आली. त्यास ँकेची मदत घेण्यात आली. संघटित बँकींग क्षेत्राच्या लाभापासून वंचित असलेल्या व आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या समाजगटाच्या कर्जाची निकड भागविण्याचा पर्याय सुक्ष्मवित्ताच्या रुपाने पुढे आला.

तारणाविना कर्ज या गृहितावर निर्माण झालेल्या या चळवळीस कर्जासाठी समाजसमूहाच्या बचतीची गरज ही तितकीच मोठी बाब ठरली. त्यातून स्वयंसहायता गट ही संकल्पना पुढे आली. या स्वयंसहायता गटाचेच अत्यंत सुटसुटीत प्रारुप म्हणजे बचत गट होय. बांगलादेशानंतर ही चळवळ भारतातही पसरली. जगातील अनेक विशेषतः विकसनशील देशातून या चळवळीमुळे गरीबांच्या जीवनात एक आशावाद निर्माण केला. भारतातील कर्नाटक राज्यात कांही सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून अल्पबचत गटाच्या माध्यमातून या प्रकारे अनुदान प्राप्त करुन रोजगार व उद्योग उभारणीचे बरेच प्रयत्न झाले. महाराष्ट्रातही अल्पबचत गटांच्या माध्यमातून या प्रकारे अनुदान प्राप्त करुन रोजगार व उद्योग उभारणीचे बरेच प्रयत्न झाले. महाराष्ट्रातही अल्पबचत गटाच्या माध्यमातून विशेषतः महिला अल्पबचत गटाच्या माध्यमातून आर्थिक आत्मनिर्भरतेकडे सामान्य जनांची वाटचाल चालू आहे. संघटीत बँकींग व्यवहारापासून वंचित राहिलेल्या समाजसमूहापर्यंत तसेच लघु व्यावसायिका पर्यंत बँकांच्या कर्जपुरवठा नेण्याची प्रभावी माध्यम म्हणून स्वयंसहायता गटाचा उल्लेख करता येईल.

आशियायी विकास बँकेच्या व्याख्येनुसार, अत्यल्प उत्पन्न गटातील समाजघटक कुटूंबे तसेच या घटकांनी चरितार्थासाठी चालविलेले छोटे छोटे व्यवसाय यांची आवश्यकता लक्षात घेवून विविध वित्तीय सेवा पुरविणाऱ्या संस्थेला मायक्रो फायनान्स असे म्हणतात. लघुवित्त हा शब्द लघु कर्ज या संज्ञेपेक्षा व्यापक आहे. स्वयंसहाय्यता बचत गट म्हणजे स्वतःची सहाय्यता स्वतः करणे या उद्देशाने बचतीची सवय वाढविण्याच्या दृष्टीने आर्थिक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सामाजिक विकासासाठी कमीत कमी दहा व जास्तीत जास्त २० व्यक्ती एकत्र येवून तयार केलेला समूह होय. स्वयंसहाय्यता



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh College Chakur 413513

गट हे महिलांनी महिलांच्या आर्थिक उत्पन्नासाठी चालवलेले समूह होत. बचत गट समता, बंधुता, सेवा व परस्पर सहाय्य या तत्वावर आधारित आहेत.

**बचत गटाची उद्दिष्ट्ये :**

१. दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाचे दारिद्र्य निमुलन करण्यासाठी सामुहिक मदत करणे.

२. दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाचे आर्थिक उत्पन्नत वाढविणे.

३. महिलांचे बचतगट स्थापन करुन त्यांना विकासात सहभागी करुन घेणे.

४. ग्रामीण स्त्रीयांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणे.

५. बचत गटाच्या सदस्यांच्या व्यक्तीगत व सामुहिक गरजांची पुर्तता करणे.

६. लोकांना सावकारी पाशातून मुक्त करणे.

७. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सुक्ष्म वित्त संस्था स्थापन करणे.

८. महिलांचे सामाजिक व आर्थिक सबलीकरण घडवून आणणे.

**महिला सक्षमीकरण :**

महिलांच्या सक्षमीकरणाची मुख्य समस्या ही आर्थिक असते. त्यांना आर्थिक सुबत्ता प्राप्त झाली तर महिलांना सामाजिक क्षेत्रात दर्जा व सन्मान यात वाढ होवून दारिद्र्याचे प्रमाण कमी होईल. महिला सक्षमीकरण व दारिद्र्य निर्मुलन करण्यासाठी बचतगट एक प्रभावी व सक्षम पर्याय म्हणून उदयास आलेला आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे त्यांचं समाजातील, कुटूंबातील स्थान इथपर्यंत मर्यादित न राहता त्याकडे संख्यात्मकदृष्ट्याही उदा. शिक्षण रोजगार यातील स्त्रियांचं प्रमाण, लिंग गुणोत्तर, सरासरी आयुर्मान, मातामृत्यू प्रमाण इ. बघता येईल.तसेच गुणात्मक परिणाम म्हणजे त्यांचा राजकीय आणि निर्णय प्रक्रियेतील सहभाग, संचार स्वातंत्र्य, संसाधनाची उपलब्धता, मालकी यांचाही विचार सक्षमीकरणात हवा.

गेल्या १५ ते २० वर्षात देशात राबविल्या गेलेल्या उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणाचा एक स्पष्ट परिणाम म्हणजे संबंधित रोजगारात झालेली घट आणि असंघटीत रोजगारात झालेली वाढ या धोरणांमुळे स्त्रियांच्या रोजगारात झालेली वाढ ही या धोरणांचे स्त्रियांच्या रोजगारावर होणारे परिणाम गुंतागुंतीचे आहेत. काही मुठभर महिलांनी माहिती तंत्रज्ञान सारख्या क्षेत्रातून समृद्धीच्या वाटा शोधलया पण ९०% महिला असंघटीत क्षेत्रात राहिल्या. ग्रामीण शेती व्यवसाय संकटात आल्याने गरीब शेतकरी, मजूर शहरांकडे स्थलांतरीत झाला, त्यातून बेरोजगारी, अलपशिक्षण, कौशल्याचा अभाव, किरकोळ विक्री, बांधकाम मजूर किंवा घरकाम करणाऱ्या महिलांची संख्या झपाट्याने वाढत गेली. दारिद्र्य रेषेखालील महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी, तसेच दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या क्षमता वाढवून त्यांचा विकास करण्यासाठी महिलांच्या सक्रीय सहभागातून महिला बचत गट निर्माण झाले. महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक सबलीकरणासाठी (सक्षमीकरणासाठी) बचत गटाचे योगदान महत्त्वाचे आहे.

**दारिद्र्य व त्याच्या निर्मुलनार्थ बचत गटाच्या माध्यमातून केले जाणारे प्रयत्न :**

दारिद्र्याची सर्वमान्य होईल अशी व्याख्या शब्दबद्ध करणे अवघड आणि किचकट/क्लिष्ट आहे. कारण दारिद्र्याची व्याख्या कालपरत्वे, देशपरत्वे बदलते. तरी दारिद्र्याच्या व्याख्येचा आधार किमान निर्वाह पातळी किंवा चांगल्या जीवनमानाची कल्पना हाच आहे. भारतातील अर्थशास्त्रज्ञांनी किंवा भारतातील दारिद्र्याचा ज्या तज्ञांनी अभ्यास केलेला आहे. त्यात दांडेकर/रथ, भिन्दास, बर्धन, डी.टी. लकडावाला आणि सुरेश तेंडूलकर यांनी किमान उष्मांकाशी दारिद्र्याचा संबंध जोडला आहे. भारतीय योजना आयोगाने दारिद्र्य रेषा निश्चित करण्यासाठी एक समिती नियुक्त केली होती (Task force on minimum Needs & Effective consumption Demand) या समितीच्या



PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513



अहवालानुसार एका व्यक्तीस दररोज किमान २१५० उमांकाची गरज भारतातील ग्रामीण भागात एका व्यक्तीस २४०० उमांकाची गरज असते. यापेक्षा कमी उष्मांक ज्यांना मिळतात त्यांना दारिद्र्यरेषेखाली मानन्यात यावे. वाढत्या लोकसंख्येचा भार, आर्थिक भार, आर्थिक मागासलेपणा, वाढती बेरोजगारी, कृषीक्षेत्राची उत्पादकता कमी, औद्योगिकीकरणाची मंद गती, संपत्ती आणि उत्पन्नाचे विषम वाटप, शिक्षणाचा अभाव, सततची भाववाढ, नैसर्गिक साधनसामग्रीचा अनियोजित वापर, सामाजिक चाली, रुढी, परंपरा इ. कारणामुळे दारिद्र्याची निर्मिती होते. त्याचा परिणाम बेरोजगारी वाढण्यावर होतो. त्यातून स्त्री-पुरुष असमानता, स्त्रीयांचा आर्थिक छळ, यासारख्या परिणामांतून महिला बचतगटाची संकल्पना उद्यास आली. म्हणून अलीकडील काळात दारिद्र्य निर्मुलनामध्ये बचत गटाला महत्त्व प्राप्त झाले. कारण भांडवलाच्या अभावी बेकार व अर्धबेकार दारिद्र्य रेषेखालील स्त्रीयांना रोजगाराच्या व उद्योग व्यवसायाच्या संधी उपलब्ध होवू लागल्या. त्यातून महिलांचे सक्षमीकरण होण्यास सुरुवात झाली. दारिद्र्य निर्मूलन ग्रामीण विकास कार्यक्रमात स्वयंसहायता गटाची भूमिका महत्वपूर्ण आहे. या बचत गटामुळे ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलन होवून विकास साध्य करता येत आहे. शासनाच्या पुढाकाराने १ एप्रिल १९९९ पासून स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेत स्वयंसहायता गटाचा समावेश केला गेला. महत्वपूर्ण सर्वांगीन विकास कार्यक्रम तसेच दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम सुरु करण्यासाठी या कार्यक्रमात स्वयसहाय बचत गट तयार करणे, त्यांना स्वयंरोजगाराला सर्वतोपरी मदत व सहाय करणे या गोष्टी अंतर्भूत आहेत. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून ७५ व २५ टक्के या स्वरुपात निधी उपलब्ध करुन दिल्या जातो. आर्थिक पातळी सारखी असलेल्या ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील गरीब महिला व पुरुष एकत्र येवून लहान गट स्थापन करीत आहेत.सामुहिक निर्णय घेवून नियमित बचत केली जाते व जमा झालेल्या निधीतून समूहगटातील सभासदाला कर्ज देवून त्याच्या आर्थिक पातळी सारखी असलेल्या ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील गरीब महिला व पुरुष एकत्र येवून लहान गट स्थापन करीत आहेत. सामुहिक निर्णय घेवून नियमित बचत केली जाते व जमा झालेल्या निधीतून समूहगटातील सभासदाला कर्ज देवून त्याच्या आर्थिक गरजा पूर्ण केल्या जातात. त्याचप्रमाणे सामाजिक व आर्थिक विकासाचे प्रयत्न करुन सहभागात्मक निर्णय प्रक्रीयेद्वारा प्रश्न सोडविले जातात.

**वित्तीय समावेशन :**

वित्तीय समावेशन (financial inclusion) हा शब्द आता परवलीचा बनलेला आहे. विकासाच्या प्रक्रियेत विषमतेची दरी रुंदावत चाललेली आहे. त्यामुळे सर्वसमावेशक वित्तीय व्यवस्थेची गरज व मागणीचा वेग वाढत आहे. लघुवित्तांच्या चळवळीचा विस्तारलेला परिघ या वास्तवतेची साक्ष देतो. (MFIs) लघुवित्त संस्था पुरवित असलेल्या सेवा व त्यातील वैविध्य यात गेल्या कांही वर्षात प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते. देशपातळीवर सन २००५-०६ पर्यंत लघुवित्त पुरवठ्याचा लाभ घेतलेल्या बचत गटांची संख्या ६२०१०९ एवढी होती तर ४४९९०७ दशलक्ष रु. एवढे कर्ज या स्वयंसहायता बचत गटांना पुरविण्यात आलेले होते. स्वयंसहायता बचत गटाची संख्या व कर्ज रक्कमेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. महाराष्ट्रात २००२-०३ ते २००६-०७ या पाच वर्षांच्या काळात स्वयंसहायता बचत गटाच्या संख्येत ११ पटीने वाढ झालेली आहे. एकट्या भारतात लघुवित्ताची गरज भागविलेल्या कुटुंबाची / व्यक्तीची संख्या १० कोटी इतकी आहे. नाबार्डने स्वयंसहायता गट बँक जोडणी या व्यष्टी वित्तीय यंत्रणेचा १९९० च्या दशकात पुरस्कार केला. रिझर्व बँकेने या व्यष्टी वित्तीय यंत्रणेला भक्कम पाठिंबा देवून वित्त यंत्रणेच्या मुख्य प्रवाहात आणले. अकराव्या योजनेच्या आराखड्यात समावेशक वृध्दी व वित्तीय समावेशनावर भर दिलेला दिसून येतो. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण NSSO च्या आकडेवारीवरुन ग्रामीण



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

भागातील कर्ज घेतलेले शेतकरी यांचे उदा.पाहिले असता सन १९९१ मध्ये ३०.६ टक्के तर २००२ मध्ये ३८.२ टक्के संस्थात्मक वित्तीय चौकटीच्या बाहेर असणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करुन हळूहळू संस्थात्मक वित्तीय चौकटीत आणयात येत आहे. अशा प्रकारे स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून समावेशक वित्तीय योजनेचे वित्तीय असमतोल दूर करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यास मदत होत आहे. तसेच वस्तुरुप तारणाऐवजी सामाजिक तारणाची संकल्पना व्यवहारात आणली जात आहे.

**महाराष्ट्रातील स्वयं-सहाय्यता बचत गटांना बँक वित्तपुरवठा**

महाराष्ट्रामध्ये स्वयं-सहाय्यता बचत गटाच्या चळवळीमध्ये व्यापारी बँका, पारदेशिक ग्रामीण बँका आणि सहकारी बँका महत्वपूर्ण योगदान देतात. या बँका गटांची निर्मिती करुन, गटांचे संगोपन करुन वित्तीय मदत करतात. स्वयं-सहाय्यता बचत गटांना विविध व्यवसाय करण्यासाठी या बँका अल्पमुदतीचे दीर्घमुदतीचे कर्जे देवून ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करण्यात सहकार्य करतात शिवाय महिलांच्या बचत गटांना विविध व्यवसायाचे पॅकिंग, बाजारपेठ इ. प्रशिक्षण देत असतात. त्याचप्रमारणे शासकीय मदत बचत गटांना पुरंविण्यात बँका महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. महाराष्ट्र राज्यातील स्वयंसहायता बचत गटाची बँक संलग्नता प्रगती पाहता १९९२-२००० या आठ वर्षात वित्तपुरवठा झालेली गटासंख्या ५.१२% वरुन २००५-०६ पर्यंत २७.७०% पर्यंत वाढलेली आहे. तसेच या गटांना दिलेले बँक कर्ज १.७०% वरुन ३९.९९% पर्यत वाढलेले आहे. म्हणजे भारतात स्वंयसहाय्यता बचतगटात दरवर्षी वाढ व वित्त वाटप यात लक्षणीय प्रगती झालेली दिसून येते. भारतात गेल्या १८ वर्षात एकूण २२,३८,५६५ मिलियन कर्जपुरवठा बँकांनी केलेला असून सरासरी प्रत्येकी रु. १९६४३.०० इतके कर्ज मिळाले आहे. याचाच अर्थ भारतात स्वयं-सहाय्यता बचत गटांना बँकांना कर्जवितरण करण्यास फार मोठी संधी आहे. महाराष्ट्रात सन २००७ पर्यंत ९४३८६ इतके बचत गट कार्यरत होते. त्यातून २१३३२.६९ कोटी रुपये इतके कर्ज वाटप झाले. २००५-०६ अखेरपर्यंत स्वयंसहाय्यता बचत गटाच्या चळवळीत ५४७ बँका सहभागी झाल्या आहेत. या चळवळीत सहकारी बँका उशिरा सहभागी झाल्या असल्या तरी त्यांची संख्या वाढलेली आहे. एकूण बँकापैकी ६२.५३% वाटा सहकारी बँकांचा दिसून येतो. म्हणजे सहकारी बँका स्वयंसहाय्यता बचतगटांना वित्तीय सेवा देण्यात आग्रही भूमिका बजावत आहेत. त्यानंतर प्रोदशिक ग्रामीण बँकांचा क्रमांक लागतो. बँकाच्या सहभागामुळे बचत गटांना कमी वेळेत कर्ज मिळू लागले आहे. बँका स्वतः गट स्थापन करतात. महाराष्ट्रात गेल्या चार वर्षात स्व. बचत गटांमध्ये (२००२-०३ ते २००५-०६) ८४४६ वरुन ६०३२४ पर्यंत वाढ झालेली आहे. म्हणजे १४% वार्षिक वाढ झालेली आहे. प्रादेशिकदृष्ट्या विचार करता कोकण विभागात ६.३८ पट, नाशिक विभागात ५.८२ पट, पुणे विभागात १४.४७ पट, औरंगाबाद ६.९८, नागपूर विभागात ४.२२ पट, तर अमरावती विभागात ७.२ पटीने वाढ झालेली आहे.

**बचत गटाचे महत्व :**

१) बचत गटाच्या माध्यमातून स्वयंरोजगाराची निर्मिती झाल्याने महिलांना एक दिशा मिळून सामाजिक कार्यात सक्रीय सहभागी होण्याची प्रेरणा त्यांना प्राप्त झाली. महिलांच्या विकासाचा मार्ग बचतगटाच्या माध्यमातून प्राप्त झाला.

२) महिला बचतगटाच्या माध्यमातून महिलांच्या स्वावलंबनाची ही चळवळ ही एक विकास चळवळ म्हणून गतिमान झाली.

३) महिला एकत्र येवून आपला आर्थिक व बौध्दीक विकास करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली.

४) दारिद्र्य रेषेखालील महिला या केवळ गृहिणी या मर्यादित चौकटीपुरती न राहता बचतगटाच्या माध्यमातून महिला आत्मनिर्भर पुरती न राहता बचतगटाच्या माध्यमातून महिला आत्मनिर्भर होत असून स्वतःच्या कुटूंबाच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा करीत आहेत.



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

५) बचतगटातील महिलांमध्ये व्यवसाय करण्यासाठी एक प्रकारचे चैतन्य, उत्साह निर्माण झाला. त्यांचा आत्मविश्वास वाढला.

६) दारिद्र्य रेषेखालील महिलांना त्यांच्या संसारात आर्थिक स्थिरता लाभावी म्हणून इतर व्यवसायाच ज्ञान त्यांना प्राप्त व्हावे या उद्देशाने बचतगटाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध झाला.

७) आजची बचत, उद्याची प्रगती या संकल्पनेतून साकार झालेल्या बचत गटामुळे महिलांच्या आर्थिक प्रगतीबरोबर त्यांचे राहणीमान देखील उंचावत आहे.

८) दारिद्र्य रेषेखालील कुटूंबातील महिला बचतगटाच्या माध्यमातून छोटे-छोटे व्यवसाय करीत आहेत.

९) बचतगटाच्या महिला सामाजिक उपक्रमात हिरीरीने भाग घेतात. जसे अंगणवाडीस पोषक आहार पूरविणे, लाडकी लेक, परसबाग अभियान, दारुबंदी, महिला आरोग्य, बालविवाह व भ्रूणहत्या विरोध

१०) बचत गटामध्ये तरुण पिढीच्या विकासालाही प्राधान्य दिले त्यात व्यवस्थापकीय अभ्यासक्रम उपलब्ध करुन दिला.

**बचत गटाची कांही लक्षवेधी कामे :**

१) बचत गटाचे नियम व अटी यांचे पालन करणे महत्त्वाचे आहे.

२) बचतीचा मासिक हप्ता नियमितपणे भरणे आत्यावश्यक आहे.

३) कोणत्याही अर्जावर अथवा कागदावर काय लिहले आहे हे पूर्णपणे समजावून घेतल्याशिवाय सही करु नये.

४) बचतगटाचे लेखे स्वतः लिहण्यासाठी प्रयत्नशिल राहिले पाहिजे.

५) बचतगटाची सदस्य म्हणून बचतगटाचा कारभार पाहणे व नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

६) बचत गटाने घेतलेल्या सर्व प्रकारच्या कर्जाचा योग्य वापर व कर्जाची वेळेवर परतफेड

**तक्ता क्रं. १ स्वंय सहाय्यता बचत गटाची बँक संलग्नता प्रगती १९९२-२००६**

| मार्च अखेर | वित्त पुरवठा गटसंख्या | | बँक कर्ज (दशलक्ष) | |
|---|---|---|---|---|
| | स्वं. गटसंख्या | टक्केवारी | रक्कम (रु.) | टक्केवारी |
| १९९२-१९९९ | ३२९९८ | १.४७ | ५७१ | ०.५० |
| १९९९-२००० | ८१७८० | ३.६५ | १३५९ | १.२० |
| २०००-२००१ | १४९०५० | ६.६५ | २८७९ | २.५४ |
| २००१-२००२ | १९७६५३ | ८.८३ | ५४५४ | ४.८० |
| २००२-२००३ | २५५८८२ | ११.४४ | १०२२४ | ८.९८ |
| २००३-२००४ | ३६१७३१ | १६.१६ | १८५५५ | १६.२८ |
| २००४-२००५ | ५३९३६५ | २४.०९ | २९९४३ | २६.३० |
| २००५-२००६ | ६२०१०९ | २७.७० | ४४९९०७ | ३९.३९ |
| एकूण | २२३८५६५ | १००.०० | ११३९७५ | १०० |

संदर्भ : अल्पबचत नियेजन (बचतगट) प्रा. डॉ. एम. यु. मुलाणी, तक्ता क्रं. २.३ पान नं. २१

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

**तक्ता क्रं. २ स्वंय सहाय्यता बचत गटाच्या चळवळीत सहभागी बँकाची संख्या**

| बँका | २००१-०१ | | २००१-०२ | | २००२-०३ | | २००३-०४ | | २००४-०५ | | २००५-०६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % | संख्या | % |
| व्यापारी बँका | ४३ | १३.७ | ४४ | ९.९० | ४८ | ९.५० | ४८ | ८.५७ | ४७ | ८.२१ | ४७ | ८.५९ |
| प्रादेशिक ग्रामीण बँकर्स | १७७ | ५६.३७ | १९१ | ४३.०३ | १९२ | ३८.०१ | १९६ | ३५.०.० | १९६ | ३४.०० | १५८ | २८.८८ |
| सहकारी बँका | ९४ | २९.९३ | २०९ | ४७.०७ | २६५ | ५२.४७ | ३१६ | ५६.४३ | ३३० | ५७.५९ | ३४२ | ६२.५३ |
| एकूण | ३१४ | १०० | ४४४ | १०० | ५०५ | १०० | ५६० | १०० | ५७३ | १०० | ५४७ | १०० |

संदर्भ : अल्पबचत नियेजन (बचतगट) प्रा. डॉ. एम. यु. मुलाणी, तक्ता क्रं. २.५ पान नं. २४

**तक्ता क्रं. ३ महाराष्ट्रात २००१ - ०२ ते २००५-०६ प्रादेशिक जिल्हा प्रगती**

| अ. क्र. | विभाग | २००२-०३ | | २००३-०४ | | २००४-०५ | | २००५-०६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्व.ब.ग. | वित्त पुरवठा | संख्या | वित्त पुरवठा | संख्या | वित्त पुरवठा | संख्या | वित्त पुरवठा |
| १ | कोकण | ४१८ | ८.९४ | ९२८ | ३५.२२ | २१२७ | ८६.२८ | २२५३ | ६४.७६ |
| २ | पुणे | ११११ | ४१.१६ | १७०७ | १००.४४ | ६५७५ | २०८.४२ | १२५५७ | ४३३.४४ |
| ३ | नाशिक | ६७० | २८.९० | ८९९ | ५२.२५ | ३२२६ | १२२.५५ | ३९०६ | १८३.१५ |
| ४ | औरंगाबाद | १५५६ | ३९.८७ | १६१५ | ६२.९७ | ५५५६ | १९७.५१ | १०८६२ | ३३३.७१ |
| ५ | नागपूर | ३२७० | १०९.४२ | ३९२६ | १३८.६१ | १२६८० | ३७०.०३ | १३८१६ | ४७०.८८ |
| ६ | अमरावती | १४१३ | ४५.७१ | १३९५ | ५३.२१ | २४४७ | १०७.२२ | ९९३० | २७६.५१ |
| | एकूण | ८४४६ | २७४.०० | १०४७० | ४५९.०८ | ३२६११ | १०९८.०१ | ६०३२४ | १७१७.५६ |

संदर्भ : अल्पबचत नियेजन (बचतगट) प्रा. डॉ. एम. यु. मुलाणी, तक्ता क्रं. २.१० पान नं. ३३

**तक्ता क्रं.४ २००२-०३ ते २००५-०६ या कालावधीतील वित्तीय मदत व गटसंख्या**

| अ. क्र | तपशील | २००२-०३ | | २००३-०४ | | २००४-०५ | | २००५-०६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | कर्ज रक्कम () | संख्या | कर्ज रक्कम () | संख्या | कर्ज रक्कम () | संख्या | कर्ज रक्कम () |
| १ | व्यापारी बँका (%) | १४९८९ (५३.४%) | ४१३.१ (५९.३३) | १८७६९ (४८.७%) | ६५५.४७ (४८.७%) | ३५८५१ (२८.५२ %) | १३३५.३६ (३२.२८%) | ६६३२६ (५०.४४ %) | २१९२.८४ (५५.५०-१) |
| २ | प्रादेशिक ग्रामीण बँक (%) | ९३३९ (३३.२७%) | २०३.९२ (२९.३२%) | १२५१४ (३२.४७%) | ३११.९५ (२८.१७ %) | १८७११ (१४.८८ %) | ५६५.५७ (१३.६६%) | २८११५ (२१.३९ %) | १०२२.३८ (२५.९०%) |
| ३ | ग्रामीण बँका | ३७३७ (१३.३३७ %) | ७९.७९ (११.३५%) | ७२५२ (१८.८३७%) | १६०.६८ (१४.१८%) | ७११४६ (५६.५९ %) | २२३४.११ (५४.०४%) | ३७०२९ (२८.१७ %) | ७३६.४५ (१८-६३) |
| | एकूण (%) | २८०६५ (१००%) | ६९६.८१ (१००%) | ३८५३५ (१००%) | ११३६.१ (१००%) | १२५७० ८ (१००%) | ४१३५.०४ (१००%) | १३१४७० (१००%) | ३९५१.६७ (१००%) |



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

२६२

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513



करण्यासाठी प्रयत्नशील राहीले पाहिजे.

**महिला सक्षमीकरणात येणाऱ्या अडचणी :**

शासनाने चांगल्या उद्देशाने बचतगट योजनेच्या सक्षमीकरणाला प्राधान्य दिले असले तरी दारिद्र्य, बिगर दारिद्र्य अशी वर्गवारी केली असून महिलांच्या अनुदानाबाबत भेद केला आहे. दारिद्र्यरेषेतही फक्त अनुसूचित जाती-जमाती यांनाच अनुदान दिले जात आहे. स्वयं सहाय्यता बचतगटात राजकीय पक्ष जातीय वादाला खतपाणी घालत आहेत. त्यात ग्रामीण शहरी, प्रादेशिक, मागास, आदिवासी अशा विविध मार्गाने चळवळीची ताकत कमी करत आहेत.

**महिला सक्षमीकरणासाठी उपाययोजना :**

१) महिला बचत गटांच्या सदस्यांना विक्रीकौशल्य, व्यवस्थापन कौशल्य, विपणन कौशल्य इ. बाबत व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात यावे.

२) महिला बचत गटाच्या उत्पादीत वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करुन दयावी.

३) महिला स्वयंसहाय्यता अल्पबचत गटांना रिझर्व बँकेच्या नियंत्रणाखाली आणावे.

४) अशा गटांना अनुदान व कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी रिझर्व बँकेने पुढाकार घेवून धोरणात्मक कृती कार्यक्रम आखावा. त्याबरहुकूम कार्यवाही करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांना लिड बँक म्हणून जबाबदारी देवून त्यांचे मार्फत सर्व गटांना सामावून ध्यावे.

५) स्वयंसहाय्यता अल्पबचत गटातून तारणक्षमता नसलेल्या महिलांना संधी देण्यात यावी. अशा सर्वच महिलांचा यात समावेश करावा.

६) स्वयंसहाय्यता अल्पबचत गटातील राजकीय हस्तक्षेप त्वरीत थांबवावेत.

७) या चळवळीला व्यावसायिक प्रवृत्तीकडे जाण्यापासून रोखावे. त्यासाठी भांडवलदार, श्रीमंतांचा यातील हस्तक्षेप दूर करावा. सेवाभाव व सामान्यांचे आर्थिक स्वावलंबन या गोष्टी समोर ठेवूनच या चळवळीचे सनियंत्रण करण्यात यावे.

८) वितरित कर्ज व अनुदान परतफेडीतील नियमिततेची दक्षता घेणे आवश्यक असून त्यासाठी कडक धोरणेही आखता येतील.

९) स्वयंसहाय्यता अल्पबचत गटाची पत व त्याप्रमाणे वित्तपुरवठा टप्प्या टप्प्याने वाढविणे गरजेचे आहे.

## संदर्भ सूची :-


१) बचतगट मित्र - ऑगस्ट २०१० (मासिक)

२) लोकराज्य - एप्रिल/मे २०१०, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.

३) लोकराज्य - मार्च २०१३, माहिती जनसंपर्क महासंचानालय, मुंबई.

४) अल्पबचत नियोजन (बचतगट), प्रा.डॉ.एम.यू.मुलाणी, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

५) Indian Economy - R, Datta & Sumdram, S.Chothd Publication New-Nelhi- १९९८


PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - III July - September - 2018

English Part - IV / Marathi Part - III

**Peer Reviewed Referred**
**and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur.

# CONTENTS OF MARATHI PART - III



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | विंदा एक प्रयोगशील कवी<br>**प्रा. डॉ. सुनंदा चरडे दुबे** | ६२-६५ |
| १६ | अल्पसंख्यांक अभिव्यक्ती: भाषा आणि साहित्य<br>**प्रा. डॉ. संजय शिंदे** | ६६-६९ |
| १७ | सामाजिक दस्तावेज : दलित स्त्री आत्मकथने<br>**प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे** | ७०-७३ |
| १८ | ग्रामीण कादंबरीची भाषिक वैशिष्ट्ये<br>**डॉ. बाळासाहेब बाबुराव लिहिणार** | ७४-७७ |
| १९ | मराठी शैलीविचाराच्या मर्यादा: दलित साहित्याच्या संदर्भात<br>**नरेंद्र मून** | ७८-८३ |
| २० | महिला सबलीकरण व राजकीय सहभाग<br>**डॉ. विनायक के. खिल्लारे** | ८४-८८ |
| २१ | राजर्षी शाहु महाराजांचे व्यापार उद्योग विषयक धोरण<br>**प्रा. धनंजय महादेवराव चंदनशिवे** | ८९-९३ |
| २२ | श्रीक्षेत्र माहूर येथील स्त्रियांची नाव घेण्याची उखाणे : संकलन व चिकित्सा<br>**प्रा. डॉ. लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव** | ९४-९७ |
| २३ | ग्रामीण विकासावर माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा प्रभाव<br>**डॉ. प्रा. भाग्यश्री एल. धणे** | ९८-१०१ |
| २४ | आरक्षण धोरण : ब्रिटीशकालीन भारत<br>**डॉ. आर. व्ही. म्हस्के** | १०२-१०४ |
| २५ | भूकंप : एक नैसर्गिक आपत्ती<br>**प्रा. डॉ. जनार्धन केशवराव वाघमारे** | १०५-१०८ |
| २६ | सम्राट अशोकाच्या मानवतावादी विचाराचा व कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास<br>**प्रा. डॉ. लासुरे बी. एस.** | १०९-१११ |





Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

# २५. भूकंप : एक नैसर्गिक आपत्ती

**प्रा. डॉ. जनार्धन केशवराव वाघमारे**
(भूगोल विभाग), भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर, जि. लातूर (महाराष्ट्र).

**प्रस्तावणा**

निसर्गात अनेक शक्ती कार्य करत असतात. काही शक्ती विधायक कार्य करतात तर काही विघातक कार्य करतात. विघातक कार्य करणाऱ्या शक्तीपैकीच एक शक्ती म्हणून भूकंपाकडे पाहिले जाते. भूकंप ही एक नैसर्गीक आपत्ती आहे. भूकंपामूळे खूप मोठी हनी होते. यात वित्त हनी पेक्षा जिवीत हनी सहण न होणारी हनी आहे. त्यामूळे ही आपत्ती रोखता येत नसली तरी तिच्याबद्दल लोकांमध्ये जाणीव जागृती निर्माण करून हनीचे स्वरून निश्चितच कमी करू शकतो.

**उद्देश्य**

भूकंप ही संकल्पना समजवून घेणे व भूकंपा अगोदर, भूकंपाच्या वेळी व भूकंपा नंतर घ्यावयाची काळजी स्पष्ट करणे.

**विषय निवड**

३० सप्टेंबर १९९३ रोजी महाराष्ट्रातील लातूर जिल्हयात किल्लारी या ठिकाणी भूकंपाचा खूप मोठा हदरा बसला आणि त्यात मोठी जिवीत आणि वित्त हनी झाली ही हनी नैसर्गीक अपत्तीमूळे झाली हे जरी सत्य असल तरी याची तिवृता काही प्रमाणात कमी करता आली असती. त्यातून काही जीवीत व आर्थिक हनी टाळता आली असती म्हणजेच नैसर्गीक आपत्ती ही जरी आकस्मीत असली तरी तिच्याबद्दल लोकांमध्ये जागरूकता असेल तर निश्चितच लोक त्याला धैर्याने तोंड देतात त्यातून जिवीत आणि वित्त हनी टाळू शकतात. त्यासाठी पाहीजे ते फक्त अशा आपत्तीसाठी लागणारे ज्ञान महत्तचे आहे तेच या विषयातून सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**माहीती स्त्रोत व संशोधन पध्दती**

या शोधनिबंधासाठी दूय्यम स्वरूपाची माहीत वापरलेली असून याच्या विश्लेषणासाठी विविध पध्दतीचा वापर केलेला आहे. या माहीतीच्या स्पष्टीकरणासाठी आलेख तयार करण्यात आलेला आहे.

**विषय विवेचन**

भूकंप म्हणजे भूप्रष्ठाखलील किंवा भूप्रष्ठावरील खडकाचे गुरूत्वाकर्षणीय संतलन क्षणीक बिघडल्यामूळे भूपृष्ठ कंप पावतो किंवा हेलकावतो त्यास भूकंप असे म्हणतात.



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

**भूकंपप्रवण क्षेत्रातील लोकांनी भूकंप होण्याआधी व भूकंपानंतर घ्यावयाची दक्षता**

भूकंप ही एक नैसर्गीक आपत्ती असून तिचा अभ्यास वेगवेगळया स्तरावर केला जात आहे. हा अभ्यास अनेक देशात चालू असला तरी भूकंप केव्हा होईल, त्याची तिवृता किती असेल, त्याचा परिणाम कोणत्या भागावर किती असेल, यापैकी कोणत्याही गोष्टीचे अचूक निदान करणे शक्य नाही. जगातील चीन, जापन व अमेरिक ा, युरोपच्या द. किनाऱ्यावरील देशात भूकंपाचे सारखे धक्के बसत असतात. भूकंपाचा धक्का बसणे हे त्यांच्य जीवनाचे एक प्रमूख अंग बनले आहे.चीनसारखे राष्ट्र भूकंपासारख्या एक नंबरच्या क्षेत्रावर मात करून ते राष्ट्र आज अमेरिकेसारख्या बलाढय राष्ट्राच्य बरोबरीला येऊन बसले आहे. जपानसारख्या दुसऱ्या महायूध्दात बेचीराख झालेल्या राष्ट्राने भूकंप आणि ज्वालामूखीच्या उद्रेकाला तोंड देत औद्योगीक क्षेत्रात इतकी प्रगती केलेली आहे की जगामध्ये सर्व बाजारपेठात जपानमध्ये तयार होणाऱ्या वस्तूला मागणी असते. वरील राष्ट्रांची व तांत्रिक ज्ञानाच्या आधारे मात करून मानवी जीवन समृध्द करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. भूकंप ही एक नैसर्गीक आपत्ती आहे. भूकंपामूळे खूप मोठी हनी होते. यात वित्त हनी पेक्षा जिवीत हनी सहण न होणारी हनी आहे. त्यामूळे ही आपत्ती रोखता येत नसली तरी तिच्याबद्दल लोकांमध्ये जाणीव जागृती निर्माण करून हनीचे स्वरून निश्चितच कमी करू शकतो.

**भूकंप होण्याआधी घ्यावयाची दक्षता**

१. घर बांधताना भूकंपरोधक घरे बांधावेत.

२. भूकंपप्रवण भागातील घरांची नियमीत पाहणी करून दूरूस्ती करणे गरजेचे आहे.

३. भूकंपप्रवण क्षेत्र भागात भूकंप धक्क्यात टिकून राहणारी घरे बांधण्यासाठी जे शास्त्रीय आणि तांत्रिक ज्ञान उपलब्ध आहे. त्याचा वापर करावा.

४. घरातील विजेच्या वायरिंग सबंधी प्राथमीक माहिती घरातील सर्वांना असणे आवश्यक आहे.

५. तसेच गॅस गळती होऊन आग लागण्याचा धोका असतो त्यामूळे सिलेंडरचा वापर नसताना रेग्यूलेटर बंद करण्याची माहिती लहान मूलापासून वृध्द व्यक्तीपर्यंत सर्वांना असणे आवश्यक आहे. ही माहीती घरातील जेष्ठ व्यक्तीने सर्वांनाच दिली पाहिजे.

६. प्रत्येक घरात चालू स्थितीत असलेली बॅटरी असणे व तीही लगेचच सापडेल अशा ठिकाणी ठेवणे जरूरीचे आहे. अशा वस्तूची जागा निश्चितच असावी त्यामूळे ती पटकन सापडेल.

७. घरामध्ये रेडिओ, ट्रांझिस्टर, टि. व्ही., मोबाईल अशा प्रसार माध्यमाची साधणे असणे आवश्यक आहे. कारण भूकंप झाल्यावर त्याबद्दल लोकांना सूचना देण्याचे लगेचच उपयोगात येणारे प्रसारमाध्यम म्हणून शासन त्याचा उपयोग करू शकते व त्याबद्दल सविस्तर माहीती मिळू शकते.

८. ज्यांना शक्य आहे त्यांनी घरात अग्नीशामक साधन ठेवणे आवश्यक आहे.

९. घरामध्ये सतत प्रथमोपचार पेटी असने कावश्यक आहे. ही पेटी शक्यतोवर दरवाजाला बांधून ठेवावी .



Bhai Kishanrao Deshmukh Senior College * Chakur 413513
PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr. College, Chakur.

१०. भरलेले डबे किंवा इतर जड वस्तू घरामध्ये उंचीवर ठेवू नये.

११. अनेकदा शेतकरी वर्ग घरात खूंटीला शेतीची जड आवजारे टांगून ठेवतात, ती त्यांनी उंचीवर टांगून ठेवू नयेत.

१२. काही जणांच्य घरात हंडया, झूंबरे तसेच विजेचे पंखे छताला लावलेले असतात. या गोष्टी छताला घट्ट लावलेल्या आहेत का ते पहावे. त्याची सतत पाहणी करावी जेणे करून अश्या वेळी धोका होणार नाही.

१३. रात्री झोपताना शक्यतोवर सर्वात बाहेरच्या खोलीत झोपावे. संकट काळात पटकन बाहेर पडता यणे शक्य होते.

१४. घरात पलंगाच्या खाली वस्तू ठेवू नयेत भूकंपकाळात संरक्षणसाठी पलंगाखाली किंवा टेबलाखाली आश्रय घेता येतो. बाहेर पडणे शक्य नसेल तरच या जागेचा वापर करावा.

१५. गुरांचा गोठा भेंडाच्य भितीचा व छतावर पत्रे किंवा गवत टाकून तयार केलेला असावा.

१६. घरात उंच लाकडी व लोखंडी कपाटे असतील तर ती शक्यतो भिंतीला घट्ट बांधलेल्या स्थितीत राहतील याची काळजी घ्यावी, म्हणून भूकंप धक्क्यात ती अंगावर पडणार नाहीत.

१७. शाळेत वर्ग चालू असताना भूकंपाचे धक्के बसत असतील तर गडबड गोंधळ न करता सर्वांनीबाहेर कसे पडावे याचे प्रशिक्षण मूलांना देऊन त्यांची प्रात्यक्षिके करून घेणे आवश्यक आहे.

१८. घरामध्ये वाऱ्याने हलणार नाही अशा ठिकाणी घताला बारीक दोरीला काही घूगरू बांधून ठेवावीत जेणेकरून भूकंपाच्या हदऱ्याने ते घूंगरू हलून त्याचा आवाज होऊ लागला की भूकंप ४.८ महत्तेपेक्षा जास्त तीव्रतेचा आहे असे समजावे व सावधतेने बाहेर पडावे.

१९. अनेकदा भूकंपाच्य धक्क्याने घराचे दार घट्ट बसते व ते चटकण उघडता येत नाही अशा वेळी टेबलाखली किंवा पलंगाखाली किंवा किमान दाराच्या उंबऱ्याजवळ येऊन उभे रहावे.

**भूकंपाच्या वेळी घ्यावयाची दक्षता**

मोटारीतून प्रवास करत असताना भूकंपाचा धक्का जाणवला तर त्या भूकंपाची तिवृता ६ रिश्टर स्केलपेक्षा मोठी आहे असे समजावे व मोटार तात्काळ थांबवावी.

१ भूकंपाचा धक्का बसत असताना तूम्ही शेतात उघडयावर असाल तर सर्वात सूरक्षित आहात याची खात्री बाळगावी.

२ भूकंपाच्य वेळी आपण उभे आहेत तेथे आजू- बाजूस काहीच नाही याची खत्री करून घ्यावी.

३ भूकंपाच्य वेळी घरातून बाहेर जाताना निदान फेटा गुंडाळावा. शिरस्त्राण (हेल्मेट) जवळ असेल तर त्याचा उपयोग करावा.

४ भूकंपकाळात घरातून बाहेर पडतेवेळी शक्यतो दोन भिंतीच्य मधून म्हणजे बोळातून पळून जाण्याचा प्रयत्न करू नये.



PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
Jr College, Chakur

**भूकंप झाल्यानंतर घ्यावयांची दक्षता**

१. भूकंपाचा आवेग ओसरल्यावर लगेचच गॅसची शेगडी पेटवू नये. प्रथम गॅस सिलेंडर व शेगडी व्यवस्थित आहे का ते पहावे व मगच गॅस पेटविण्यासाठी काडी ओढावी.

२. भूकंपानंतर अनेकदा घरातील इलेक्ट्रिकच्या वायरमधून धूर येताना दिसतो. अशावेळी इलेक्ट्रिक मीटर जवळ असलेले मेन स्वीच ताबडतोब बंद करावे.

३. भूकंप झाल्यानंतर काही वेळांनी रेडीओ अथवा टेलीव्हीजन सूरू करून त्यावर प्रसारीत होणाऱ्य बातम्या ऐकाव्यात.

४. भूकंपानंतर अनेक अफवा उठतात त्यावर कधीही विश्वास ठेवू नये.

५. भूकंप झाल्यावर संपूर्ण घरांची व्यवस्थितपणे पाहणी करावी.

६. ज्या घरांना फार मोठे तडे गेले अहोत. त्या घरात शक्यतोवर राहू नये. मूख्य धक्क्यानंतर जे पश्चात धक्के बसतात, त्या धक्क्यांत घरांच्य भिंती किंवा संपूर्ण घर कोसळण्याची शक्यता असते.

**निष्कर्ष**

मानव कोणत्याही संकटापेक्षा तो घाबरून किंवा भितीनेच अधिक परेशान होतो. केवळ त्या संकटाचे ज्ञान नसल्यामूळे त्यातून बाहेर कसे पडावे त्यातून आपला जिव व आपल्या बरोबर इतर जिव व आपली संपत्ती कसे वाचवावे त्याला सूरक्षीत कसे ठेवावे या बद्दलची माहिती नसल्यामूळेच संकटामूळे होणाऱ्य हनीत अधिक भर पडतो. त्यासाठी लोकांना भूकंपापूर्वी भूकंपाच्या वेळी आणि भूकंपाच्या नंतर काय करावे हे सांगणे आवश्यक आहे. हे माहीत झाल्यास भूकंपामूळे होणऱ्या हनीची तिवृता कमी होते.

**उपाय योजना**

संकट कोणतेही असो त्या संकटाबद्दलची सविस्तर माहीती करून घेणे आवश्यक आहे. याबद्दल शालेय शिक्षणापासून ते पदवी पर्यंतच्या शिक्षणात या बद्दलची माहिती गांभीर्याने देणे आवश्यक आहे. तसेच वेगवेगळया प्रसार माध्यमाच्या माध्यमातून अशा संकटांना कशा प्रकारे तोंड द्यावे या बद्दलची माहीती प्रसारीत करून जन सामान्यांपर्यंत हो माहिती पोहचविणे आवश्यक आहे. त्यामूळे होणारी हनी कमी होऊ शकते.

**संदर्भ**

१. भूरूपशास्त्र - डॉ. शेटे एस. टी., डॉ. फूले एस. जे.,डॉ. शहापूरकर ओ. व्ही.

२. प्राकृतीक भूगोल – प्रा. दाते सू. प्र., प्रा. सौ. दाते स.

३. वेबसाईड



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
Jr College, Chakur

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

IMPACT FACTOR 4.95

ISSN 2249-4081

*UGC Approved National Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for Economics & Commerce*

# GLOBAL ECONOMIC RESEARCH

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue - XIV, Vol. - II**
**Year - VII, (Half Yearly)**
**(Oct. 2017 To Mar. 2018)**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382-241913**
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

CHIEF EDITOR

**Dr. Arun Tawar**
Head, Dept. of Economics,DSM Mahavidyalaya,
Parbhani, Dist. Parbhani (MS) India
Chairman, BOS, Economics, SRTM University,
Nanded, Dist. Nanded (MS) India

MEMBER OF EDITORIAL BOARD

**Dr. Vasant K. Bhosale**
Prabhani, Dist. Prabhani (M.S.)

**Dr. Deelip S. Arjune**
Jalna, Dist. Jalna (M. S. )

**Dr. Rajendra Dhane**
Dharwad, Dist. Dharwad (Karnataka)

**Dr. Balaji G. Kamble**
Latur, Dist. Latur (MS) India

**Dr. Rajendra Gawhale**
Khamgaon, Dist. Buldhana (M.S.)

**Dr. Santosh T. Kute**
Khamgaon, Dist. Buldhana (M.S.)

**Dr. R. D. Ganapure**
Osmanabad, Dist. Osmanabad (M.S.)

**Dr. Vikas V. Sukale**
Nanded, Dist. Nanded (M.S.)

**Dr. Karamsingh Rajput**
Vani, Dist. Yavatmal (M.S.)

**Dr. Balasaheb S. Patil**
Panvel, Dist. Raigarh (M.S.)

**Dr. Sachin B. Napate**
Pune, Dist. Pune (M.S.)

**Dr. Ganpat Gaikwad**
Kolhapur, Dist. Kolhapur (M.S.)

**Dr. M. Selva Kumar**
Sivakashi, Dist. Sivakashi (T.N.)

**Dr. Madhav Palmatte**
Latur, Dist. Latur (MS) India

**Dr. Ashok K. Vala**
Amreli, Dist. Amreli (Gujrat)

**Dr. Suresh B. Dhake**
S.N.D.T. University, Mumbai (M.S.)

**Dr. Kumar Prabhakar**
Lakhisarai (Bihar)

**Dr. T. Prasanna**
Koppa, Dist. Chicmagalur, (Karnatka)

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur
413513

Issue : XIV, Vol. II
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 4.95
ISSN 2249-4081
Oct. 2017 To Mar. 2018

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | The Buying Decision Process and Types of Buying Decision Behavior<br>**Dr. P. T. Pawar** | 1 |
| 6 | Socio-Economic Conditions of Down Trodden Classes in Nanded City (Hair Cutting Saloon)<br>**Balaji S. Turaikar, Dr. T. M. Shginde** | 33 |
| 7 | महाराष्ट्रातील पायाभूत सूविधांच्या विकासामध्ये ऊर्जा क्षेत्राची भूमिका<br>**डॉ. देवीदास पाटील** | 36 |
| 8 | महाराष्ट्रातील उद्योगांचा अभ्यास<br>**डॉ. आर. डी. जाधव** | 43 |
| 9 | भारतातील असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या सामाजिक सुरक्षेचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. बी. व्ही. हालमंडगे** | 47 |
| 10 | महात्मा गांधीजींचे पर्यावरणविषयक विचार एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. परशुराम पाटील** | 58 |



PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

# महाराष्ट्रातील उद्योगांचा अभ्यास

डॉ. आर. डी. जाधव
अर्थशास्त्र विभाग
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर, जि. लातूर

**8** RESEARCH PAPER - ECONOMICS

**प्रस्तावना :**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासा करिता त्या देशातील उद्योगधंद्यात वाढ होणे आवश्यक आहे. अल्पविकसित देशाच्या आर्थिक विकास प्रक्रियेत औद्योगिकरणाला महत्वाची भूमिका निभावायची असते. औद्योगिक विकासाच्या सहभागाशिवाय विकासाची परिभाषाच अपूर्ण ठरते. कोणत्याही राज्याच्या किंवा देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासात उद्योग क्षेत्राचे स्थान अत्यंत महत्वपूर्ण असते. औद्योगिकरणामुळे कृषी व सेवा क्षेत्राच्या प्रगतीला चालना मिळते. तसेच औद्योगिकरणामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्र राज्य हे भारतातील एक औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर राहिलेले राज्य आहे. राज्याच्या आर्थिक विकासात औद्योगिक क्षेत्राचा वाटा मोठा आहे. राज्यातील भौगोलिक स्थिती, मुलभूत सोयी, वित्तिय सोई इत्यादि मुळे महाराष्ट्राचा औद्योगिक विकास वेगाने झालेला आहे. भारताच्या उद्योगाचा पाया मुंबईत १८५४ मध्ये स्थापन झालेल्या पहिल्या कापड गिरणीने घातला गेला. त्यानंतरच्या शतकात मुंबईत कापड गिरण्यांची संख्या एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढली की, भारताचे मँचेस्टर म्हणून मुंबईने गौरव प्राप्त केला. कापड उद्योगाच्या भरभराटीने येथे अन्य व्यवसाय स्थापण्यास चालना मिळाली कारण मुंबई ही वित्तिय भांडवल उपलब्धतेसाठी प्रसिध्द असून औद्योगिकदृष्ट्या हे शहर भारतात पहिल्या क्रमांकावर आहे. अंतर्गत आणि समुद्रमार्ग

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

होणाज्या वाहतूक व दळणवळणाचे हे एक मुख्य केंद्र आहे. परिणामी महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईने देशाची आर्थिक राजधानी म्हणून लौकिक प्राप्त केला आहे. उद्योग उभारण्याची जिद्द असलेले लहान मोठे उद्योजक, भरपूर कौशल्य असलेले तंत्रज्ञ व कामगार, उद्योग वाढीसाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक सुविधांचा मोठ्या प्रमाणात विकास तसेच सामाजिक सेवा निर्माण करण्यावर भर या सर्व गोष्टीमुळे महाराष्ट्राचा देशाच्या औद्योगिक विकासात नेहमीच सिंहाचा वाटा राहिला आहे.

**अभ्यासाचा उद्देश** (Objective of the Study) :

१. महाराष्ट्रातील उद्योगांचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्रातील उद्योगांची संरचना अभ्यासणे.

३. महाराष्ट्रातील उद्योगात झालेल्या रोजगाराचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती** (Research Methodology):

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता विविध आर्थिक सर्वेक्षण अहवाल, विविध लेख, विविध संदर्भग्रंथ, इत्यादि सारख्या द्वितीयक सामुग्रीचा (Secondary Data) व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करून संबंधित शोध निबंध तयार करण्यात आलेला आहे.

**महाराष्ट्रातील उद्योगांची संरचना व विकास :**

स्वातंत्र्यपूर्वकाळापासून महाराष्ट्र हे औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर असणारे राज्य आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक संरचनतेत झपाट्याने बदल होताना दिसून येतो. १९६० च्या दशकात महाराष्ट्राच्या औद्योगिक उत्पादनात उपभोग्य वस्तू क्षेत्राचे प्राबल्य होते. ज्यामध्ये सुती कापड, खाद्य वस्तू, अभियांत्रिकी, रसायने, कागद, काच सामान आणि सिमेंट, छोटी यंत्रे इत्यादि उद्योग होत. प्रामुख्याने उपभोग्य वस्तू उत्पादनाचा वाटा जवळपास ५२ टक्के इतका होता. परंतु मागील दोन दशकाचा विचार केल्यास भांडवली वस्तू उद्योग व पुनर्निमाण वस्तु उद्योग यांचे वर्चस्व वाढतांना दिसून येते तर उपभोग्य अथवा ग्राहक वस्तू उद्योगाचे वर्चस्व कमी होताना दिसून येते. १९९१ च्या सुमारास यंत्रे, अवजारे, सुटे भाग, रसायने, रंग, पेट्रोलियम, उत्पादने, परिवहन सामुग्री, वस्तू निर्माण, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्यूटर हार्डवेअर व सॉफ्टवेअर यांना महत्त्व आलेले आहे.

महाराष्ट्राच्या एकूण औद्योगिकदृष्ट्या देशातील इतर राज्यापेक्षा पुढे असलेले महाराष्ट्रात औद्योगिक प्रगती सर्वदूर सारखी झालेली नाही. मुंबई, ठाणे, पुणे या भागात ७० टक्के कारखाने व ६२ टक्के रोजगार उपलब्धआहे.

**महाराष्ट्रातील कारखाने व रोजगार निर्मीती :**

राज्यातील उद्योगाच्या संरचनेत झपाट्याने बदल होत गेल्यामुळे रोजगाराचे विविध उद्योगातील

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

प्रमाणही बदलत गेले आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात खाजगी क्षेत्रातील मोठ्या उद्योगांचा मोठा वाटा आहे. मोठ्या उद्योगातील भांडवल राज्यातील एकूण उद्योगातील भांडवलाच्या ५७ टक्के असून एकूण उत्पादनाच्या ४८ टक्के उत्पादन होते तर एकूण रोजगाराच्या ४२ टक्के रोजगार या मोठ्या उद्योगापासून निर्माण होतो.

**महाराष्ट्रातील चालू कारखान्यांची संख्या व त्यातील रोजगार (२००४-२००५)**

| अ.क्र. | वर्ष | कारखान्यांची संख्या | रोजगार (हजारात) |
|---|---|---|---|
| 1 | 1961 | 8233 | 788 |
| 2 | 1971 | 10241 | 998 |
| 3 | 1981 | 16594 | 1192 |
| 4 | 1991 | 21119 | 1169 |
| 5 | 2001 | 28324 | 1201 |
| 6 | 2005 | 30385 | 1258 |

स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००६-०७

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, १९६१ मध्ये महाराष्ट्रात फक्त ८२३३ चालू कारखाने होते आणि या कारखान्यातून ७,८८,००० लोकांना रोजगार मिळत होता. यापैकी ३,२१,००० कामगार एकट्या सुती कापड उद्योगात काम करीत होते. एकूण रोजगारापैकी हे प्रमाण जवळपास ४१ टक्के होते. २००५ सालचा विचार केल्यास उद्योगांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. या वर्षी कारखान्यांची संख्या ३०३८५ एवढी होती आणि या कारखान्यातून जवळपास १२,५८,००० इतक्या लोकांना रोजगार मिळत होता.

**निष्कर्ष :**

१. औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र देशातील अग्रक्रमांकावर असून प्रमुख औद्योगिक राज्य म्हणून महाराष्ट्राने सातत्याने आपले स्थान राखले आहे.

२. भारताच्या उद्योगाचा पाया मुंबईत १८५४ मध्ये स्थापन झालेल्या पहिल्या कापड गिरणीने घातला गेला. त्यानंतरच्या शतकात मुंबईत कापड गिरण्यांची संख्या एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढली की, भारताचे मँचेस्टर मुंबईने गौरव प्राप्त केले.

३. १९६० च्या दशकात महाराष्ट्राच्या औद्योगिक उत्पादनात उपभोग्य वस्तु क्षेत्राचे वर्चस्व होते. प्रामुख्याने उपभोग्य वस्तू उत्पादनाचा वाटा जवळपास ५२ टक्के इतका होता.

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

४. परंतु मागील दोन दशकांचा विचार केल्यास भांडवली वस्तू उद्योग व पुनर्निर्माण वस्तु यांचे वर्चस्व वाढताना दिसून येते तर उपभोग्य अथवा ग्राहक वस्तू उद्योगाचे वर्चस्व कमी होताना दिसून येते.

५. १९९१ च्या सुमारास यंत्रे, अवजारे, सुटे भाग, रसायने, रंग, पेट्रोलियम उत्पादने, परिवहन यंत्रे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, रबर, संगणक या भांडवली वस्तूंचे उत्पादन वाढले.

६. एकविसाव्या शतकात उपभोग्य वस्तू, इलेक्टॉनिक्स, कॉम्प्यूटर हार्डवेअर, सॉफ्टवेअर, निर्यात वस्तू, पर्यटन, सेवा क्षेत्र, माहिती व तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान यांना महत्त्व आलेले आहे.

७. सन १९६१ मध्ये महाराष्ट्रात कारखान्यांची संख्या ८२३३ तर या कारखान्यातून ७८८००० लोकांना रोजगार मिळत होता.

८. सन २००५ मध्ये कारखान्यांची संख्या ३०३८५ एवढी होती तर या कारखान्यातून जवळपास १२,५८,००० लोकांना रोजगार मिळत होता.

९. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात खाजगी क्षेत्रातील मोठ्या उद्योगांचा वाटा जास्त आहे. मोठ्या उद्योगातील भांडवल राज्यातील एकूण उद्योगातील भांडवलाच्या ५७ टक्के असून एकूण उत्पादनाच्या ४८ टक्के उत्पादन होत तर एकूण रोजगाराच्या ४२ टक्के रोजगार या मोठ्या उद्योगातून निर्माण होतो.

## संदर्भ सूची :-

१. डॉ.जी.एन. झामरे, भारतीय अर्थशास्त्र, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर २०१०

२. प्रा.रा.ना.भालेराव, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक्स, पब्लिशर्स, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, जून १९९३

३. प्रा.डॉ.बी.डी.इंगळे, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, अरूणा प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर २००९

४. प्रा.डॉ.दत्तात्रय भूतेकर, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१६

५. डॉ.मंगला जंगले, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

IMPACT FACTOR 3.80

ISSN 2231- 6671

*International Registered & Recognized*

*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue : XIV, Vol. - X**
**Year - VII, (Half Yearly)**
**Aug. 2017 To Jan. 2018**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 - 241913**
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

CHIEF EDITOR

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (**Mob. 09423346913**)

EXECUTIVE EDITORS

**Dr. Sunanda Rodge**
Principal
Govt. B.Ed. College,
Nanded, Dist. Nanded (M.S)

**Scott. A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Bhujang R. Bobade**
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,

**Dr. Dileep S. Arjune**
Professor & Head, Dept. of Economics
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna(M.S.)

**Dr. U. Takataka Mine**
Tokiyo (Japan)

**Dr. Babasaheb M. Gore**
Dean- Faculty of Education & M.C.
Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

**Dr. Nilam Chhanghani**
Dept. of Economics,
KNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

DEPUTY-EDITOR

**Dr. G . V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Bharat S. Handibag**
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

CO-EDITORS

**Dr. R.N. Salve**
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

**Ghansham S. Baviskar**
Dept. of English,
RNC & NSC College,
Nasik, Dist. Nasik.(M.S.)

**Dr. Kailash Tombare**
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

**Dr. Kailash R. Nagulkar**
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
Barshi Takli, Dist. Akola.(M.S.)

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh College

Issue : XIV, Vol. X
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.80
ISSN 2231- 6671
Aug. 2017 To Jan. 2018

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | R. C. Dutt Thoughton Famines: Nature, Causes, Effects & Policy<br>**Dr. Ankush L. More** | 1 |
| 2 | Women and Space: A Study of Africa as Depicted by African Women Writers<br>**Puja Sarmah** | 10 |
| 3 | पत्रकारिता : जिम्मेदारी एवं चुनौतियाँ<br>**डॉ. आलीया मेराज सय्यद** | 15 |
| 4 | इसीस आणि भारताची राष्ट्रीय सुरक्षा<br>**डॉ. सुभान तुळशीराम जाधव** | 18 |
| 5 | दादाभाई नौरोजींचे आर्थिक विचार<br>**डॉ. आर. डी. जाधव** | 26 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही<br>**डॉ. महेश प्रल्हादराव गोमासे** | 31 |
| 7 | आदिवासी जमातीच्या लोकगीतातील स्त्रीचे सामाजिक व सांस्कृतिक दर्शन<br>**डॉ. शिवानंद मच्छिंद्र गिरी** | 36 |
| 8 | भ्रष्टाचार मुक्तिच्या दृष्टिकोनातून संत तुकारामाच्या अभंगाची उपयुक्तता<br>**रामचंद्र ना. पस्तापुरे** | 43 |
| 9 | 'यज्ञकुंड' मधील सामाजिक जाणीव<br>**डॉ. उन्मेश शेकडे** | 46 |
| 10 | ई-प्रशासनाच्या साहाय्याने सार्वजनिक तक्रारीचे निवारण<br>**डॉ. के.जी. राठोड** | 50 |
| 11 | जम्मू-काश्मीर : एक विवादित प्रश्न<br>**डॉ. के.जी. कुंभारकर** | 55 |



PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513



5

# दादाभाई नौरोजींचे आर्थिक विचार

**डॉ.आर.डी.जाधव**
अर्थशास्त्र विभाग,
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर, जि. लातूर

## Research Paper - Economics

**प्रस्तावना :-**

भारताचे पितामह असा दादाभाई नौरोजींचा उल्लेख अत्यंत आदराने केला जातो. दादाभाईंनी, राजकारण, समाजकारण, व्यापार व अर्थशास्त्र अशा अनेक क्षेत्रात आपल्या कामगिरीचा ठसा उमटवून ठेवला आहे. त्यांनी अर्थशास्त्रात केलेल्या कामगिरीमुळे श्री.दिनशा वांच्छा यांनी म्हटले आहे की, "श्री दादाभाई नौरोजी हे भारतीय अर्थशास्त्राचे जनक आहेत." दादाभाई नौरोजींनी भारतीय राजकारणात सक्रिय सहभाग घेऊन इंग्लिश लोकांच्या बुध्दीला आव्हान केले. आपल्या लिखाणातून, भाषणातून त्यांनी भारतीय प्रश्न ब्रिटीश सरकारपुढे मांडले. ब्रिटीश संसदेमध्ये प्रवेश करणारे पहिले भारतीय ठरले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे काही काळ अध्यक्ष म्हणूनही कार्य केले.

दादाभाई नौरोजी यांनी "Poverty and Un-British Rule in India" हा जगप्रसिध्द ग्रंथ लिहीला. त्या ग्रंथामध्ये त्यांनी आर्थिक, राजकीय विचार मांडले आहेत. भारताला आर्थिक बाबतीमध्ये नियमित अन्याय सहन करावा लागला तो बंद झाला पाहिजे, असे प्रतिपादन केले.

**अभ्यासाचे उद्देश (Objective of the Study) :-**

१. दादाभाई नौरोजींचे आर्थिक विचार अभ्यासणे.

२. दादाभाई नौरोजींचा गळतीचा सिध्दांत अभ्यासणे.

३. दादाभाई नौरोजींचे दारिद्र्य विषयक विचार अभ्यासणे.

४. दादाभाई नौरोजींचे राष्ट्रीय उत्पन्न विषयक विचार अभ्यासणे.

**संशोधन पध्दती (Research Methodology):-**

प्रस्तुत शोध निबंधाकरिता शासनाचे विविध आर्थिक सर्वेक्षण अहवाल, विविध लेख, विविध

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College, Chakur 413513



संदर्भग्रंथ इत्यादि सारख्या द्वितीयक सामुग्रीचा (Secondary Data) व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करून संबंधित शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

**दादाभाई नौरोजींचे आर्थिक विचार :-**

**१. गळतीचा सिध्दांत (The Drain Theroy) :-**

दादाभाई नौरोजी यांनी "Poverty and Un-British Rule in India" या आपल्या ग्रंथामध्ये गळतीचा सिध्दांत मांडला आहे. या सिध्दांतातून ब्रिटीशांनी भारतीय अर्थव्यवस्थेचे शोषण कसे केले हे जगासमोर मांडले आहे. ब्रिटीशांनी भारतातील संपत्ती विविध मार्गांनी इंग्लंडकडे वाहून नेऊन भारतीय अर्थव्यवस्थेला कशी गळती लावली याचे चित्रण केले आहे. ब्रिटीशांनी भारतातील संपत्ती वाहून नेण्याचे धोरण राबविल्याने भारताचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण झाले असून ब्रिटीशांनी भारताला दरिद्री बनवून टाकले असे प्रभावी प्रतिपादन दादाभाईंनी या सिध्दांतात केले आहे.

कोणत्याही देशात परकीय राजवट असली की ती परकीय राजवट तेथील संपत्ती आपल्या देशात घेऊन जाते व भारतातही ब्रिटीशांची परकीय राजवट होती. त्यामुळे त्यांनीही येथील संपत्ती आपल्या देशात नेली यात काही नवल नाही. परंतु ब्रिटीशांची येथील राजवट खर्चिक, उधळपट्टीची व जुलमी असल्याने भारतातून फार मोठ्या प्रमाणावर त्यांनी संपत्ती आपल्या देशात नेली, व भारताचे दारिद्र्य वाढत गेले. भारतातून ज्या वेगाने संपत्ती इंग्लंडकडे गेली त्या वेगाने एखाद्या समुद्रातील पाणी बाहेर जाऊ लागले व बाहेर गेलेले पाणी कधीही परत आले नाही तर तो समुद्र कोरडा होऊन जाईल असे दादाभाईंनी प्रतिपादन केले. भारतातून ब्रिटीशांनी सतत संपत्ती नेली पण ती कधीच परत आली नाही आणि त्यामुळे भारतही कोरडा झाला म्हणजेच दरिद्री झाला.

ब्रिटीशांनी विशिष्ट धोरणामुळे भारतातील संपत्ती इंग्लंडकडे कशी वाहून गेली त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे दादाभाईंनी केले आहे :

१. ब्रिटीशांच्या काळात भारतामध्ये जे असंख्य युरोपियन अधिकारी होते त्यांचा पगार भारताच्या उत्पन्नातून दिला जात होता. हे अधिकारी व नोकर त्यातील बराचसा पैसा आपले उत्पन्न म्हणून इंग्लंडकडे पाठवून देत असत. अशा प्रकारे पगार व भत्त्याच्या रूपाने काही संपत्ती भारतातून जात होती. त्यालाच नौरोजींनी गळती असे म्हटले आहे.

२. तसेच ब्रिटीशांनी येथील आपल्या राजवटीसाठी जे परकीय कर्ज उभारले होते त्याचे मुद्दल व व्याज हे भारतातून पाठवले जात असे. या मार्गानेही भारतातून संपत्ती बाहेर गेली.

३. इंडिया ऑफिसचा खर्च भारताच्या उत्पन्नातून करावा लागे. रेल्वे आणि बागायती उद्योग यामध्ये ब्रिटीशांनी खूप मोठी गुंतवणूक केली होती. त्यामधून होणारा प्रचंड नफा ते मायदेशी पाठवत.

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College



४. भारतावर राज्य करीत असताना ब्रिटीशांनी विस्तारवादी धोरण स्वीकारले. त्यामधून अनेक युध्द आणि लष्करी कारवाया भारतात आणि भारताबाहेर ब्रिटीशांना कराव्या लागल्या. त्यामुळे सरकारी खर्चात प्रचंड वाढ झाली. त्याचा भार भारतीय अर्थव्यवस्थेवर पडला.

५. ब्रिटीश सरकार सामान्यपणे शासकीय कारभारासाठी आवश्यक असणारा माल ब्रिटीश उत्पादकाकडून विकत घेत असे. परिणामतः बरीचशी संपत्ती भारताबाहेर जात असे.

६. विदेशी व्यापारात निर्यात अधिक्य असेल तर त्याचा वापर विशिष्ट देशाला विकासासाठी करता येतो. परंतु भारताची अवस्था तशी नव्हती. बरेच निर्यात अधिक्य व्यर्थ खर्ची पडे.

७. भारतातील चहाच्या मळ्यामध्ये ब्रिटीशांनी गुंतवणूक केली होती. या गुंतवणूकीमध्ये जो फायदा होत होता तो स्वतःचा समजून इंग्लंडकडे पाठवून दिला जात होता.

८. युरोपियन अधिकारी त्यांची बचत स्वदेशी पाठवत असत. तसेच निवृत्ती नंतर त्यांना पेन्शन द्यावे लागे.

९. इतर युरोपियन मंडळी भारतात व्यापार, उद्योग करून कमावलेली संपत्ती परदेशात पाठवित त्यामुळे भारतातील भांडवल संचयाला मर्यादा पडल्या.

१०. भारतात अफूचे उत्पादन होत असे. ब्रिटीश सरकारने अफू चीनला विकून अमाप पैसा मिळवत असत.

अशा विविध मार्गांनी भारतामधून संपत्ती वाहून जात राहिल्यामुळे भारतच्या दारिद्र्यात वाढ झाली.

**२. भारतातील दारिद्र्य :-**

दादाभाई नौरोजी यांच्या मते, भारतीय लोकांचे दारिद्र्य हीच देशापुढे प्रमुख समस्या आहे. भारतीयांचे दारिद्र्य हा ब्रिटीश राजवटीचा परिणाम आहे अशी त्यांची ठाम समजूत होती. दादाभाईंनी असे दाखवून दिले की, भारतीय लोकांचे दरडोई उत्पन्न फक्त २० रू. होते. याचा अर्थ भारतातील प्रत्येक माणसाला वर्षाला सरासरी फक्त २० रू. मिळत होते. त्या काळातील किमान निर्वाह खर्च ३४ रू. होता ही गोष्ट त्यांनी स्पष्ट केली. यावरून ब्रिटीशांच्या राजवटीत भारतीय लोक किती भयानक अशा दारिद्र्याच्या खाईत लोटले गेले हे लक्षात येते. भारताच्या गरीबीवर भाष्य करताना बरीच उपयुक्त आकडेवारी त्यांनी गोळा केली. भारतातील काही मूठभर श्रीमंत तर असंख्य दरिद्री लोक असे आर्थिक विषमतेचे दारूण चित्र दिसत होते. या संदर्भात दादाभाईनी म्हटले आहे की, भारतातील भयानक दारिद्र्य व आर्थिक विषमतेमुळे भारत एक नव्हता तर भारत दोन होते. एक श्रीमंतांचा भारत व दुसरा असंख्य गरीबांचा भारत. दादाभाई नौरोजींनी आकडेवारीचा उपयोग करून असे दाखवून दिले की, भारतात राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी होते, त्यामुळे लोकांचा राहणीमानाचा दर्जा घसरत होता. भारताच्या आयात-निर्यातीत घट होत होती, वारंवार दुष्काळ पडत होते व

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh College Chakur 413513



भारतीयांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त होते. या सर्व बाबी म्हणजे भारताचे वाढत असलेले भयानक दारिद्र्य स्पष्टपणे दाखवून देणारे होते.

**राष्ट्रीय उत्पन्न :-**

भारतामध्ये कमालीची गरीबी आहे हे विधान अधिक प्रभावी करण्याकरिता त्यांनी राष्ट्रीय उत्पन्न या संकल्पनेचा अधिक सखोल विचार केला. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याचा पहिला प्रयत्न त्यांनी केला. ते मोजताना समस्त राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्नाचा विचार केला. त्या काळात राष्ट्रीय उत्पन्न शास्त्रशुध्द पध्दतीने मोजण्यासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविणे अवघड होते. तसेच आजच्या अर्थशास्त्रज्ञाला उपलब्ध असणारी विविध साधने त्यांना उपलब्ध नव्हती. या सर्व मर्यादा स्वीकारून दादाभाईंनी राष्ट्रीय उत्पन्न त्यांना योग्य वाटणाज्या पध्दतीने मोजण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय उत्पन्न मोजताना त्यांनी अप्रत्यक्ष स्वरूपाची पध्दत स्वीकारली. सकल जमीन महसूली उत्पन्न २१ दसलक्ष पौंड आहे असे गृहित धरले. जमीन महसूल शेती उत्पन्नाच्या १/८ असते असे गृहित धरून शेती उत्पादनाचे मूल्य १६८ दसलक्ष पौंड होईल असे अनुमान काढले. त्यामध्ये उद्योग, अबकारी कर, दलालीपोटी १०० दसलक्ष पौंड तसेच मीठ, अफू आणि जंगल कर यापोटी ३२ दसलक्ष पौंड यांची भर पडेल आणि शेवटी एकूण बेरीज ३०० दसलक्ष पौंड होईल असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

**निष्कर्ष (Conclusion):-**

१. दादाभाई नौरोजी यांनी "Poverty and Un-British Rule in India" हा जगप्रसिध्द ग्रंथ लिहीला. त्या ग्रंथात त्यांनी सविस्तर असे आर्थिक विचार मांडले.

२. गळतीच्या सिध्दांतातून दादाभाई नौरोजी यांनी ब्रिटीशांनी भारतीय अर्थव्यवस्थेचे शोषण कसे केले हे जगासमोर मांडले आहे.

३. ब्रिटीशांनी भारतातील संपत्ती विविध मार्गांनी इंग्लंडकडे वाहून नेऊन भारतीय अर्थव्यवस्थेला कशी गळती लावली आहे याचे चित्रण दादाभाई नौरोजी यांनी केले आहे.

४. भारतीयांचे दारिद्र्य हा ब्रिटीश राजवटीचा परिणाम आहे असा ठाम विचार दादाभाईंनी मांडला तसेच भारतीय लोकांचे दारिद्र्य हीच देशापुढे प्रमुख समस्या होय हा विचार त्यांनी मांडला.

५. दादाभाई नौरोजींच्या मते ब्रिटीश राजवट आणि त्यांच्या राज्यकारभाराची पध्दत भारताच्या गरीबीला मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे.

६. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याचा पहिला प्रयत्न दादाभाई नौरोजी यांनी केला.

७. दादाभाई नौरोजी यांनी राष्ट्रीय उत्पन्न या संकल्पनेद्वारे भारतातील जनतेचे कमालीचे दारिद्र्य जगासमोर मांडले.

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513



८. भारताच्या गरीबीवर भाष्य करताना बरीच उपयुक्त आकडेवारी त्यांनी मांडली.

९. हिन्दुस्थानातील लोकांचे उत्पन्न वार्षिक २० रू. एवढे होते. तर त्या काळातील किमान निर्वाह खर्च दरडोई ३४ रू. होता ही गोष्ट त्यांनी स्पष्ट केली.

## संदर्भ सूची :-

१. के.एच.ठक्कर, अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास

२. विद्याधर पटवर्धन, आर्थिक विचारांचा इतिहास, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, जून १९९२

३. प्रा.डॉ.बी.डी.इंगळे, आर्थिक विचारांचा इतिहास, अरूणा प्रकाशन, फेब्रुवारी २०११

४. प्रा.पी.आर.कुमानाचे, अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जून १९९९

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

IMPACT FACTOR
3.92

ISSN 2231- 6671

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# Hi-TECH
# RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue : XV, Vol. - III**
**Year - VIII, (Half Yearly)**
**Feb. 2018 To July 2018**

CHIEF EDITOR

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (Mob. 09423346913)

EXECUTIVE EDITORS

**Dr. Milind V. Lokhande**
Dept. of Zoology,
Indira Gandhi (Sr.) College,
Nanded, Dist. Nanded (M.S)

**Scott. A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Bhujang R. Bobade**
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,

**Dr. Dileep S. Arjune**
Professor & Head, Dept. of Economics
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna(M.S.)

**Dr. U. Takataka Mine**
Tokiyo (Japan)

**Dr. Babasaheb M. Gore**
Dean- Faculty of Education & M.C.
Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

**Dr. Nilam Chhanghani**
Dept. of Economics,
KNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

DEPUTY-EDITOR

**Dr. G . V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Bharat S. Handibag**
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

CO-EDITORS

**Dr. R.N. Salve**
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

**Ghansham S. Baviskar**
Dept. of English,
RNC & NSC College,
Nasik, Dist. Nasik.(M.S.)

**Dr. Kailash Tombare**
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

**Dr. Kailash R. Nagulkar**
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
Barshi Takli, Dist. Akola.(M.S.)

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 - 241913**
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur
413513

Issue : XV, Vol. III
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.92
ISSN 2231- 6671
Feb. 2018 To July 2018

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Rural Indebtedness and Farmers suicide : issues & concern Suggestions<br>**Dr. Ramesh Sali** | 1 |
| 2 | Aspects of Women Development in India: A Current Perspective<br>**Dr. M. Y. Nasre** | 8 |
| 3 | भारतीय बँकींग क्षेत्रातील सुधारणांचा अभ्यास<br>**डॉ. आर. डी. जाधव** | 18 |
| 4 | ग्रामीण वसाहतीची उत्क्रांती<br>**डॉ. जे. के. वाघमारे** | 22 |
| 5 | सिंधु संस्कृतीतील मातृदेवता निर्ऋती : एक ऐतिहासिक अभ्यास<br>**रामचंद्र गुर्लिंग घुले** | 31 |
| 6 | समाज आणि शिक्षण : एक चिंतन<br>**एच. ए. उराडे** | 41 |
| 7 | डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या ललित लेखनाचे योगदान<br>**डॉ. उन्मेष शेकडे** | 48 |
| 8 | मराठी व्याकरणातील नवीन दृष्टिकोण<br>**सुभाष कदम** | 52 |
| 9 | महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक न्यायाचे विचार<br>**डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे** | 60 |



PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur
413513

Issue - XV, Vol. III
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.92
ISSN 2231- 6671
Feb. 2018 To July 2018


3

# भारतीय बँकींग क्षेत्रातील सुधारणांचा अभ्यास

**डॉ. आर. डी. जाधव**
अर्थशास्त्र विभाग,
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर, जि. लातूर

## Research Paper - Economics

**प्रस्तावना :**

भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचे धोरण स्विकारल्यामुळे खाजगी क्षेत्राबरोबरच सार्वजनिक व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास होणे आवश्यक होते. याच उद्देशाची पूर्तता करण्यासाठी भारतीय बँकेच्या राष्ट्रीयकरणाचा निर्णय घेण्यात आला. भारतीय बँकिंग व्यवसायाचा मुख्य उद्देश हा नफा कमविणे हाच होता. स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही १९६८ पर्यंत व्यापारी बँकांनी व्यापार व औद्योगिक क्षेत्राशिवाय इतर क्षेत्रांना कर्जपुरवठा केलेला नव्हता. भारतातील शेती, लघुउद्योग, ग्रामीण उद्योग, सेवा क्षेत्र, दुर्बल घटके आणि मागासलेला प्रदेश इत्यादींना आर्थिक मदत व्हावी म्हणून १९६९ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी व्यापारी बँकाच्या राष्ट्रीयकरणाचा अत्यंत कणखर व धाडसी निर्णय घेऊन १९ जुलै १९६९ रोजी देशातील मोठ्या १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण केले. त्यानंतर पुन्हा ३१ मार्च १९८० रोजी देशातील ६ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. बँकांच्या राष्ट्रीयकरणामुळे व्यापारी व उद्योग क्षेत्राबरोबरच इतरही क्षेत्रांना प्राधान्याने कर्जपुरवठा करण्यात आला. बँकांना ग्रामीण भागात शाखा विस्ताराकरिता प्रोत्साहित करण्यात आले. त्यामुळे बँकांची संस्थात्मक वाढ झाली पण गुणात्मक विकास मात्र होऊ शकला नाही. बऱ्याच लहान-मोठ्या बँकांची कार्यक्षमता कमी झाली. अनेक बँका तोट्यात जाऊ लागल्या तर अनेक बँकांमधील संपत्तीच्या प्रमाणात वाढ झाली. बँकींग व्यवस्थेत अनेक दोष निर्माण झाले. बँकांची कार्यक्षमता आणि लाभक्षमता कमी होऊन राष्ट्रीयकृत बँका सुध्दा तोट्यात आल्यात. तसेच ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513



घसरला. बँकींग क्षेत्रातील असलेले अनेक दोष दूर करून बँकांचा विकास घडवून आणण्यातही बँकिंग क्षेत्रात सुधारणा करण्याची गरज भासु लागली व त्यातूनच बँकींग क्षेत्रात विविध सुधारणा अलिकडच्या काळात करण्यात आल्या आहेत.

**अभ्यासाचे उद्देश :** (Objectives of Study)

१. बँकींग क्षेत्रातील सुधारणांचा अभ्यास करणे.

२. व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयकरणांचा अभ्यास करणे.

३. व्यापारी बँकांच्या परवाना धोरणांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :** (Research Methodology)

प्रस्तुत शोधनिबंधा करिता शासनाचे विविध सर्वेक्षण, अहवाल, विविध लेख, संदर्भग्रंथ, इत्यादि सारख्या द्वितीयक सामुग्रीचा (Secondary Data) व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करून संबंधित शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

भारत सरकारने जून १९९१ मध्ये नवे आर्थिक धोरण जाहिर केल्यानंतर बँकांच्या सध्याच्या कार्यप्रणालीत असणारे दोष दूर करून भारतीय बँकिंग प्रणालीची पुनर्रचना करण्याची आवश्यकता निर्माण झाली यासाठी भारतातील वित्तीय व्यवस्थेची रचना, संघटना, कार्य आणि कार्यप्रणाली यांचा अभ्यास करून त्यांची पुनर्रचना करण्याच्या दृष्टीने शिफारशी करण्यासाठी भारत सरकारने १४ ऑगस्ट १९९१ रोजी रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर श्री.एम.नरसिंहम यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व या समितीने भारतातील बँकिंग व्यवस्थेचा अभ्यास करून आपल्या शिफारशी सादर केल्या.

नरसिंहम समितीने भारतातील बँकिंग व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी केलेल्या शिफारशी अत्यंत महत्वाच्या समजल्या जातात. नरसिंहम समितीने केलेल्या शिफारशी सरकारने स्विकारल्या.

**भारतातील बँकिंग क्षेत्रातील अलीकडील सुधारणा :**

भारत सरकारने नरसिंहम समितीच्या काही महत्वपूर्ण शिफारशी स्वीकारल्यामुळे व त्यापैकी बहुतांश शिफारशी बँकींग क्षेत्राला लागू केल्यामुळे भारतीय बँकिंग क्षेत्रात पुढीलप्रमाणे सुधारणा घडून आलेल्या आहेत.

**१. राखीव निधीचे प्रमाण :** (Cash Reserve Ratio : CRR)

व्यापारी बँकांना रिझर्व बँकेच्या निदेशानुसार आपल्याकडे जमा झालेल्या ठेवीपैकी विशिष्ट प्रमाणात रक्कम रिझर्व बँकेकडे ठेवावी लागले. यालाच रोख राखीव निधीचे गुणोत्तर (CRR) म्हणतात. नरसिंहम समितीच्या शिफारशीनुसार हे गुणोत्तर कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. नरसिंहम समितीच्या शिफारशीआधी म्हणजे १९८९ मध्ये १५ टक्क्यांवर असलेले हे गुणोत्तर हळूहळू कमी होऊन ते २०१३ मध्ये ४ टक्के करण्यात आले. रोख राखीव निधी गुणोत्तरात घट केल्यामुळे

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413512



आता पूर्वीपेक्षा जास्त रोख निधी बँकेकडे शिल्लक राहिल्यामुळे त्यांच्याकडून होणाऱ्या कर्जपुरवठ्यात वाढ करण्यात आली आहे.

**२. वैधानिक रोखतेचे प्रमाण :** (Statutory Liquidity Ratio : SLR )

व्यापारी बँकांना आपल्याकडील ठेविपैकी ठराविक प्रतिशत रक्कम स्वत:कडे बाळगावी लागते. या रक्कमेचा उपयोग ठेविदारांनी आपल्या ठेवींची मागणी करताक्षणीच त्यांना ठेविची रक्कम परत करण्यासाठी केला जातो. या प्रतिशत प्रमाणालाच वैधानिक रोखतेचे प्रमाण असे म्हणतात. नरसिंहम कमिटीने SLR मध्ये कपात करण्याच्या शिफारशीनुसार हे गुणोत्तर टप्प्याटप्याने कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. १९९३-९४ मध्ये हे गुणोत्तर ३८.५ टक्के होते. तर २०१२ मध्ये २३ टक्केपर्यंत कमी केले.

**३. बँकदरात घट :**

रिझर्व बँक, व्यापारी बँका प्रतिभूती ज्या दराने वटविते त्याला बँकदर (Bank Rate) असे म्हणतात. व्यापारी बँकांना दिलेल्या कर्जावर रिझर्व्ह बँक ज्या दराने व्याज आकारते त्याला बँकरेट असे म्हणतात. ऑक्टोबर १९९१ बँकरेट १२ टक्के होता. त्यानंतर मात्र या बँकरेट मध्ये हळूहळू कपात करण्यात आली. २०१३ मध्ये तो ८.२५ टक्के करण्यात आला. बँकदर कमी केल्यामुळे व्यापारी बँकांना रिझर्व्ह बँकेकडून स्वस्त दरात कर्जे मिळतात त्यामुळे बँका सुध्दा आपल्या ग्राहकांना स्वस्त दराने कर्जे देतात. त्यामुळे पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात कर्जे दिली जातात व त्यामुळे बँकांचा नफा वाढतो.

**४. व्याजदराबाबत सुधारणा :**

रिझर्व्ह बँकेकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या व्याजाच्या पध्दती बंद करण्यात येऊन बाजारातील मागणी-पुरवठ्यानुसार व्याजदर असावेत या नरसिंहम कमिटीच्या शिफारशीनुसार रिझर्व्ह बँकेने मुदत ठेवीच्या संदर्भातील व्याजदराचे विनियंत्रण केले, व्याजदरावरील बंधने काढून टाकली आणि बँकदर हा संदर्भ ठेवण्यात आला. याला अनुसरून कर्जावरचे व ठेविवरचे व्याजदर बँकांना ठरविण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.

**५. अलाभदायी मालमत्ता :** (Non Profitable Assets)

बँकींग क्षेत्रातील सुधारणांमध्ये अलाभदायी मालमत्तेची गणना ही सर्वात महत्वाची सुधारण समजली जाते. बँकांनी दिलेल्या कर्जरूपी मालमत्तेवरील व्याज सहा महिन्यांपेक्षा जास्त काळासाठी थकीत झाल्यास त्याला अलाभदायी मालमत्ता (Non-Profitable Assets) असे समजले जाते, यासाठी रिझर्व्ह बँकेने एकूण मालमत्तेशी अलाभदायी मालमत्तेचे प्रमाण १० टक्क्यांच्या आत ठेवावे, असे देशातील बँकांना निर्देश दिलेले होते. परंतु १९९८ मध्ये सुधारणा करण्यात येऊन बँकांना आपली अलाभदायी मालमत्ता २००० पर्यंत ५ टक्केपेक्षा कमी करावी असे सुचविण्यात आले.

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur

Bhai Kishanrao Deshmukh College Chakur 413513



**६. परवाना शिथिलीकरण :**

नवीन व्यापारी बँका व त्यांच्या परवान्याबाबत परवाना धोरण शिथिल करण्यात आले आहे. त्यामुळे देशातील खासगी क्षेत्रात काही नवीन बँका स्थापन झाल्यात तर स्टेट बँक ऑफ इंडिया, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील बँकांनी आपला शाखाविस्तार करून ग्राहकाजवळ जाऊन त्यांना बँकींग सेवा उपलब्ध करून देण्यास सुरूवात केली आहे. अनेक बँकांनी ग्रामीण आणि अर्ध-शहरी भागात आपल्या शाखा स्थापन करून ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासास हातभार लावला आहे.

**निष्कर्ष :** (Conclusion)

१. १९६९ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयकरणाचा अत्यंत कणखर व धाडसी निर्णय घेऊन १९ जुलै १९६९ रोजी देशातील मोठ्या १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण केले.

२. ३१ मार्च १९८० रोजी देशातील ६ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले.

३. १९९१ मध्ये नवे आर्थिक धोरण जाहिर केल्यानंतर बँकांच्या सध्याच्या कार्यप्रणालीत असणारे दोष दूर करून भारतीय बँकींग प्रणालीची पुनर्रचना करण्याची गरज वाटू लागली व त्यातूनच बँकींग क्षेत्रात सुधारणा करण्यात येऊ लागल्या.

४. १९९१ मध्ये बँकींग क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी एम.नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्या समितीने भारतीय बँकींग व्यवस्थेचा अभ्यास करून आपल्या शिफारशी सादर केल्या.

५. नरसिंहम समितीने बँकींग क्षेत्रात सुधारणा सुचविल्या ज्यामध्ये रोख राखीव, निधीचे प्रमाण, वैधानिक रोखतेचे प्रमाण, बँकदर, व्याजदर सुधारणा, अलाभदायी मालमत्ता आण्ाि परवाना शिथिलीकरण इत्यादी.

## संदर्भ सूची :-

१. डॉ.श्री.आ.देशपांडे, भारतीय नियोजन आणि आर्थिक विकास, विद्या प्रकाशन नागपूर, तृतीय आवृत्ती १९९५

२. प्रा.एस.एम.कोलते, भारतीय बँकिंग प्रणाली, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव, प्रथमावृत्ती, जानेवारी २०१४

३. जी.एन.झामरे, भारतीय अर्थशास्त्र, पिंपळापूरे अँण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर २०१०

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

26
2018

ISSN 2231-6671

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

(UGC Approved Peer Reviewed Research Journal)

Year - VIII, Issue - XV, Vol.- III
Impact Factor 3.92 (GRIFI)
Feb. 2018 To July 2018

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh College

EDITOR IN CHIEF
DR. BALAJI KAMBLE

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

Issue : XV, Vol. III
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.92
ISSN 2231- 6671
Feb. 2018 To July 2018

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Rural Indebtedness and Farmers suicide : issues & concern Suggestions **Dr. Ramesh Sali** | 1 |
| 2 | Aspects of Women Development in India: A Current Perspective **Dr. M. Y. Nasre** | 8 |
| 3 | भारतीय बँकींग क्षेत्रातील सुधारणांचा अभ्यास **डॉ. आर. डी. जाधव** | 18 |
| 4 | ग्रामीण वसाहतीची उत्क्रांती **डॉ. जे. के. वाघमारे** | 22 |
| 5 | सिंधु संस्कृतीतील मातृदेवता निर्मिती : एक ऐतिहासिक अभ्यास **रामचंद्र गर्लिंग घुले** | 31 |
| 6 | समाज आणि शिक्षण : एक चिंतन **एच. ए. उराडे** | 41 |
| 7 | डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या ललित लेखनाचे योगदान **डॉ. उन्मेष शेकडे** | 48 |
| 8 | मराठी व्याकरणातील नवीन दृष्टिकोण **सुभाष कदम** | 52 |
| 9 | महात्मा बसवेश्वरांचे सामाजिक न्यायाचे विचार **डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे** | 60 |



PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh College, Chakur.

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

Issue - XV, Vol. III
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 3.92
ISSN 2231- 6671
Feb. 2018 To July 2018

1

# Rural Indebtedness and Farmers suicide : issues & concern Suggestions

Dr. Ramesh Sali
Head, Dept. of Economics,
B. K. D. College.
Chakur, Dist. Latur

Research Paper - Economics

## SUGGESTIONS :

**Revitalize rural financial market :**

The credit market needs immediate attention; the formal credit structure should be revitalized.

**Working Capital :**

This can be for consumption purposes also. It can be operationalized through Kissan Credit Card.

**Investment Capital :**

Care should be taken not to divert loans given for this purpose. There should be strict supervision by formal institutions to prevent such possibilities. Otherwise, repayment will become difficult.

**Credit Cap :**

Our observations on cost of Cotton cultivation in a hectare of land is approximately in the range of 15000-Rs.20000. Credit available for agricultural purposes from formal sourses for a hectare of land is much lower than this. There is a need to revise this credit cap to around Rs.25000 or more.

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

**Information bureau :**

There is a demand for credit, but the supply side of rural financial market is not responding due to some constraints. Enabling the formation of an information bureau will help formal institution to judge credit worthiness of an individual. When moneylenders operate in a village, they take the help of a prominent persons of the village to gather information on credit worthiness of an individual and at times also use their influence to recover loans. In return, they pay him a commission.

**Micro credit :**

Formal institutions have by now started entering into rural credit market through SHGs and other micro credit enterprises. They should be encouraged to intervene and have a greater presence among farmers.

**Regulate private moneylenders :**

The Non Governmental Organizations (NGOs) are already involved in facilitating self-Help groups (SHGs). The NGOs and local SHGs should be encouraged to act as pressure groups to regulate private moneylenders.

**Insurance schemes :**

The farmer's problem is rooted in his exposure to risk - yield as well as price shocks. Insurance schemes may be devised to mitigate these. This can be done in three possible ways. Credit insurance can look into the credit default. A fund with contribution from the creditor, the debtor and the Government may be created for this. Appropriate mechanisms to look into its modus operandi should be devised. Crop insurance will be linked with risk. Implementation of this should be village and if possible plot of land specific. Theft of crop and loss due to fire or other calamities should be taken into consideration while administering this. The earlier mentioned information bureau could also help in this endavour. Income insurance will address the poor returns, particularly for marginal and small farmers and also tenats. The poor returns could be because of poor prices, low yields or high transaction costs arising out of low quantity of produce.

**Risk mitigation fund :**

A risk mitigation fund can be generated to finance the three different insurance schemes - crop, credit and income - or any other appropriate risk mitigation scheme.

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh College, Chakur

This fund will have contribution from the Government and can also be drawn from the Rural Infrastructure Development Fund (RIDF).

**Water management :**

In the selected districts where agriculture is largely rainfall dependent, strategies to increase irrigation potential (particularly, through watershed development), should be devised so as to provide scope to increase value addition. The Maharashtra Employment Guarantee Scheme (MEGS), the National Watershed Development Project for Rainfed Areas (NWDPRA) and the RIDF can be used for this. Expedite the completion of already initiated irrigation projects. For completed projects take measures that ensures utilization is up to potential, and there is better utilization of water through drip/sprinkler.

**Land management :**

Excessive use of fertilizer and pesticides and mono-cropping can affect the fertility of land. Appropriate land management techniques should be devised. This should complement the efforts in improving water management. The MEGS and RIDF can be used for this.

**Diversification of cropping pattern :**

The important cash crops of this region are Cotton and Soyabean. To reduce the vulnerability, the farmer should have more options and be able to go beyond these crops. Policies that can make diversification of cropping pattern feasible should be put into place. Inter cropping, fitting two crops, crop rotation and horticulture should be encouraged. Better water and land management will also help in attaining this objective.

**Revive agricultural extension :**

In cotton, there is the emergence of new varieties of seeds that makes conventional methods of cultivation redundant. The experience gained over the years is of no use There is deskilling. The farmer has to upgrade his technical know-how. He should also be abreast with the latest developments in water and land management. An appropriate mechanism to revive agricultural extension is urgently required. Local NGOs can also be involved in facilitating agricultural extension.

**Input quality :**

Inputs in the form of seeds, pesticides and fertilizers sold to farmers could be of

PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

spurious quality. There is no regulatory mechanism. We came across situations where farmers were advised by traders to go in for a third sowing - a case of supplier-induced-demand. The private traders should be regulated. Local non-governmental organizations (NGOs) can be involved in regulating the private trader.

**Encourage organic farming :**

It will be beneficial on two counts - to reduce costs associated with pesticides and fertilizers and reduce the availability of pesticides for committing suicide. We have also observed its successful practice in two cases during our survey. Replication of such experiments should be encouraged. for instance, shifting from inorganic to organic farming will give low returns in the initial two to three years. This acts as a deterrent for marginal and small farmers. Compensating them during initial years would help. This can be done through MEGS. It would be similar to payment of wages to the landowner under horticulture scheme of MEGS. The help provided should also be in terms of technical know-how (agricultural extension), certification & quality control and marketing. The Vidarbha Organic Famers Association and other similar organization may be involved in this endeavour.

**Integrated pest management :**

Another alternative is to encourage a judicious mix of organic and inorganic farming. This will also require help in terms of agricultural extension, quality control and marketing.

**Increase import tariff :**

The farmer is exposed to price fluctuations, particularly in cotton, because of global price movements. In the current scenario low domestic price is largely due to huge subsidy by the United States of America (USA), a major exporter and low import tariff in India. The Government of India may be requested (1) to raise the issue of high subsides in the USA at appropriate forums and (2) to increase the import tariff in Cotton to 30-35 percent from the current 5 percent.

**Price stabilization :**

The Monopoly Cotton Procurement Scheme of Maharashtra has failed in mitigating price fluctuations. Some of the reasons are because of inappropriate functioning

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur

Bhai Kishanrao Deshmukh Senior College
Chakur
413513



of the scheme like payment of additional advance price without looking into market conditions, rent-seeking by office bearers during grading/weighing involvement of middlemen who take a commission from farmers, delay and staggered nature of payment to farmers and the payment to farmers being linked with loan repayment among others. These failures should be looked into and an appropriate mechanism to control price fluctuation may be considered. It will also help in risk mitigation.

**Marketing of produce :**

Good marketing network can reduce transaction costs. It will also provide non-farm employment opportunities with agricultural linkages.

**Non-farm employment :**

A large proportion of rural population being dependent on agriculture (cultivators and agricultural laborers) indicates that there are not many avenues of diversifying sources of income. Agro-based industries and other non-farm opportunities should be increased. With the current cropping pattern, the agro-based industries can be cotton or oilseeds based. It can be related to organic farming like manufacture of composts, bio-fertilizers and bio-pesticides among others.

**Reduce access to pesticides :**

Reduce the easy access and availability of insecticides/pesticides. From those available, toxicity should be reduced to non-lethal levels. The containers of these toxic chemicals should have prominent warning signs as also instructions for proper handling, storage and usage in Marathi. Wherever possible add emetics or stanching agents to make insecticide/pesticide repulsive while consuming. Consider providing formulations that cannot be readily absorbed in human body. The providers/suppliers of insecticides/ pesticides should be part of this exercise and held accountable for their lapses. As mentioned earlier, encourage other forms of pest control. Encourage bio-pesticides and phase out chemical pesticides within a time frame. Some of the above-mentioned practices have helped reduce organophosphorous poisoning deaths in Sri Lanka.

**Public Health :**

The average distance to reach a health facility which can handle poisoning cases is more than 20 kilometres in Washim and Yavatmal and there are instances where this is

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur.

about 100 kilometres away. The primary health centres (PHCs) should have trained staff and be equipped with necessary material to handle cases of poisoning. This will reduce travel time and save more lives. The personnel at the primary health centres should be trained to identify, intervene (improve their listening skills) and refer patients with suicidal tendency for personalized care. Educate the community to identify depression and alcoholism and initiate treatment. The native healers, practitioners of alternative medicine and faith healers can also be trained to identify such cases and refer them for more specialized care.

**Volunteer crisis centres :**

Organizations operating in urban areas like The Samaritans may be encouraged and provided with support to open their centres in these regions. The volunteers working in these centres should be adequately trained to identify psychological illness and be allowed to refer cases for more personalized care. There should be a process of certification and regulation of these centres to ensure quality and adequacy of care provided by them. Networks of various crisis centres should be encouraged so that they can learn and support each other's work.

**Helplines :**

Introduce helplies and disseminate the numbers in the villages so that individuals in distress can turn to someone. To begin with, the helplines of organizations operating in urban areas like Nagpur and Mumbai can be disseminated.

**Community groups :**

Develop a protocol for starting survivor support groups. Form community/farmers groups in rural areas. These groups can discuss farm related and other socio-economic problems.

**Socio-religious activities :**

The help of socio-religious organization like The Art of Living or Vipassana may be sought to mitigate the general state of despair among people.

**Responsible reporting :**

Guidelines by the World Health Organisation (WHO) on suicide reporting should be disseminated among the media fraternity to promote responsible reporting of suicides.

Bhai Kishanrao Deshmukh College Chakur 413513
PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

Government-Media-Academia can come together to improvise on the guidelines to suit to the local condition. Enable the media personnel to form a regulatory and self-monitoring system. Sensationalizing, graphical depiction, providing too many personal details and depicting the act to be a method of resolving personal crisis should be avoided.

**Administration :**

दलित अल्पसंख्याक असून त्यांच्यावर सवर्ण व्यक्ती शारीरिक लैंगिक अन्याय अत्याचार करतात या अन्याय अत्याचाराला दलितांनी विरोध केला तर दलितांना हाणमार करून वेळ प्रसंगी त्यांची हत्या अथवा शारीरिक अपंग केले जाते. त्याच बरोबर त्यांच्या घराला आग लावली जाते. त्यांची गावातून दिंड काढली जाते. त्यामुळे दलित व्यक्ती नेहमीच असुरक्षिततेच्या भावनेतून जीवन जगत असलेल्या दिसून येतात.

**९) व्यावसायिक निर्बंध :-**

आधुनिक काळात ही दलितांनी गाव स्वच्छता करावी, नाल्या, स्वच्छ कराव्यात, मृत प्राण्याची विल्हेवाट लावावी. अशा स्वरुपाची बंधने घातलेली दिसून येतात. या पारंपारिक व्यावसायातून त्यांना आर्थिक उत्पादन होत नाही आणि नविन व्यावसाय करण्याकरीता पैसे नाहीत. यामुळे ते दारिद्रयात जीवन जगत आहेत.

**१०) राजकीय प्रश्न :-**

भारतीय राज्य घटनेने दलितांना राजकीय सहभाग मिळावा या दृष्टीने राजकीय आरक्षण दिले आहे. राजकीय आरक्षणामुळे दलित व्यक्ती ग्रामपंचायती पासून ते आमदार, खासदार मंत्री पदापर्यंत राजकिय पदावर विरामान होत आहेत. परंतू राजकिय पदावर कार्य करताना आणि निर्णय घेताना त्यांना सवर्ण जातीच्या नेत्याच्या मर्जीनुसार निर्णय घ्यावे लागतात. त्यामुळे त्यांना राजकीय पद आहे. परंतू पदावर निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नाही. म्हणून दलित व्यक्ती राजकारणात नामधारी दिसून येतात.

**दलितांच्या समस्यावर उपाय :-**

१) दलितांच्या समस्या सोडवण्याकरीता दलित नेत्याने एकत्रित येवून विचार विनीमय करावा. विचार विनीमयातून दलितांच्या सबलीकरणाकरीता कोणत्या योजना राबवता येतील त्यांचे नियोजन करावे.

२) दलितांची जात, प्रवर्ग निहाय जनगना करून दलितांना कोणत्या सुविधा पुरवल्या जातील त्या किती प्रमाणात दिल्यानंतर दलितांचा दर्जा उंचावेल याची शासनाने आखणी करावी.

३) दलितांना शिक्षणाकरीता दिली जाणारी आर्थिक मदत वाढवावी. त्याच बरोबर दलितांच्या मुलांना राहाण्याकरीता वस्तीगृह व जेवणाची व्यवस्था करावी. त्यांना शैक्षणिक फिस माफ करावी. त्यामुळे दलितांना शिक्षण घेणे सोपे जाईल

४) दलितांना आरोग्य सुविधा, व्यावसाय प्रशिक्षण, दिले पाहिजे.

५) दलितांना उद्योग, व्यवसाय, करण्याकरीता शासनामार्फत कमी दरात कर्ज पुरवठा केला पाहिजे. त्यांना बँकेमार्फत सहजा सहजी कर्ज मिळाले पाहिजे.

**संशोधनाचे महत्व :-**

सदरील संशोधनाच्या माध्यमातून दलितांचे प्रश्न समाजापुढे मांडण्यात आले. त्या प्रश्नांवर कोणत्या उपाय योजना करता येतील. या संबंधी सखोल विवेचन केले. त्यामुळे दलित अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते यांना दलित समस्यांची प्रखड जाणिव होवून ते दलितांच्या विकासाकरीता कार्य करतील.

**सारांश :-**

दलित समाज मागासलेला असल्यामुळे त्यांना विकास परिवर्तनाच्या वेगा बरोबर सामील होता येत नाही. त्याच्या समोर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या समस्यांचे निर्मुलन झाले पाहिजे. तेव्हाच खऱ्या अर्थाने समाज विकास घडून येईल.

## संदर्भ सूची :-

१) डॉ. मनोहर यशवंत-डॉ. बाबासाहेब आणि स्त्री मुक्तीचे युध्द युग-साक्षी प्रकाशन, नागपूर. प्रथमावृत्ती २००६

२) डॉ. भालचंद्र फडके-दलित साहित्य वेदना आणि विद्रोह-श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९७७

३) प्रा. वामन इंगळे-दलित मुक्ति लढा आणि दलित साहित्य-कालचक्र प्रकाशन, औरंगाबाद. १९७९

४) डॉ. दा.धो. काचोळे-भारतीय सामाजिक समस्या-कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद-२०१०

Deshmukh Senior College Bhai Kishanrao Chakur 413513
PRINCIPAL
Bhai kishanrao Deshmukh
College, Chakur.

We request you to all the Education Department employees to submit our Youtube Educational Channel in the name of Vidyawarta. Through this channel, we are trying to provide information about educational Activity, teaching methods video, new rules about education sector. So you subscribe to this quality video channel and share it with other colleagues.

https://goo.gl/dk5tXx

SHARE

LIKE

COMMENT

SUBSCRIBE

You Tube Channel

*Edit By*

Dr. Gholap Bapu Ganpat

Parli Vaijnath, Dist.Beed 431 515

(Maharashtra, India)

Cell : +91 75 88 05 76 95

*Publisher & Owner*

Archana Rajendra Ghodke

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126

(Maharashtra) Mob.09850203295

E-mail: vidyawarta@gmail.com

www.vidyawarta.com

Cosmos IMPACT FACTOR 5.234

Indexed

IMPACT FACTOR 5.131 iijif

₹ 400/-

ISSN-2319 9318

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

International Multilingual Refereed Research Journal

Issue-27, Vol-01 April to June-2018

Editor: Dr.Bapu G.Gholap

# Index

Kishanrao Deshmukh Senior ... Chakur 413513


01) A STUDY ON ENVIRONMENTAL ACCOUNTING PRACTICES IN INDIA
Raichura Dhara Ashokbhai, Saurashtra University ||10

02) "Perfect Leadership at countryside"
Dr. N. H. AWADE, Dist. Nanded (Maharashtra) ||14

03) HUMAN – ENVIRONMENT RELATIONSHIP: A SOCIO-ENVIRONMENTAL ANALYSIS
Mr. Shibasish Nath Bhowmik, Mahatma Gandhi University ||20

04) Importance of Yoga in Daily life
Mr. Santosh Vasantrao Jadhav, Dist-Sangli, Shivaji University Kolhapur ||24

05) A STUDY OF CASTE SYSTEM IN MEDIEVAL INDIA
Dr. Umesh Mallick, Darbhanga, Bihar ||26

06) GENDER INEQUALITY IN HIGHER EDUCATION
DR. MAMTA KUMARI, BOKARO, JHARKHAND ||31

07) ANTI-CORRUPTION MOVEMENT THROUGH THE LOKPAL BILL: ROLE OF MEDIA
Chakramani Gupta & Dr. Rajaram Mishra, Arun Nagar ||40

08) Social Justice and Concept of in-equality in Society : Indian Perspective
Dr. T. B. Singh, Kanpur ||44

09) Women Empowerment, key to Better Life for All: A Case Study with Entre...
Dr. Shashwati Nath, Changsari Kamrup, Assam ||48

10) A Study of Social Maturity, Emotional and Social Adjustment of Students
Prof. Dr. Bharat Himmatrao Pande, Dist. Gadchiroli (M.S.) ||53

11) A ANALYTICAL STUDY OF ICDS IS A SCHEME FOR WOMEN AND CHILD DEVEL...
Pravina Preeti, Muzaffarpur ||57

12) AN ANALYSIS OF JOB SATISFACTION OF EMPLOYEES (A STUDY ON BHEL PUBLIC...
Dr. Hitesh Kumar Pant, Mrs. Anita Tiwari & Dr. Pratibha Pant, Bhimtal ||62







13) A STUDY OF CORRELATES DEPRESSION AMONG COLLEGE GOING STUDENTS
Prof. Dr. Punam Kumari & Vikas kumar verma, patna ||74

14) The Contai Massin the Swadeshi Movement (1905—1911)
Dr. Sankar Kumar Das, Bankura University ||78

15) "Buddha Dhamma, in the view of Dr. Babasaheb Ambekar"
Dr. T. G. Gedam, Dist.- Nagpur ||87

16) IMPACT OF DEMONETIZATION ON BANKING SECTOR
Prof. Suresh N. Gawai, Buldana ||91

17) Reimagining Sexuality and Desire in Angela Carter's Re-written Fairy ...
Anjum Tahir, Jammu and Kashmir ||95

18) Mathematical Modeling of Game Theory, Nash Equilibrium and some asp...
Dr. Nirbhay Kumar Sinha, New Delhi ||100

19) AWARENESS ABOUT GST AMONG FUTURE TEACHER
Prof. Santosh Arora & Anit Kumar Srivastava, Bareilly (U.P.) ||105

20) विपणन धोरणाचे व्युहरचनात्मक व्यवस्थापन
डॉ. अनिल श्री. खांडेकर, अमरावती ||110

21) स्त्रियांच्या विकासात समाज सुधारकांची भूमिका
प्रा. डॉ. देशमुख पी. एस., जि. लातूर ||113

22) महाराष्ट्रातील उर्दू माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षणाविषयाचा अभ्यास
सय्यद समियोद्दीन & डॉ. सय्यद शफियोद्दीन, बीड ||116

23) मानव संसाधन विकास : सैद्धांतिक विवेचन
फुलारी ज्योती, औरंगाबाद ||118

24) मानवी विकास निर्देशांक
प्रा. शोभा विष्णुपंत खंदारे, टेंभुर्णी ||121

25) वनीकरण एक अभ्यास- नांदेड जिल्हा
प्रा. स्वाती विकासराव कुरमे, जि. नांदेड ||123




http://www.printingarea.blogspot.com/03 www.vidyawarta.com/03

धोरण प्रक्रियेतील पहिला टप्पा होय. या अवस्थेत उपक्रमामध्ये यंत्रे, सामुग्री, भांडवल तसेच मनुष्यबळ व इतर उपयुक्त संसाधनाची स्थिती विभिन्न दृष्टीकोनातुन कशी आहे. इत्यादीबाबत माहिती गोळा करून उपलब्ध माहितीचे विश्लेषण करण्यात येते. विपणन धोरणावर परिणाम करणारा अंतगत बाबीचा विचार करून बाह्य पर्यावरणीय बाबीचा सखोल विचार करावा लागतो. बाह्य पर्यावरणात विपणीत वस्तुसाठी असलेली मागणी, स्पर्धकांची साधने व आर्थिक व सामाजिक स्थान या बाबींचा समग्रपणे विचार करणे हितावह असते.

**२) विक्रीचे पुर्वनुमान -**

अंतर्गत व बाह्य वातावरणाचे विश्लेषण केल्यानंतर त्या आधारावर विक्रीचे पुर्वानुमान केले जाते. विक्रीबद्दल असलेल्या अनुमान करण्यासाठी उपलब्ध योग्य पध्दतीचा विक्री पुर्वानुमानासाठी उपयोग केला जातो. अत्याधुनिक काळात विक्रीचे पुर्वानुमान करण्यासाठी एकाच पध्दतीवर अवलंबुन राहणे योग्य समजले जात नाही तर एकापेक्षा जास्त पध्दतीचा उपयोग करून त्याच्या आधारावर संभाव्य विक्रीची सरासरी ठरवितात.

**३) स्वॉट विश्लेषणाचा विचार -**

विपणन धोरण निश्चितीची ही अवस्था अतिशय महत्वाची, अशी अवस्था आहे. या अवस्थेमध्ये विपणन व्युहरचनाकर्ते उपक्रमाचा सारासार विचार करून व्यवसायाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने उपक्रमासमोर कोणत्या संधी उपलब्ध आहेत व कोणत्या संधी भविष्यात उपलब्ध होवु शकतात उपक्रमाच्या विस्ताराच्या दृष्टीने संधी बरोबर संभाव्य धोक्यांचाही गांभीर्याने विचार करण्यात येतो तसेच विपणन व्युहरचनात्मक कर्त्यांनी संधी आणि धोक्याबरोबर उपक्रमाची अंतर्गत शक्ती किंवा सामर्थ याचा सखोलपणे विचार करणे आवश्यक ठरते.

**४) उद्दीष्टे व इष्टांकांचे निर्धारण-**

स्वॉट विश्लेषणाचे योग्य प्रकारे विश्लेषण केल्यानंतर उपक्रमाची उद्दीष्टे व इष्टांक निर्धारीत करणे ही विपणन धोरण प्रक्रियेतील पुढची पायरी होय नफा मिळविणे मुलभुत प्रक्रिया असुन जास्तीचा नफा कमविणे उद्दीष्ट मानता येणार नाही. उपक्रमाची उद्दीष्टे उच्चस्तरीय व्यवस्थापना कडून ठरविले जातात. त्यानंतर विपणन धोरण निर्धारीत करण्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या व्यवस्थापनेव्दारे ही उद्दीष्टे विचारात घेऊन इष्टांक ठरविण्यात येतात. ठरविलेले इष्टांक व वास्तविकता यात ताळमेळ घालणे आवश्यक असते. त्यामुळे विपणन इष्टांक ठरवितांना ते साध्य करता आले पाहीजे. उद्दीष्टे व इष्टांक निर्धारण करीत असतांना ते वास्तवतेला धरून असले पाहीजे.

**५) अंदाजपत्रक तयार करणे -**

विपणन कार्यक्रमाचा आराखडा तयार केल्यानंतर या आराखडा मध्ये समाविष्ट केलेली कार्य करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चा बद्दल विचार करून नंतर त्यासाठी करण्यात येणारा खर्चाच्या रक्कमेची तरतुद करावी लागते या करिता अंदाजपत्रक तयार केलेल जाते. उत्पादन अंदाजपत्रक, विक्री अंदाजपत्रक, रोख अंदाजपत्रक हे जास्त महत्वाचे ठरते. अंदाजपत्रके हे पुढील सर्व व्यवहारांचा आधार असतो.

**विपणन व्युहरचना योजनेची आवश्यकता -**

१) बदलत्या वातावरणात व्यवसायाला अपेक्षीत यश मिळणे.

२) दीर्घकालीन धोरण आखणे

३) उत्पादन क्षमता व कर्मचारांची क्षमता वाढविणे

४) व्यवसायात होणारे बदल बिनविरोध स्विकारणे व होणारा विरोध करणे

५) व्यवसायाच्या धेव-धोरणाबाबत स्थितीची सहाय्यकांना जाणीव करून देणे.

**विपणन व्युहरचनात्मक व्यवस्थापनाचे फायदे :-**

**१) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर -**

व्युहरचनात्मक नियोजनात्मक निरनिराळ्या प्रकारची विश्लेषण केली जातात पर्यावरणीय मुल्यमापन करतांना तंत्रज्ञानात होणारे बदल विचारात घेतले जातात. मुल्यमापन करणे एक महत्वाचा टप्पा आहे. तंत्रज्ञान विकासात वेगाने होणारा वृध्दीमुळे व्यवस्थापकाला आधुनिक तंत्रज्ञान विचारात घेणे आवश्यक असते.

**२) व्यवस्थापनांचा समावेश -**

व्युहरचनात्मक नियोजन हे वरच्या स्तरांवरील व्यवस्थापनामध्ये केले जाते आणि ते कनिष्ठ व्यवस्थापकांकडे अंमलबजावणीसाठी पाठवून दिले जाऊ शकते. कनिष्ठ व्यवस्थापक हे नियोजनाच्या प्रक्रियेत समाविष्ठ नसतात. नियोजनाच्या अंमलबजावणी मध्ये व्यावहारिक येवु शकतात म्हणून व्यवस्थापनात व्यवस्थापकांचा समावेश करण्यात येतो.

**३) प्रगत तंत्रज्ञानाचा वापर -**

व्युहरचनात्मक नियोजनामध्ये निरनिराळ्या प्रकारची विश्लेषण केली जातात. पर्यावरणीय मुल्यमापन करतांना तंत्रज्ञानात होणारे बदल विचारात घेतले जातात. तंत्रज्ञान





विकासात वेगाने होणारा वृध्दीमुळे व्यवस्थापकाला आधुनिक प्रगत तंत्रज्ञान विचारात घेणे आवश्यक असते.

**४) संसाधनाचा परिपुर्ण उपयोग -**

अंतर्गत अंकेक्षण हा व्युहरचनात्मक नियोजन प्रक्रियेतील एक महत्वाचा टप्पा असतो. अंतर्गत अंकेक्षणात संस्थेचा पैसा, मनुष्यबळ, मुलभुत सुविधा इ. अंतर्गत संससाधनाच्या मुल्यांकनाचा समावेश होतो. नियोजनामुळे या उपलब्ध संसाधनाचा आणि सुविधांचा परिपुर्ण उपयोग केला जातो.

**सारांश-**

व्यवसायाचा विस्तार होवुन उत्पादनात वाढ करण्याचा कार्यक्रम राबविण्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या साधनांची जुळवाजुळव करून ठेवल्या जाते. उत्पादित वस्तु बाजारपेठेत तत्परतेने पोहचविल्या मुळे ग्राहकाचे समाधान होते. वाढत्या स्पर्धेमध्ये उपक्रमाचे अस्तित्व टिकवून राहते व वाढत्या उत्पादनामुळे विक्रीची समस्या राहत नसुन नवीन बाजारपेठेचा शोध घेवून वर्चस्व प्रस्थापित केल्या जाते. भविष्याच्या दृष्टीकोनातुन उत्पादनाचे अंदाजपत्रक, विक्री अंदाजपत्रक व रोख अंदाजपत्रक व बाजारपेठेतील विपणन विषयक प्रश्न अचुक पध्दतीने सोडविल्या जाते.

**संदर्भ**


१) व्युहरचना व्यवस्थापन सिध्दांत आणि प्रक्रिया- प्रा.एस.एम.कोलते प्रशांत पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती २०१५

२) व्यावहारिक व्युहरचना व्यवस्थापन डॉ. जावरकर, डॉ.सांगळे, डॉ. डुमरे, डॉ.गायकवाड, ससेक्स पब्लिकेशन, जुन २०१३

३) औद्योगिक आणि सेवा विपणन साईनाथ प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती २००४ डॉ. सुधीर बोधनकर, डॉ.मेघा कानेटकर

४) गतिशिल विपणन साईनाथ प्रकाशन, नागपुर प्रथम आवृत्ती २००२ डॉ. सुधीर बोधनकर, प्रा.विवेक अलोनी

५) सेवा विपणन व ग्राहक संबंध व्यवस्थापन साईनाथ प्रकाशन, नागपुर प्रथम आवृत्ती २०१२ डॉ. प्रकाशन राजनकर, डॉ. अशोक पिपळापुरे


❑❑❑

21

# स्त्रियांच्या विकासात समाज सुधारकांची भूमिका


**प्रा. डॉ. देशमुख पी. एस.**
भाई किसनराव देशमुख महाविद्यालय,
ता. चाकूर जि. लातूर


**प्रस्तावना :-**

आधुनिक काळात भारतीय स्त्रिया व्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेत असलेल्या दिसून येतात. त्या उच्च शिक्षण घेवून नोकरी, व्यावसाय, उद्योग, सामाजिक कार्य, राजकारण इत्यादी क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत आहेत. त्या स्वतःच्या कर्तत्वाने समाजात आपला स्वतंत्र ठसा निर्माण करीत आहेत. नोकरी, व्यावसाय, उद्योग करणाऱ्या स्त्रिया, आर्थिक दृष्टीने स्वावलंबी असलेल्या दिसून येतात. त्या कूटूंबात मुला-मुलीचे शिक्षण, विवाह, आर्थिक नियोजन, भौतिक वस्तूची खरेदी, स्थावर मालमत्तेची खरेदी, विक्री या संबंधी स्वतः निर्णय घेत असलेल्या दिसून येतात. त्याच बरोबर त्या सामाजिक राजकीय कार्यामध्ये सहभाग घेत आहेत. यावरून त्यांचा कौटूंबिक, सामाजिक, आर्थिक दर्जा उंचावलेला दिसून येतो.

आधुनिक काळात स्त्रियांना व्यक्ती स्वातंत्र्य मिळून त्यांचा कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय दर्जा उंचावलेला दिसून येत असला तरी स्त्रियांचे जीवन आणि दर्जा संबंधी ऐतिहासिक आढावा घेतला असता. उत्तर वैदिक कालखंडापासून स्वातंत्र्य पूर्व काळा पर्यंत स्त्रियांचे जीवन पुरुषांच्या अधिन असलेले दिसून येते. पुरुषांनी स्त्रियांवर वैवाहिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय बंधने घलेली होती. त्यामुळे स्त्रियांचे जीवन बंदिस्त होवून त्या परावलंबी जीवन जगत होत्या. त्यांचा कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक दर्जा अस्पृश्य व गुलामांच्या बरोबरीचा बनला होता. अशा परावलंबी आणि दुःखमय जीवन जगणाऱ्या स्त्रियांना व्यक्ती स्वातंत्र्य देवून त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्या मध्ये भारतीय समाज सुधारकांची भूमिका व कार्य महत्वाचे

Principal Bhai Kishanrao Deshmukh College, Chakur

दिसून येते.

**अध्ययनाची उद्दिष्टये :-**

१) स्त्रीवादी समाज सुधारकांच्या कार्याचा आढावा घेणे.

२) स्त्रियांच्या दर्जाचा अभ्यास करणे.

स्त्रियांच्या विकासा करीता समाज सुधारकांचे कार्ये :-

**१) राजा राममोहन रॉय :-**

भारतीय स्त्री दास्यविमोचनाची सुरुवात राजा राममोहन रॉय यांनी केली. त्यांनी समाजात प्रचलित असलेल्या बालविवाह, बहुपत्नी विवाह, कुमारी जरठ विवाह, विधवा पुनर्विवाह बंदी या अनिष्ठ प्रथांना विरोध केला. त्यांनी या अनिष्ठ प्रथांना धर्मशास्त्राचा आधार नाही हे स्पष्ट केले. त्यांनी संमती विवाह, विधवा पुनर्विवाह आणि स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. प्राचीन काळापासून समाजात प्रचलित असलेली मानवतेला काळीमा फासणाऱ्या सती प्रथेला विरोध केला. सती प्रथेच्या दुष्परिनामा संबंधी समाजात जागृती करून लॉर्ड बेंटिक यांच्या मदतीने २९ डिसेंबर १८२९ रोजी सतीबंदीचा कायदा केला.

**२) स्वामी दयानंद सरस्वती :-**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी समाजातील बालविवाह, बहुपत्नी विवाह, पडदा पध्दती, कन्यावध, या प्रथांना विरोध केला त्यांनी स्त्री शिक्षण, स्त्री-पुरुष समानता, विधवा पुनर्विवाह आणि संमती विवाहाचा पुरस्कार केला. त्यांच्या मते मुला-मुलींना विवाहाचे स्वातंत्र्य असावे. मुला-मुलींनी विवाह करीता हुंडा देवू-घेवू नये. त्यांनी परस्परांची पात्रता, गुण व चारित्र्य याचा विचार करून स्वयंनिर्णय घ्यावा. त्यांच्या मते स्त्री शिक्षण आणि स्त्री स्वातंत्र्याला प्राधान्य दिल्या शिवाय. राष्ट्राचा आणि समाजाचा विकास होणं शक्य नाही. त्या करीता स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे.

**३) महात्मा फुले :-**

स्त्री शिक्षणाचा पुरस्कर्ता म. फुले यांनी बालविवाह, बहुपत्नी विवाह, कुमारी जरठ विवाह, बालहत्या, पडदा पध्दती आणि समाजातील अनिष्ठ रुढीप्रथा, परंपरा यांना विरोध करून स्त्री-पुरुष समानता, संमती विवाह, विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. म. फुले यांनी स्त्रियांच्या दुःखमय जीवनाचे प्रमुख कारण त्यांचे अज्ञान आहे. हे ओळखून त्यावर उपाय स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे हे निश्चित केले. त्यांनी मुलींच्या शिक्षणा करीता १८४८ साली पुणे येथे बुधवार पेठेत तात्यासाहेब भिंडे यांच्या वाडयात पहिली मुलींची शाळा सुरु केली. या शाळेत स्त्री शिक्षिका म्हणून पत्नी सावित्रीबाई ची नेमणुक केली. तर १८५१ साली चिपळूंकर यांच्या वाडयात मुलींची शाळा काढली. त्यांनतर १७ ऑक्टोंबर १८५१ साली रास्ता पेठ येथे मुलींची तिसरी शाळा काढली तर १८५२ मध्ये अस्पृश्याच्या मुला-मुली करीता वेताळ पेठ येथे चौथी शाळा सुरु केली. म. फुले यांनी एकूण १८ शाळा काढल्या.

म. फुले यांच्या मते स्त्रियांनी आपल्या मुला-मुली मध्ये भेदभाव करू नये. मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य घ्यावे. स्त्रियांनी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होण्याकरीता नोकरी, व्यावसाय, उद्योग करावा. माता-पित्याने आपल्या संपती मध्ये मुलींला वारसा हक्क दिला पाहिजे. स्त्रियांच्या व्यक्तिमत्व विकासा करीता कुटूंबातून त्यांना सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, सहभाग घेण्याचे स्वातंत्र्य व प्रोत्साहन दिले पाहिजे. स्त्रियांनी स्त्रियावरील अन्याय, अत्याचाराच्या विरुध्द संघटित होवून संघर्ष केला पाहिजे.

**४) सावित्रीबाई फुले :-**

भारतातील पहिली स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणा करीता समाजातील रुढी, प्रथा, परंपरांना विरोध करून, समाज कंठकांचा रोष पत्कारून शिक्षिकेची भूमिका पार पाडली. त्यांनी स्त्रियां वरील अनिष्ठ रुढी, प्रथा परंपरांना विरोध केला. विधवांच्या जीवनातील अंधार दूर करून त्यांना मानवाप्रमाणे जीवन जगता यावे. या करीता विधवा पुनर्विवाह चा आग्रह धरला. विधवांचे केशवपन, करण्यास विरोध केला. विधवा विषयी असणाऱ्या शुभ-अशुभ या मानवी विकृती विरोधी जन जागृती केली.

**५) महर्षी धोंडो केशव कर्वे :-**

कर्वे यांच्या मते सामाजिक प्रगतीकरण्या करीता स्त्री हा घटक महत्वपूर्ण आहे. त्या करीता स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे. स्त्रियांना शिक्षण दिले तर त्यांचे दुःख कमी होवून त्यांचा आर्थिक, सामाजिक दर्जा उंचावेल. स्त्री शिक्षण मिळाले तर कुटूंब शिक्षित होईल. या करीता त्यांनी ४ मार्च १९०७ रोजी हिंगणे येथे महिला विद्यालयाची स्थापना केली. तर ३ जून १९१६ रोजी एस.एन. डी.टी. (नाथीबाई दामोदर ठाकर्सी) या महिला विद्यापीठाची मुंबई येथे स्थापना केली. या विद्यापीठा अंतर्गत महिलांकरीता गृहशास्त्र, आरोग्यशास्त्र, परीचारिका, व्यावसायिक प्रशिक्षण हे





अभ्यासक्रम चालवण्यात आले.

महर्षी कर्वे यांनी विधवांना पुन्हा वैवाहिक जीवन जगता यावे. या करीता १८९३ साली विधवा विवाहत्तेजक मंडळाची स्थापना केली. त्यांनी पत्नीच्या मृत्युनंतर स्वतः विधवेशी विवाह करून समाजाला एक आदर्श घालून दिला. विधवांना आपल्या मुलांच्या संगोपनाची समस्या निर्माण होवू नये. या करीता त्यांनी १४ जून १८९६ रोजी पुण्यात अनाथ बालकाश्रम मंडळाची स्थापना केली. स्त्रियांनी सामाजिक कार्यात निरवार्थी पणाने सहभाग घ्यावा. त्यांनी स्त्रियांच्या उध्दारासाठी कार्य करावे. अशा समाज सुधारक स्त्रियांची निर्मिती करण्याकरीता ४ नोव्हेंबर १९०८ रोजी निष्काम कर्ममठ या संस्थेची स्थापना केली.

**६) गोपाळ गणेश आगरकर :-**

आगरकरांनी स्त्रीवादी दृष्टीकोनातून स्त्रियांच्या उध्दाराचा आग्रह धरला होता. त्यांनी बालविवाह, बहुपत्नी विवाह, विधवा केशवपन आणि धार्मिक अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरांना विरोध केला. त्यांनी बुध्दीवादी दृष्टीकोनातून स्त्रियांच्या विकासाकरीता स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह आणि प्रौढ विवाहाचा पुरस्कार केला. त्यांच्या मते स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्या शिवाय त्यांचा सामाजिक, कौटुंबिक दर्जा उंचावणार नाही. त्या करीता स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाले पाहिजे.

**७) न्यायमुर्ती रानडे :-**

रानडे यांनी विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले. विधवा पुनर्विवाह करीता १८६५ साली विधवा उत्तेजक मंडळ स्थापन केले. या मंडळामार्फत विधवा पुनर्विवाह घडवून आनले. त्यामुळे समाजातील समाजकंठक आणि परंपरावाद्यांनी रानडे यांच्यावर बहिष्कार टाकला. या समाज विरोधाला रानडे यांनी न जुमानता विधवा पुनर्विवाहाला धर्मग्रंथाचा आधार असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी बालविवाहाला विरोध करून प्रौढ विवाहाचा पुरस्कार केला. विवाह करीता मुला-मुलीचे वय १२ व १० वर्षे असावे हे निश्चित केले.

**८) लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख) :-**

स्त्री-पुरुष समानतेचे पुरस्कर्ते गोपाळ हरी देशमुख यांनी स्त्रियावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य केले. त्यांनी बालविवाह, बहुपत्नीविवाह, विधवा विवाह बंदी आणि स्त्रियांचे होणारे शारीरिक, मानसिक, लैंगिक शोषण यावर प्रभाकर या साप्तहिकातून प्रखड टिका केली. स्त्रियांना व्यक्ती स्वातंत्र्य, शैक्षणिक स्वातंत्र्य विधवांना पुर्नविवाह चे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. या करीता समाज जागृती केली.

**९) ताराबाई शिंदे :-**

स्त्री-पुरुष समानतावादी विचारात ताराबाई शिंदे यांचे नाव अग्रस्थानी आहे. त्यांनी १८८३ साली स्त्री-पुरुष तुलना हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडण्याकरीता आणि स्त्रियांना व्यक्ती स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी समाजातील अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरावर टिका केली. स्त्री-पुरुष समानतेचे महत्व मांडले. स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने सर्व अधिकार आहेत हे उदाहरणांनी सिध्द करून दिले. स्त्रियांना पुरुषा पेक्षा कमी लेखन्याचा समाजाला व पुरुषांना अधिकार काय? असा सवाल केला. स्त्रीयांचा अधःपात पुरुषच घडवून आणतात स्त्री आणि पुरुष यांच्या तुलनेत पुरुषच अनाचारी असतात असे विचार मांडले.

**१०) राजर्षी शाहु महाराज :-**

शाहु महाराजांनी स्त्रियावरील अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा यांना विरोध केला. स्त्रियांचे जीवन मागासलेले आहे. याची त्यांना जाणीव होती. स्त्रियांचा विकास करण्याकरीता प्रथम त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. या विचारातून प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. स्त्रियांना उच्च शिक्षण घेता यावे या करीता राजाराम महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत जाहीर केली. स्त्री शिक्षण सुरळीत चालावे या करीता रखुमाबाई केळकर यांची संस्थानकाची शिक्षणाधिकारी म्हणून नेमणूक केली.

**११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-**

आंबेडकरांनी स्त्रियांच्या विकासा करीता हिंदू कोड बील मांडून त्यामध्ये स्त्रियांना विवाहाचे स्वातंत्र्य असावे. बहुपत्नी विवाहाला बंदी घालून एक पत्नी विवाह पध्दती स्विकारण्यात यावी. स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार मिळावा आणि स्त्रियांचा आर्थिक दर्जा उंचावून त्या स्वावलंबी झाल्या पाहिजेत. या करीता माता-पित्याच्या संपत्तीत वारसा हक्क मिळाला पाहिजे. अशा तरतुदी केल्या. आंबेडकरांनी स्त्रिया व शुद्रांना शिक्षण मिळावे या करीता मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली.

**सारांश :-**

भारतीय स्त्रियांना व्यक्ती स्वातंत्र्य मिळावे त्यांना

शैक्षणिक वैवाहिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, अधिकार मिळावेत. त्यांचा सामाजिक दर्जा उंचवावा या करीता समाज सुधारकांचे कार्य महत्वपूर्ण ठरले. समाज सुधारकांच्या कार्याच्या प्रेरणेतून स्त्रियाशिक्षण घेवून स्वावलंबी जीवन जगत आहेत. त्यांचा शैक्षणिक वैवाहिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकिय दर्जा उंचावलेला दिसून येतो.

**संदर्भ सूची :-**


१) प्रा.डॉ. सतिश ठोंबर-महाराष्ट्रातील समाज सुधारक कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद प्रथमावृत्ती २०१०

२) डॉ. अनिल सिंगारे/डॉ.ओमशिवा लिगाडे - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, अरुणा प्रकाशन लातूर २०११

३) प्रा.डॉ. गाठाळ एस.एस. आधुनिक भारताचा इतिहास कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद २०१०

४) डॉ. देवरे - भारतीय समाज सुधारक चिन्मय प्रकाशन औरंगाबाद १९९८

५) प्रा. गाठाळ एस.एस. ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया व स्त्री जीवन कैलास-पब्लिकेशन्स औरंगाबाद २०१३


❑❑❑

22

# महाराष्ट्रातील उर्दू माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षणाविषयाचा अभ्यास


**सय्यद समियोद्दीन**
संशोधक,
डॉ. बा.आ.म.वि. औरंगाबाद

**डॉ. सय्यद शफियोद्दीन**
मार्गदर्शक

**डॉ. मो. अताउल्लाह जागीदार**
शारीरिक शिक्षण विभाग,
मिल्लीया कॉलेज, बीड


***********


**सारांश :-**

शारीरिक शिक्षणाच्या दृष्टीकोनानुसार शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान नसुन बालकाचा सर्वांगीण विकास होय शारीरिक शिक्षण हा शिक्षणाचा एक घटक आहे. शारीरिक शिक्षणाच्या शब्दाचे अर्थ शरीराद्वारे दिले जाणारे शिक्षण होयमहाराष्ट्रातील उर्दूमाध्यमिक शाळेत शारीरिक शिक्षण विषय शिकणे हे महत्त्वाचे आहे.


**शोधनिबंधाचे शिर्षक :** महाराष्ट्रातील उर्दू माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षणाविषयाचा अभ्यास.

**उद्दीष्टये :** महाराष्ट्रातील उर्दू माध्यमिक शाळेतशारीरिक शिक्षण हा विषय शिकवला जातो किंवा नाही ? अश्या प्रश्नाचे उत्तेव प्रश्नावली द्वारे माहिती गोळा करणे व निष्कर्ष काढणे.

**संदर्भ साहित्याचा आढावा :-**

**प्रबंधाचे अभ्यास**

**भगत** यांनी संशोधन हे अमरावती शहरातील विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या एकुण १२ महाविद्यालयातून प्रश्नावली व मुलाखतीच्या माध्यमातून माहिती संकलीत केलेली आहे. ह्या माहितीवरून असा निष्कर्ष काढले गेले की महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये पुरेशा प्रमाणात पुस्तके उपलब्ध आहे. परंतु क्रिडा विषयक व शारीरिक शिक्षणाचे पुस्तके कमी आहे.





**माने** यांनी संशोधन हे मराठवाडा विद्यापीठाच्या संलग्न अशा ग्रामीण व शहरी महाविद्यालयांमध्ये उपलब्ध अस्तित्वात असणाऱ्या क्रीडा सुविधांचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.४. महाविद्यालयातील माहिती प्रश्नावली असणारे मुद्दे व व्यक्ती भेटीच्या माध्यमातून माहिती गोळा केलेली आहे. गोळा केलेल्या माहितीवरून असे निष्कर्ष काढण्यात आले की, ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी विभागातील महाविद्यालयामध्ये चांगल्या स्वरूपाचे शारीरिक शिक्षणाचे सुविधा आहे.

**संशोधन अभ्यासाची पध्दती**

संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

संशोधनहेमहाराष्ट्रातील उर्दू माध्यमिक शाळेती २०० विद्यार्थ्या पुरतेच मर्यादीत आहे

**जनसंख्या व न्यादर्श :-**

महाराष्ट्रातील उर्दू माध्यमिक शाळा ही संशोधनाची जनसंख्या न्यादर्श आहे.

**संख्या शास्त्रीय साधने.**

**शेकडावारीपद्धत. व प्रश्नावली**

महाराष्ट्रातील उर्दु मार्ध्यमिक शाळेतीलसंकलीत माहिती व विश्लेषणाचे तक्ते व निष्कर्ष पुढील प्रमाणे आहे.

महाराष्ट्रातील उर्दु माध्यमिक शाळेतीलविद्यार्थ्यांच्या प्रश्नावली वरून.आपल्या शाळेत शारीरिक शिक्षण हा विषय शिकवला जातो का? होय/नाही.

**तक्ता क्र. १**

| विद्यार्थ्यांचे उत्तर | विद्यार्थ्यांचे संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १६० | ८०टक्के |
| नाही | ४० | २०टक्के |
| एकुण | २०० | १००टक्के |

तक्ता क्र. १ वरून संख्याशास्त्रीय विश्लेषण व निष्कर्ष उर्दू माध्यमिक शाळेतील ८० टक्के विद्यार्थ्यांनी होय असे उत्तर दिले

उर्दु माध्यमिक शाळेतील २० टक्के वद्यार्थ्यांना नही असे उत्तर दिले

तक्ता क्र. १वरून संख्याशास्त्रीय विश्लेषण व निष्कर्ष

उर्दु माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनाच्या माहितीवरून ८० टक्के शारीरिक शिक्षण विषय हा पूर्ण शिकवला जातो २० टक्के पूर्ण शिकवला जात नाही.

**निष्कर्ष**

उर्दु माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षण घेणाय८० टक्के विद्यार्थ्यांनच्या हो अश्या उत्तरावरून

उर्दु माध्यमिक शाळेत शारीरिक शिक्षण विषय८० टक्केशिकवलाजातो

उर्दु माध्यमिक शाळेतील शारीरिक शिक्षण घेणाय २० टक्के विद्यार्थ्यांनच्या नाही

अश्या उत्तरावरून उर्दु माध्यमिक शाळेत शारीरिक शिक्षण हा विषय २० टक्के शिकवला नाही.

**संदर्भ सूची**


१) भगत के. बी. (१९२७) अमरावती विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असणाऱ्या क्रीडा विषयक पुस्तकांचे सर्वेक्षण शारीरिक शिक्षण संशोधन प्रबंध अमरावती विद्यापीठ

२) माने एच.ए. (१९८७) मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न ग्रामीण व शहरी महाविद्यातील क्रिडा सुविधांचा तुलनात्मक अभ्यास संशोधन प्रबंध मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.


❑❑❑

PRINCIPAL
College, Chakur




College
1983

## CONTACT FOR SUBSCRIPTION

**Ajanta Prakashan**
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

An International
Multidisciplinary
Quarterly
Research Journal
ISSN 2277 - 5730

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
Journal No. 40776

# AJANTA




PRINCIPAL

AJANTA PRAKASHAN

# EDITORIAL BOARD

**Dr. Gajanan Gulhare**
Asst. Professor Sant Gadge Baba
Amravati University, Amravati, Amravati

**Dr. Madhukar Kisanrao Tajne**
Department of Psychology,
Deogiri College, Aurangabad.

**Prof. Dinesh R. Jaronde**
Head of Psychology Dept.
Indira Mahavidyalaya, Kalamnb, Yavatmal

**Prof. Sidhharth Bhagat**
Head of Marathi Dept. Art & Commerce
Mahavidyalaya, Ralegoan, Yavatmal.

**Prof. Pravin Walke**
Dept. Of History, Jagannath Maharaj Mahavidyalaya,
wani, Yavatmal

**Ku. Manjusha S. Walke**
Assistant Teacher, ZPUP School Narsapur,
Kalamb, Yawatmal



PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)




## CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय लोकशाही आणि निवडणूक सुधारणा<br>**डॉ. डोगरे एल. बी.** | १-४ |
| २ | चंद्रपूर जिल्ह्यातील माना जमातीची ऐतिहासीक पार्श्वभूमी<br>**प्रा. मनोहर आं. गुडधे** | ५-८ |
| ३ | महात्मा ज्योतीराव फुले : शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि सद्यस्थिती<br>**प्रा. डॉ. संजय मुंडकर** | ९-१३ |
| ४ | पर्यावरण प्रदुषण भारतासमोरील एक आव्हान<br>**प्रा. डॉ. मनिषकुमार काशिनाथ कायरकर** | १४-१९ |
| ५ | भारतासमोरील आव्हाने - भ्रष्टाचार<br>**डॉ. अशोक सोनकांबळे** | २०-२२ |
| ६ | विदर्भातील शेकऱ्यांच्या आत्महत्या<br>**प्रा. डॉ. जे. एम. काकडे** | २३-२९ |
| ७ | आर्थिक विषमतेचे भारतासमोरील आव्हान<br>**श्री मुरलीधर पंडीत गायकवाड** | ३०-३४ |
| ८ | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>**स. प्रा. एम. बी. रेवतकर** | ३५-३९ |
| ९ | आधुनिक भारतातील राजकीय विचारवंत आणि मानवतावाद<br>**प्रा. एस. आर. सामृतवार** | ४०-४२ |
| १० | भारतीय स्त्रियांचा दर्जा आणि महात्मा फुले यांचे स्त्रीवादी विचार<br>**डॉ. देशमुख प्रकर्ष सुभाषराव** | ४३-४९ |
| ११ | लैंगिक असमानता<br>**प्रा. सतिश गोवर्धन पेटकर** | ५०-५५ |
| १२ | पारंपारीक पिकांवरील अवलंबित्व<br>**श्री गिरीधर केशव कुनघाडकर** | ५६-५९ |
| १३ | अफगाणिस्तान मधील दहशतवाद आणि भारताची राष्ट्रीय सुरक्षा<br>**प्रा. प्रशांत सराफ**<br>**प्राचार्य डॉ. व्ही. वाय. जाधव** | ६०-६५ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# १०. भारतीय स्त्रियांचा दर्जा आणि महात्मा फुले यांचे स्त्रीवादी विचार

डॉ. देशमुख प्रकर्ष सुभाषराव
विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, भाई किसनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर.

**प्रस्तावना**

भारतीय समाजात स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांना व्यक्तिस्वातंत्र्य आणि शैक्षणिक वैवाहिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय अधिकार मिळाले आहेत. त्या शिक्षण घेऊन समाजाच्या विविध क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्य करीत आहेत. त्यांचा कौटुंबिक, सामाजिक आर्थिक दर्जा उंचावलेला दिसून येतो. अशा सर्वांगीन दिसून येणाऱ्या स्त्रियांच्या दर्जाचा ऐतिहासिक आढावा घेतला तर. स्त्रियांचे जीवन बंदिस्त होते. त्यांना शैक्षणिक वैवाहिक, सामाजिक, सांस्कृतिक अधिकार नाकारले होते. त्या परावलंबी जीवन जगत होत्या. समाजात स्त्री-पुरुषामध्ये विषमता निर्माण झाली होती. स्त्रियांचा सामाजिक दर्जा घसलेला होता. अशा बंदिस्त व परावलंबी जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या उध्दारा करीता विविध समाज सुधारकांचे कार्य आणि म. फुले यांचे स्त्रीवादी विचार यांचा आढावा घेणे महत्वाचे ठरते.

**उद्देश**

१. स्त्रियांचा ऐतिहासिक कालखंडानूसार दर्जा अभ्यासणे.
२. स्त्रिया विषयी विविध समाज सुधारकांच्या मताचा आढावा घेणे.
३. म. फुले यांच्या स्त्रीवादी दृष्टीकोनाचा सविस्तर अभ्यास करणे.

**ऐतिहासिक कालखंडानूसार स्त्रियांचा दर्जा**

**१. मातृसत्ताक कालखंड**

मातृसत्ताक कालखंड हा मानवी समाजाचा प्रारंभिक कालखंड होय. या कालखंडामध्ये समाजात स्त्रियांना मानाचे स्थान होते. स्त्रियांना वैवाहिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक स्वातंत्र्य होते. कुटूंबाची सर्व सत्ता स्त्रीकडे होती. वंश स्त्रीच्या नावाने चालत असे स्त्रियांचा दर्जा उंचावलेला होता.

**२. वैदिक कालखंड (इ.स.३००० ते १५००)**

याकालखंडात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार होते. मुलींना उपनयन होत असे. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार होता. स्त्रिया सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय कार्यात सहभाग घेत होत्या. स्त्रियांना विवाहाचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य होते. स्त्रियांना पुरुषा समान दर्जा होता.

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College, Chakur

**३. उत्तरवैदिक कालखंड (इ.स.१५०० ते ५००)**

या कालखंडात पुरुष सत्ताक पध्दती अस्तित्वात आली. स्त्रियांच्या व्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घालून त्यांना शिक्षण, विवाहा, सामाजिक सहभाग, आर्थिक अधिकार नाकारण्यात आला. स्त्रियांकरीता बालविवाह, बहुपत्नी विवाह, पडदा पध्दती, विधवा पुनर्विवाह बंदी या अनिष्ठ प्रथा अस्तित्वात आल्या. स्त्रियांचा दर्जा घसरुन त्या बंदिस्त जीवन जगू लागल्या.

**४. स्मृती कालखंड (इ.स. ६०० ते १००)**

स्मृती कालखंडात हा रामायण, महाभारत, स्मृती ग्रंथ या धार्मिक ग्रंथाचा मानला जातो. या कालखंडात मनूने सांगितलेल्या स्त्री विषयीक विचाराचा प्रभाव समाजावर होता. या कालखंडात बालविवाह, बहुपत्नी विवाह, कुमारी-जरठ विवाह या प्रथा अधिक तीव्र झाल्या. विधवा पुनर्विवाह बंदी करुन सती प्रथा रुढ झाली. सक्तिच्या वैधव्याचे पालन करणे सुरु झाले. स्त्रियांचे कार्यक्षेत्र चारभितीच्या आत बंदिस्त होऊन त्यांचे कार्य मुलांना जन्म देऊन पति सेवा करणे एवढेच मानले जावु लागले.

**५) मध्ययुगीन कालखंड :- (इ.स.१०००-१८१८)**

या कलखंडात बालविवाहाची प्रथा तीव्र झाली. त्यामुळे कुमारी जरठ विवाह घडून येऊ लागले. बालविवाहामुळे समाजात बालविधवांचे प्रमाण वाढत होते. विधवांना सौभाग्याचे अलंकार वापरण्यास बंदी केली. विधवांना विधवा धर्माचे कठोर पालन करावे लागत होते. विधवांना अपशकून मानले जाई. त्यामुळे विधवांचे जिवन अंधारमय बनले होते.

**६. सुलतान शाहीचा काळ :- (इ.स.१२००-१५००)**

या काळात मुस्लिम राजेशाही होती. त्यामुळे मुस्लिम राजे, सरदार, यांच्या पासून स्त्रियांचे संरक्षण व्हावे या करीता स्त्रीयांना पडदा पध्दती, बालविवाह प्रथा अधिक प्रखर पणे प्रचलित झाली. स्त्रियांचा सामाजिक, राजकीय सहभाग पूर्णपणे बंद झाला.

**८. मोगलशाही काळ (इ.स. १५०० ते १७००)**

या काळात महम्मद तुघलकाने स्त्रियांचा उध्दार करण्याचा प्रयत्न केला. स्त्रीने सती जाण्यापूर्वी सरकारी परवाना काढावा अशी अट घातली. अल्लाउद्दीन खिलजी याने वेशा व्यावसायावर बंदी घातली. बालविवाह, बहूपत्नी विवाह वर बंदी घातली. त्यामुळे काही प्रमाणात स्त्रीयांच्या दर्जात सुधारणा घडून आली.

**९. मराठेशाहीचा काळ (इ.स. १७०० ते १८१८)**

या काळात स्त्रियांच्या दर्जात सुधारणा होऊ लागली होती. स्त्रियांना काही प्रमाणात सामाजिक, राजकीय, आर्थिक अधिकार मिळाले होते. पती निधना नंतर विधवा स्त्रीला पतीच्या संपतीत वारसा हक्क मिळत होता





**१०. ब्रिटिश कालखंड (१८०० ते १९४७)**

या कालखंडात ब्रिटिश शासनाने स्त्रियांच्या दर्जात सुधार घडवून आण्याकरीता १८२९ ला सत्ती बंदीचा कायदा पास केला. १९२९ साली बालविवाहावर बंदी करून संमती विवाहाचा कायदा पास केला. स्त्रीयाकरीता शाळा सुरु केल्या. स्त्रियांना वारसा हक्क देण्यात आला. त्यामुळे स्त्रियांचा सामाजिक, वैवाहिक आर्थिक दर्जात सुधारणा झाली.

**स्त्रिया संबंधी समाज सुधारकांची मते**

**१. भगवान गौतम बुध्द**

गौतम बुध्दांच्या मते 'स्त्रियांना पुरुषा समान व्यक्ति स्वातंत्र्याचा अधिकार आहे. स्त्रियांवर अनिष्ठ प्रथा परंपरांचे वर्चस्व निर्माण करून स्त्रियांना बंदिस्त केले आहे. स्त्रि-पुरुष भेद हा मानव निर्मात आहे. स्त्रिला स्वातंत्र्य दिले तर ती पुरुषा पेक्षा प्रभावी ठरु शकते.'

**२. महात्मा बसवेश्वर**

महात्मा बसवेश्वर यांच्या मते 'स्त्री ही जन्मतः सहनशील व स्वार्थत्यागी आहे. तीला आबला म्हणणे हा कृतघ्नपणा ठरेल. स्त्री पुरुषा एवढी पाशवी नाही. तीला व्यक्ति स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. विधवांना सक्तिचे वैधव्य पाळण्यास लावू नये. स्त्रियांना व्यक्ति स्वातंत्र्याचा अधिकार आहे.'

**३. छत्रपती शिवाजी महाराज**

छत्रपती शिवाजी महाराजांना स्त्री पुरुष यांच्या मधील भेद मान्य नव्हता. त्यांनी स्त्रियांवर अन्याय अत्याचार करणाऱ्या सैनिक, सरदार, पाटील, जमीदार यांना देहदंडाची शिक्षा दिली. सती जाणाऱ्या स्त्रियांवर बंदी घातली. बालविवाह प्रथा बंद केली.

**४. राजाराम मोहनरॉय**

रॉय यांना बालविवाह, बहुपत्नी विवाह, सतीप्रथा मान्य नव्हती. त्यांनी सती प्रथा बंद करण्याकरिता आहोरात्र प्रयत्न केला. स्त्रीने सती जावू नये. या करीता जनजागृती केली. बालविवाहाचे दुष्परिणाम समजाला सांगून स्त्री स्वातंत्र्या विषयी कार्य केले.

**५. स्वामी दयानंद सरस्वती**

दयानंद सरस्वती यांच्यामते 'स्त्री शिक्षणाला विरोध करणे हा समाज व पुरुषांच्या मुर्खपणाचे घोतक आहे. स्त्रियांना शिक्षण आणि स्वातंत्र्य दिल्या शिवाय देशाचा व समाजाचा विकास होणे शक्य नाही. विवाह करीता मुलीचे वय १६ वर्षे असावे. विधवांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार आहे. विधवा स्त्रियांना पुत्रप्राप्तीचा हक्क आहे.'

Bhai Kishanrao Deshmukh Senior College Chakur 413513

**६. ताराबाई शिंदे**

ताराबाई शिंदे यांनी पुरुष प्रधान संस्कृतीवर कठोर टिका केली. त्यांच्या मते 'स्त्रियांना व्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे. पुरुषांनी स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदला पाहिजे. निसर्ग सृष्टीने व निर्मात्याने स्त्री-पुरुषा मध्ये भेद केला नाही. पुरुषांनी स्त्रीला आपले गुलाम बनवण्याकरीता स्त्री-पुरुष भेद निर्माण केला आहे. स्त्रियांना विवाह, सामाजिक, शैक्षणिक, स्वातंत्र्य आहे विधवंना पुनर्विवाहाचा अधिकार आहे.'

**७. गोपाळ हरि देशमुख :- (लोकहितवादी)**

गोपाळ हरि देशमुख यांना स्त्रियांकवरील बंधने, स्त्री-पुरुष भेद मान्य नव्हता. ते म्हणतात, 'स्त्री-पुरुष समान असून त्यांना समान व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. विधवांवर सक्तिच्या वैद्यव्याचे बंधन घालू नये. विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार आहे. माता-पित्याने मुला-मुलीचा बालविवाह करु नये. बालविवाह शास्त्र संमत नाही. विवाह करिता मुला-मुलींची संमती घेतली पाहिजे.'

**८. सयाजीराव गायकवाड**

सयाजीराव गायकवाड यांच्या मते, 'स्त्रीयांच्या दुःखाचे कारण त्यांचे अज्ञान आहे. त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. या करिता त्यांनी ८ ते १२ वर्षाच्या मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे. स्त्रियांचा शिक्षण मिळाले तर देशात नवविचारांची क्रांती होईल.'या करीता मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले.

**९. धोंडो केशव कर्वे**

कर्वे यांच्या मते 'समाजाने स्त्रियांवर शैक्षणिक, वैवाहिक, सामाजिक, आर्थिक बंधने घालून समाजाच्या विकासाला अडथळा निर्माण केला आहे. स्त्रियांना शिक्षण दिले तर त्या स्वावलंबी होऊन कुटूंबाचा, समाजाचा विकास घडवून आणतील. या करीता त्यांनी १९१६ मध्ये एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाची स्थापना केली.

**१०. राजर्षी शाहू महाराज**

राजर्षी शाहू महाराजांना स्त्रीयांवरील अनिष्ठ रुढी प्रथा, परंपरा मान्य नव्हत्या. त्यांनी बालविवाह, बहुपत्नी विवाहाला, कायद्याने बंद केले. विवाह करिता मुलाचे वय १८ वर्षे कायद्याने केले. स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीच केले. स्त्रीयांना घटस्फोट घेण्याचा अधिकार व वारसा हक्काचा कायदा लागू केला.

**११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

आंबेडकरांच्या मते, 'स्त्रियांना व्यक्ति स्वातंत्र्याचा अधिकार आहे. स्त्रियांनी आपल्या मुला-मुलींना शिक्षण दिले पाहिजे. त्याच बरोबर स्त्रियांनी अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरांना विरोध करावा. स्त्रियांना वारसा हक्क आणि घटस्फोटाचा अधिकार आहे.'





**१२. महात्मा गांधी**

महात्मा गांधीच्या मते, 'स्त्री-पुरुष समान आहेत. त्यांच्या मध्ये कोणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही. स्त्री ही पुरुषा पेक्षा श्रेष्ठ आहे. विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार आहे. माता-पित्यांनी आपल्या मुला-मुलींचा बालविवाह करु नये.'

**१३. सावित्रीबाई फुले**

सावित्रीबाई फुले यांच्या मते 'स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार आहे. माता-पित्याने आपल्या मुला-मुली मध्ये भेद करु नये. मुलीच्या विकासा करीता त्यांना मुला समान अधिकार, स्वातंत्र्य, शिक्षण दिले पाहिजे. विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार आहे.'

**म. फुले यांचे स्त्रीवादी विचार**

स्त्री शिक्षणाचा पुरस्कर्ता महात्मा जोतीबा गोविंदराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्हयातील कटगुण येथे माळी कुटूंबात झाला. म. फुले हे लहान पणा पासूनच तलख बुध्दी मातेचे व प्रखड विचाराचे होते. त्यांना पुरुष सत्ताक पध्दतीने स्त्रियांवर बालविवाह, बहुपत्नी विवाह, कुमारी-जरठ, विवाह, विधवा पुनर्विवाह बंदी, सक्तिचे वैद्यव्य पालन या प्रथा, परंपरा मान्य नव्हत्या. त्यांनी स्त्रियांच्या उध्दारा करिता केलेले कार्य व मांडलेले विचार पुढील प्रमाणे

**१. स्त्री शिक्षणा विषयी दृष्टीकोन**

म. फुले यांच्या मते 'स्त्रियांना शिक्षणाचाअधिकार आहे. स्त्री शिकली तर ती कुटूंबाला शिक्षित बनवेल. ती अन्याय अत्याचाराला विरोध करील. तिला स्वतःचे कार्य व कर्तव्य समजेल. या करीता त्यांनी १८४८ साली. पहिली मुलीची शाळा पुणे येथे काढली. या शाळेत स्त्री शिक्षिका म्हणून पत्नी सावित्रीबाई यांची नेमणूक केली. माता पित्याने आपल्या मुलीला शाळेत पाठवावे असे अहवान केले.

**२. बालविवाह विषयीक दृष्टीकोन**

म. फुले यांचा स्वतः वयाच्या १२ व्या वर्ष बालविवाह झाला होता. त्यांना बालविवाह प्रथा मान्य नव्हती. त्यांच्या मते, बालविवाह स्त्री-पुरुषांच्या शारीरिक बौध्दीक विकासाला बाधक आहे. मुला-मुलींनी संमती विवाह करावा.

**३. बहुपत्नी विवाह विषयीक दृष्टीकोन**

म. फुले यांच्या मते 'बहुपत्नी विवाह हा पुरुषांनी स्त्रियांच्या शारीरिक मानसिक शोषणा करीता रचलेला डाव आहे. बहुपत्नी विवाह स्त्रियांचा अपमान आहे. स्त्रियांनी बहुपत्नी विवाहला विरोध केला पाहिजे.'

PRINCIPAL
Bhai Kishanrao Deshmukh
College Chakur

**४. कुमारी-जरठ विवाह विषयी दृष्टीकोन**

म. फुले यांच्या मते 'माता-पित्याने आपल्या मुलींचा संमती विवाह करावा. जरठ पुरुषाला मुली देवू नयेत. कुमारी जरठ विवाह मुळे मुलींचे वैवाहिक जीवन सुखी होत नाही.'

**५. विधवा पुनर्विवाह विषयीक दृष्टीकोन**

म. फुले यांच्या मते 'विधवांना इच्छा असेल तर पुनर्विवाह करण्याचा अधिकार आहे. विधवांनी विधवा धर्माचे पालन करू नये. विधवांनी पतीच्या आत्म्याला मोक्ष मिळावा. या करीता वृत्त, उपवास, करु नयेत. या कर्मकांडाला धर्मा शास्त्राचा आधार नाही.'

**६. स्त्रीयांच्या व्यक्ति स्वातंत्र्या विषयी दृष्टीकोन**

म. फुले यांच्या मते 'स्त्री-पुरुष यांची निर्मिती एकाच निर्मिकाने केली आहे. त्याने स्त्री पुरुषाला जन्माला घालताना कोणताही भेदभाव केला नाही. त्यामुळे स्त्रीयांना पुरुषा समान व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे.'

**७. स्त्री-पुरुष समानता विषयी दृष्टीकोन**

म. फुले यांच्या मते 'स्त्री-पुरुष एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यांना वैवाहिक, सामाजिक, आर्थिक, कौटूंबिक समान अधिकार आहेत.'

**८. म. फुले यांची स्त्री विषयी कौटुंबिक धारणा**

म. फुले यांच्या मते 'स्त्रियांना कुटूंबात व्यक्ती स्वातंत्र्य असले पाहिजे. त्यांना कुटूंबाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे. कुंटूंबात मुलीच्या जन्माचे स्वागत करावे. कुटूंबातून स्त्रियांच्या व्यक्तिमत्व विकासाला प्रोत्साहन द्यावे.'

**९. म. फुले यांचा स्त्रिया संबंधी धार्मिक दृष्टीकोन**

म. फुले-यांच्या मते 'स्त्रियांना धार्मिक स्वातंत्र्य आहे. ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. कोणताही धर्मग्रंथ ईश्वर निर्मित नाही. स्त्रियांनी मुर्ती पुजा करू नये. पुनर्जन्म, स्वर्ग नरक, मोक्ष प्राप्ती या करीता वृत्त उपवास नवस धार्मिक कर्मकांड करू नये.'

**१०.म. फुले यांचा स्त्रिया विषयी सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीकोन**

म. फुले म्हणतात 'स्त्रियांना सामाजिक स्वातंत्र्य आहे. त्यांनी सामाजिक कार्यात सहभाग घेतला पाहिजे. त्याना समाजात आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. त्यांनी समाजातील अंधश्रध्दा कनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा यांना विरोध करावा. स्त्रियांनी सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेऊन स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करावा.





**११. म. फुले यांचा स्त्रिया विषयीक आर्थिक दृष्टीकोन**

म. फुले म्हणतात 'स्त्रियांना कुटूंबातून आर्थिक स्वातंत्र्य असले पाहिजे. त्यांनी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होण्याकरीता नोकरी,उद्योग, व्यावसाय करावा त्यांच्या नावे स्थावर मालमत्ता असावी. त्यांना पतीच्या उत्पन्नातून खर्च करण्याचा अधिकार आहे. माता पित्यांनी मुलीला वारसा हक्क दिला पाहिजे.'

**सारांश**

स्त्रीयांच्या उध्दारा करीता समाज सुधारक आणि म. फुले यांच्या कार्यामुळे आज स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. स्त्रिया शिक्षण घेवून शिक्षिका, मुख्याध्यापिका, प्राचार्या, वकील, डॉक्टर, इंजिनिअर आणि शासनाच्या विविध प्रशासकीय पदावर कार्य करीत आहेत. त्या आर्थिक दृष्टीने स्वावलंबी झालेल्या दिसून येतात. त्या सामाजिक, सांस्कृतिक राजकीय क्षेत्रात कार्य करीत आहेत. त्या समाजातील अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरांना विरोध करुन समाज व राष्ट्र विकासाच्या प्रक्रियेत योगदान देत आहेत.

**संदर्भ सूची**

१. सतिश ठोबरे-महाराष्ट्रातील समाज सुधारक - कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद २०१०
२. डॉ. गाठाळ एस.एस. - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८-१९६०)-कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद: २००५.
३. लेफ्टनंट सुनिता बोर्डे/संतोष खडसे-ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया-शुभम प्रकाशन, पुणे. २०१०
४. गाठाळ एस.एस.-भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन-कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद २०१३
५. जावळे बी.बी.-म. फुले काल आणि आज-डोळस प्रकाशन, बीड. १९९७
६. पवार बा.ग.-युग पुरुष महात्मा जोतीबा फुले-मातृभूमी प्रकाशन, पुणे. १९९१
७. गेल ऑम्व्हेट-ज्योतिबा फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार-लोकवाड.मय गृह, मुंबई. १९९०
८. धनंजय कीर-महात्मा ज्योतीराव फुले आमच्या सामाजिक क्रांतीचे जनक-पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. १९७२